तारेचा पत्ता : "कॉपशुगर" शिवनगर

फोन नंबर्स
माळेगाव एक्स्चेंज
५७ ऑफिस
५४ कार्यकारी संचालक
५३ चेअरमन

# दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि.,
## माळेगाव बु.॥ (शिवनगर)
तालुका बारामती, जिल्हा पुणे

रजि. नं. जी. २६६ ता. २४-२-१९५५

### आमची वैशिष्टचे

शुभ्र व दाणेदार साखरेचे उत्पादन
ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची जास्तीत जास्त किंमत वेळेवर देणे.
व्यवस्थापक व कामगार यांचे जिव्हाळ्याचे संबंध.

### : संचालक मंडळ :


श्री. आनंदराव मारुतराव पिसाळ — कार्यकारी संचालक
श्री. लालासो नानासो जगताप — व्हा. चेअरमन
श्री. शिवलिंग संगमनाथ हिरेमठ — चेअरमन

- श्री. नामदेवराव आनंदराव आटोळे — संचालक
- श्री. वीरसिंह चंद्रसेन जाधवराव — "
- श्री. वामनराव गुलाबराव तावरे — "
- श्री. श्रीरंगराव कृष्णराव जगताप — "
- श्री. महादेव काशाबा तावरे — "
- श्री. शिवाजीराव बाळासाहेब बांदल — "
- श्री. शंकरराव सीताराम देवकाते — "
- श्री. गुलाबराव साहेबराव ढवाण — "
- श्री. कृष्णा बाजीराव गावडे (ब वर्ग सोसायटचांचे प्रतिनिधी) — "
- श्री. नामदेव बापू खरात (मागासवर्गीय प्रतिनिधी) — "
- श्री. बुवासाहेब रावसाहेब जगताप (कामगार प्रतिनिधी) — "
- श्री. चंद्रराव कृष्णराव तावरे — संचालक
- श्री. सखाराम शंकरराव बुरुंगुले — "
- श्री. जगन्नाथ आनंदराव कोकरे — "
- श्री. गजानन यशवंतराव खलाटे — "
- श्री. मानसिंगराव बाबुराव जाधव — "
- श्री. संपतराव रंगनाथ देवकाते — "
- श्री. शंकरराव कृष्णा तुपे — "
- श्री. सुधाकर शंकरराव बनकर — "
- श्री. विठ्ठलराव तुकाराम कोकरे (पुणे जि. मध्य. सह. बँकेचे प्रतिनिधी) — "
- श्री. आत्माराम अनंत दळवी (कामगार प्रतिनिधी) — "
- श्री. एस्. एम्. घारपुरे रिज. डेप्यु. डायरेक्टर ऑफ शुगर/शासनाचे प्रतिनिधी

टीप : आमच्याकडे १४×४८ या साईझची मिल विकावू आहे. ज्यांना घ्यावयाची असेल त्यांनी आमचेशी संपर्क साधावा.



प्रकाशक : प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती ४१२ १०२
मुद्रक : ज्ञा. चं. आगाशे, मंदार प्रिंटर्स, ४९५-९६ शनवार पेठ, पुणे ४११ ०३०

हार्दिक शुभेच्छा !

# प्रिमियर मेटल्स

बारामती सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित,
प्लॉट नं. बी २५-२६, भिगवण रोड,
बारामती, जि. पुणे

☆ ॲल्युमिनियम भांडी
☆ ॲल्युमिनियम पत्रा
☆ ॲल्युमिनियम सर्कल्स
☆ ॲल्युमिनियम इतर उत्पादने

अशा तऱ्हेचा
बारामती येथील
भव्य व सुसज्ज कारखाना
तळागाळातील बहुजन समाजासाठी
प्रचंड उत्पादनाची सुरुवात

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

॥ अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः ॥
॥ अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

२१ वे वर्ष

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती

# अनेकान्त

वार्षिक नियतकालिक वरिष्ठ

अंक एकविसावा : १९८२-८३

प्रमुख संपादक

प्रा. रतिकान्त शहा

संपादक मंडळ

- अध्यक्ष

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा

- उपाध्यक्ष

प्रा. बी. बी. पाटील

- साहाय्यक

प्रा. एस्. आर. नवाथे
प्रा. डी. एस्. शहा
प्रा. एम्. बी. कंडारकर
प्रा. डॉ. एस्. आर्. काकडे
प्रा. के. एस्. अय्यर

## अनुक्रम


○ संपादकीय

○ प्रेरणा व प्रोत्साहन

○ अनुचिन्तन

औद्योगिक भारताचे थोर शिल्पकार :
शेठ वालचंद हिराचंद । १
कु. हर्षा शहा, एस्. वाय्. बी. कॉम्.

वृक्षगंगा । ५
टी. ई. पवार, एस्. वाय्. बी. ए.

अणुबाँबची संहारक शक्ती । ९
प्रवीणसिंग पाटील, एम्. कॉम्. (भाग२)

भारतातील नयनरम्य सरोवरे । १२
कु. चन्द्रशोभा चौधरी, टी. वाय्. बी. ए.

खलिस्तान : एक समस्या । १५
किरण गुजर, टी. वाय्. बी. ए.

झोरबा : एक आगळे व्यक्तिचित्र । १८
राजेश आचार्य, एस्. वाय्. बी. एस्सी.

वनचरांचा सोयरा । २१
कु. रंजना सरोदे, एम्. ए. (भाग २)

आरादखाना (कथा) । २३
दयानंद मिसाळ, एम्. ए. (भाग १)

डायरी (कथा) । २८
राजेन्द्र कोकरे, एफ्. वाय्. बी. ए.

देवऋषी (कथा) । ३१
सौ. व्ही. आर्. जंगम, एस्. वाय्. बी. ए.

मिळवत्या स्त्रियांच्या समस्या । ३३
कु. सुधा क्षीरसागर, एफ. वाय्. बी. ए.

हिंदी

वलिहारी गुरु । ३५
दयानन्द मिसाळ, एम्. ए. (भाग १)

English

My Maiden European Visit । ३७
Taware H. D., F. Y. B. A.

Laser Radiations । ३८
Daruwala S. C., T. Y. B. Sc.

Environmental Pollution in India । ४०
Jagdale P. E., T. Y. B. sc.

कविता

अंकुर । ४२
प्रमोद वडगावकर, एम्. ए (इंग्लिश भाग १)

पावसाळी रात्र । ४२
सुनील जगताप, एफ्. वाय्. बी. एस्सी.

नाही... नाही... नाही । ४३
कु. सुनीता निवंधे, एफ्. वाय्. बी. कॉम्.

● एकच प्रहार । ४३
बापूराव झगडे, एस्. वाय्. बी. ए.

स्वप्न । ४४
कु. रजनी भोसले, टी. वाय्. बी. ए.

मन मात्र शांत हवे । ४४
सौ. शोभा कुलकर्णी, एम्. ए. (मराठी)

सर्वस्व माझे । ४४
पी. ए. बंडगर, टी. वाय्. बी. कॉम्.

● अवं आमी बी मानुस हाय । ४५
कु. प्रभावती देवकाते, टी. वाय्. बी. कॉम्.

भूक । ४५
एम्. ए. गोसावी, एफ्. वाय्. बी. ए.

अजरामर चित्रे । ४६
राजेश आचार्य, एस्. वाय्. बी. एस्सी.

सरिता । ४६
व्ही. आर्. कदम, एम्. कॉम्. भाग २

ओझं । ४६
कु. रंजना बंडगर, एफ्. वाय्. बी. ए.

My Town । ४६
Shembekar U. M., F. Y. B. A.

विनोबा वाणी । १४, १७

● पारितोषिक प्रात्र




'अनेकान्त'चा २१ वा अंक या वर्षी प्रसिद्ध होत आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीचे हे २१ वे वर्ष चालू आहे.

या वर्षाचा प्रारंभच 'द्विदशक पूर्ती' समारंभाने झाला.

### द्विदशक पूर्ती

या महाविद्यालयाने केलेल्या 'दोन दशकांच्या वाटचाली'चे सिंहावलोकन करताना 'पूर्ती'चे समाधान व्यक्त करण्यात आले. पण त्याचबरोबर वाढत्या जबाबदारीची जाणीवही तितक्याच तीव्रतेनं व्यक्त करण्यात आली. संस्थेला तसं 'पूर्तते'चं समाधान कधीच लाभत नाही. एक टप्पा ओलांडला की क्षितिजं अधिकच विस्तारतात. अपेक्षाही वाढतात. पूर्वीपेक्षाही मोठी आव्हाने समोर उभी ठाकतात. जिद्दीने ती स्वीकारावी लागतात. अधिक महत्त्वाकांक्षी योजना आखाव्या लागतात. त्या साकार करण्यातच पुढची वाटचाल सुरू होते.

म्हणूनच केवळ 'द्विदशक पूर्ती'चे समाधान मानण्यासाठी हा समारंभ नव्हता, तर पुढच्या वाटचालीची जागरूक तयारी करणं हाच या समारंभाचा मुख्य उद्देश होता.

### रौप्यमहोत्सवाकडे

या महाविद्यालयाने आपल्या परिसरात जे कार्य केलं आहे त्याचा शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय इत्यादी विविध दृष्टिकोणांतून सर्वांगीण आढावा घेणं, नव्या संभाव्य दिशांचा मागोवा घेणं आणि या अभ्यासाच्या आधारावर, हे महाविद्यालय या ग्रामीण विभागातील समग्र परिवर्तनाचं एक प्रमुख केंद्र बनेल अशा उद्दिष्टाने नवे प्रकल्प, नवे उपक्रम, नव्या योजना हाती घेणं असा एक व्यापक कार्यक्रम कार्यान्वित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लवकरच येणारे 'रौप्य महोत्सवी वर्ष' त्या दृष्टीने लक्ष्य ठरविण्यात आले आहे.

### नवे अभ्यासक्रम

कलाशाखेमध्ये द्वितीय वर्षासाठी समाजशास्त्र (स्पेशल) व संरक्षणशास्त्र (स्पेशल) हे विषय जून ८२ पासून सुरू करण्यात आले आहेत. इंग्लिश विभागानेही एक सर्टिफिकेट कोर्स सुरू केला आहे आणि असाच एक जर्मन भाषेच्या अध्ययनाचा सर्टिफिकेट कोर्स जून ८३ पासून सुरू करण्याची तयारी केली आहे.

वाणिज्य विभागातर्फे वेगवेगळे छोटे अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी गेल्या वर्षीच मागितली होती. ती मिळालीही. पण काही तांत्रिक अडचणीमुळे जून ८२ पासून ते सुरू करता आले नाहीत. आता जून ८३ पासून अधिकात अधिक अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न राहील.

शास्त्र शाखेमध्ये भूगर्भशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र हे दोन नवे विषय सुरू करण्याविषयी विद्यापीठाकडे अनुमती मागितली आहे.

### कोहसिप

'कोहसिप'ची योजना गेल्या दोन वर्षांप्रमाणेच याही वर्षी सुव्यवस्थितपणे राबविण्यात आली. चर्चासत्रे, परिसंवाद, तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने यांचे आयोजन वर्षभर चाललेच होते.

हे सारे नवे उपक्रमही आता नित्याचे झाले आहेत. म्हणूनच आता खऱ्या अर्थाने एक नवा उपक्रम मोठ्या धडाडीने पुढे होऊन स्वीकारला आहे.

### अभ्यासक्रमाची पुनर्रचना (Restructuring of Courses)

बदलत्या परिस्थितीनुसार परंपरागत शिक्षणात काही मूलभूत परिवर्तन करण्याची निकड सर्वांनाच जाणवू लागली आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या मार्गदर्शनानुसार पुणे विद्यापीठाने पदवी परीक्षांच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची योजना हाती घेतली आहे. हे नवे पुनर्रचित अभ्यासक्रम प्रायोगिक स्वरूपात काही निवडक महाविद्यालयांत पथप्रदर्शक प्रकल्प (Pilot Project) म्हणून सुरू करण्यात यावयाचे आहेत. आपल्या महाविद्यालयाने या प्रयोगासाठी उत्साहाने आपली तयारी दर्शविली आहे. येत्या जून ८३ पासूनच कला विज्ञान शाखेमध्ये हे

नवे अभ्यासक्रम सुरू होत आहेत. त्या दृष्टीने विद्यापीठाने आपल्या महाविद्यालयाची निवड केली आहे.

विद्यार्थी स्वावलंबी व्हावा, शिक्षणावरची त्याची आस्था वाढावी, त्याचा आत्मविश्वास जागा व्हावा, त्याच्या ठायी सामाजिक बांधिलकीचा कर्तव्यभाव निर्माण व्हावा, त्याने श्रमाची प्रतिष्ठा व अपरिहार्यता ओळखावी, दैनंदिन जीवनाशी शिक्षणाचा सहज संबंध जोडला जावा, पुस्तकी पोपटपंचीपेक्षा कार्य-कुशलतेवर अधिक भर असावा, सर्वांगीण विकासातून विद्यार्थ्यांचे एकसंध व्यक्तिमत्त्व घडवले जावे अशा व्यापक विचारसरणीतून ही पुनर्रचना करण्यात येत आहे.

या प्रयोगाने शिक्षणक्षेत्रात नवे चैतन्य निर्माण होईल, नवे प्रेरणा-स्रोत खळाळू लागतील, उत्साहाचे नवे वारे वाहू लागतील अशी आशा बाळगू या.

या प्रयोगात आपल्या महाविद्यालयाने आघाडीवर राहायचे ठरविले आहे, ही घटना अभिमानास्पद तर आहेच, पण जबाबदारीही तितकीच मोठी आहे हे लक्षात ठेवू या.

## विज्ञान कार्यशाळा

खरे तर या नव्या मार्गावर आपण यापूर्वीच वाटचाल सुरू केलेली आहे. विज्ञान कार्यशाळा त्यातीलच एक टप्पा. दिवसेंदिवस या कार्यशाळेची उपयुक्तता वाढते आहे. या कार्यशाळेतील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्याला नोकरीची हमी वाटते आहे. या परिसरातील साखर कारखान्यांतून अथवा खाजगी उद्योगधंद्यांतून त्याला नोकरी चटकन मिळू शकते, आणि तसाच कोणी प्रयत्नशील, परिश्रमी आणि कल्पक असेल तर स्वतःच्या पायावरही तो उभा राहू शकतो हे आता सिद्ध झाले आहे.

या वर्षी आयोजित करण्यात आलेले 'स्वयं रोजगार प्रेरणा शिबिर' ही या क्षेत्रातील एक उल्लेखनीय नावीन्यपूर्ण अशी घटना होय. हे शिबिर सर्वार्थाने 'प्रेरणा' देणारे ठरले आहे. लघुउद्योगासंबंधीचा इतका सर्वांगीण विचारविनिमय क्वचितच कुठे झाला असेल.

## सामाजिक अनुबंध

'हरित क्रांती मूल्यांकन, समस्या व भवितव्य' या विषयावरचे अर्थशास्त्र विभागाने आयोजित केलेले चर्चासत्रही असेच अत्यंत महत्त्वाचे. तज्ज्ञांचे सैद्धान्तिक ज्ञान आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्यांचे अनुभव यांची सांगड घालणे, शेतीसारख्या भवतालच्या परिसरातील प्रमुख व्यवसायाशी आणि त्यांत राबणाऱ्या शेतकऱ्यांशी महाविद्यालयाचा अनुबंध जोडणे ही नव्या काळाची मागणी या चर्चासत्राने यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

## मुद्रणालय

प्रिंटिंग प्रेसची उभारणी हाही या नव्या योजनेचाच एक भाग. गेल्या वर्षीच ही योजना मंजूर झाली. 'सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्ड, दिल्ली' यांच्याकडून रुपये १,१६,७००/– चे अनुदानही मिळाले. आता प्रेसची आवश्यक ती यंत्रसामग्री आलेली आहे. लवकरच पाडव्याच्या शुभमुहूर्तावर 'मुद्रणालया'ची उभारणी होत आहे. व्यावसायिक शिक्षणक्रमामध्ये आणखी एक नवी दिशा, नवा मार्ग खुला होत आहे. विशेषतः आर्थिकदृष्टचा मागास स्त्रिया व अपंग स्त्री-पुरुष यांना रोजगार उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

'राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना', 'राष्ट्रीय सेवा योजना', 'निरंतर शिक्षण केंद्र', 'महाविद्यालय-शाळा समूह योजना' अशा विविध योजनांच्या द्वारा हे महाविद्यालय सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी झाले आहे.

## अभिमानास्पद यश

आपल्या महाविद्यालयाने या वर्षी एक विशेष लौकिक मिळवला आहे. एम्. ए. (राज्यशास्त्र) चा विद्यार्थी अशोक मालेगावकर हा एप्रिल ८२ मध्ये झालेल्या परीक्षेमध्ये पुणे विद्यापीठात राज्यशास्त्र विषयात सर्वप्रथम आला आहे. या उज्ज्वल यशाबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन.

## क्रीडाक्षेत्र

क्रीडाक्षेत्रामध्ये या महाविद्यालयाने आपली उज्ज्वल परंपरा टिकवली आहे. आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धांमध्ये आपल्या महाविद्यालयाने विजेतेपद मिळवले आहे. आंतरमहाविद्यालयीन कुस्ती, बॅडमिंटन, खो खो व मैदानी स्पर्धा आणि पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय मैदानी व खो खो स्पर्धा (मुले व मुली) या महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर उत्साहाने आयोजित करण्यात आल्या आणि यशस्वीपणे पार पडल्या. विविध स्पर्धांच्या कुशल व कल्पक आयोजनात तर आपल्या महाविद्यालयाने विशेष नावलौकिक संपादन केला आहे.

## वृक्षारोपण

या वर्षाची विशेष उल्लेखनीय घटना म्हणजे भव्य प्रमाणावर साजरा करण्यात आलेला वृक्षारोपण समारोह. महाराष्ट्र राज्य सरकारच्या 'सुबाभूळ वृक्षारोपण' कार्यक्रमात सहभागी होऊन सुबाभळीची ५१ हजार रोपे लावण्याचा संकल्प केला आणि ३१ हजार रोपे लावलीही. उरलेली रोपेही जुलैअखेर लावली जातील. विविध प्रकारची फळझाडेही लावण्यात आली. दहा वर्षांपूर्वी ओसाड उजाड असलेले हे माळरान आज हिरव्यागार वनश्रीने डवरून आले आहे.

वृक्षारोपण हे युवकांच्या श्रमशक्तीचे, त्यांच्या निर्माणशीलतेचे प्रतीक आहे. या गोष्टीकडे लक्ष वेधण्यासाठीच या प्रतीकाचे चित्रांकन या अंकाच्या मुखपृष्ठावर करण्यात आले आहे.

## नामकरण

सभागृहाचे व ग्रंथालय विभागाचे नामकरण यांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. बारामती नगरीतील प्रतिष्ठित नागरिक व संस्थेचे पदाधिकारी श्री. मा. तु. शहा यांच्या धर्मपत्नी सौ. नलिनीबाई शहा यांनी आपल्या स्वर्गीय पिताजींच्या स्मरणार्थ सभागृहासाठी रु. ४०,०००/– ची देणगी दिली. त्यानुसार सभागृहाचे 'जीवराज गांधी सभागृह' असे नामकरण करण्यात आले आहे. आपल्या संस्थेचे आद्य संस्थापक स्व. फुलचंदजी गांधी यांनी स्व. नेमचंद वालचंद गांधी, उस्मानाबादकर, यांचे स्मरणार्थ रु. २५,०००/– ची देणगी दिली होती. ग्रंथालयातील एका विभागाला 'स्व. नेमचंद वालचंद गांधी संस्कृत भवन' असे नाव देण्यात आले आहे.

## जन्मशताब्दी

चालू वर्षी श्रीमान शेठ वालचंद हिराचंद यांची जन्मशताब्दी सर्वत्र साजरी होत आहे. हे महाविद्यालयही त्यांना या निमित्ताने आपली आदरांजली समर्पित करीत आहे.

## डॉ. एस्. एस्. भिर्डी अमृतमहोत्सव

आपल्या संस्थेच्या जयसिंगपूर येथील महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे एक आधारस्तंभ डॉ. एस्. एस्. भिर्डी यांचा अमृतमहोत्सव दिनांक १२ जानेवारी ८३ रोजी जयसिंगपूरच्या नागरिकांतर्फे साजरा करण्यात आला. जयसिंगपूर नगरीच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात विकासाचे जे कार्य झाले आहे त्याला डॉ. भिर्डींचेच समर्थ नेतृत्व लाभले आहे. आपल्या वैद्यकीय व्यवसायालाही त्यांनी निरपेक्ष स्वभावाचीच जोड दिली आहे. त्या परिसरातील त्यांचे कार्य व त्यांना मिळालेली लोकप्रियता केवळ अजोड आहे. त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त या महाविद्यालयातर्फे त्यांना 'उदंड आयुष्य व अभंग स्वास्थ्य लाभो' या शुभेच्छा व विनम्र अभिवादन.

## ऋणनिर्देश

या महाविद्यालयाची प्रगती असंख्य व्यक्ती आणि अनेक संस्था या सर्वांच्या सहकार्यातूनच घडते आहे. दिवसेंदिवस या महाविद्यालयाचा व्याप व पसारा वाढतो आहे. कार्यक्षेत्र विस्तारते आहे. अशा वेळी पदोपदी साहाय्याची आवश्यकता भासते. ज्या ज्या वेळी अशा साहाय्याची व सहकार्याची अपेक्षा एखाद्या व्यक्तीकडे वा संस्थेकडे व्यक्त केली त्या त्या वेळी त्यांनी नेहमीच हात पुढे केला आहे. शासकीय अधिकारी, या परिसरातील विविध सहकारी व खाजगी कारखान्यांचे-संस्थांचे पदाधिकारी, नगर परिषद, तालुका पंचायत, जिल्हा परिषद यांचे पदाधिकारी, म. रा. वि. मंडळाचे अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, या विभागातील कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, अज्ञात हितचिंतक अशा अनेकांचे सहकार्य वेळोवेळी मिळते. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार.

या महाविद्यालयाच्या आजवरच्या प्रगतीला व संकल्पित योजनांना अनेकान्त संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या पाठिंब्याचाच भक्कम आधार आहे; त्यांच्या प्रेरणांची गती आहे, त्यांच्या दूरदृष्टीचा डोळसपणा आहे. आणि विविध उपक्रम, नवे नवे प्रकल्प प्रत्यक्ष कार्यवाहीत आणणारे प्राचार्यांचे समर्थ नेतृत्व इथे अहर्निश कार्यरत आहे. त्यांना प्राध्यापक, कर्मचारी व सेवक यांची सुसंवादी साथ आहे. या

सर्वांचे आभार मानणे म्हणजे आपलेच आपण आभार मानण्यासारखे होईल. तेव्हा त्यांचा केवळ निर्देश करणेच पुरेसे वाटते.

**हा अंक : साहित्य**

अंकाची जुळवाजुळव करताना खूप अपेक्षा असतात. प्रत्यक्षात त्यांतल्या फारच थोड्या पूर्ण होतात. अनेकदा सूचना देऊनही, वरचेवर आवाहन करूनही विद्यार्थ्यांकडून हवा तसा प्रतिसाद मिळत नाही. वास्तविक पाहता हे नियतकालिक विद्यार्थ्यांच्या भावभावनांच्या, विचारविकारांच्या अभिव्यक्तीचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. त्याची उपयुक्तता व सामर्थ्य विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे.

या अंकासाठी साहित्य निवडताना दर्जा, वेगळेपणा, आजच्या काळाचं किंवा समस्यांचं भान अशा काही गोष्टी विशेषत्वानं लक्षात घेतल्या आहेत. त्यावरोबरच संकलित साहित्यात विविधता राहील इकडेही लक्ष दिले आहे. काही लेख चांगले असूनही पानांच्या मर्यादेमुळे त्यांना स्थान देता आले नाही. ज्यांनी साहित्य दिले त्या सर्वच विद्यार्थी-विद्यार्थिनींना मनःपूर्वक धन्यवाद.

**मुखपृष्ठ**

या अंकाचे मुखपृष्ठ ११ वीतील विद्यार्थिनी कु. सुनीता जगताप हिने तयार केले आहे. 'शंकर्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स कॉंपिटिशन' मध्ये तिने १९८० चे सुवर्णपदक व १९८१ चे 'मेरिट अवॉर्ड' मिळवले आहे. या मुखपृष्ठासाठी इथल्या एम्. ई. एस्. प्रशालेतील चित्रकलाशिक्षक श्री. वेदपाठक यांनी तिला मार्गदर्शन केले आहे. अक्षरांकन त्यांचेच आहे. त्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार.

**जाहिराती : नवा उपक्रम**

या वर्षी नियतकालिकासाठी जाहिराती मिळविण्यासाठी एक नवा उपक्रम सुरू केला. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्वेच्छेने हे काम करावं असं आवाहन करण्यात आलं. त्यासाठी त्यांना कमिशन देण्याची योजना आखली. एक परीनं विद्यार्थ्यांचं हे 'विद्यार्जन' च होय. अनुभव व आर्थिक साहाय्य असा दुहेरी फायदा.

या आवाहनाला काही विद्यार्थिनींनी उत्साहाने प्रतिसाद दिला. एस्. वाय्. बी. कॉम्. मधील कु. हर्षा शहा, कु. संगीता शहा, कु. विभावरी क्षीरसागर व कु. संजीवनी शहा यांनी जास्तीत जास्त जाहिराती मिळवल्या. त्यांचे साभार कौतुक. श्री. शेख ए. एस्. (एस्. वाय्. बी. कॉम्.) यानेही आपल्या परीने सहकार्य केले. जाहिरातदारांनीही त्यांना उत्तम प्रतिसाद दिला.

प्रा. पी. डी. फरसोले व ग्रंथालय प्रमुख श्री. एस्. एन्. पाटील यांनीही जाहिराती मिळविण्यासाठी परिश्रम घेतले.

श्री. एस्. एन्. पाटील यांनी जाहिरातविषयक सर्व कारभार अतिशय दक्षतेने व व्यवस्थितपणे सांभाळला. त्यांचे व जाहिरातदारांचे या 'बहुमोल' सहकार्याबद्दल हार्दिक आभार.

**संपादन**

संपादनाच्या या अवघड कार्यात प्राचार्यांचे मार्गदर्शन व संपादक मंडळातील सदस्यांचे सर्वतोपरी सहकार्य लाभले म्हणूनच हे कार्य तडीला जाऊ शकले. प्राध्यापक मित्रांनीही वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य दिले. या सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

**मुद्रण**

याही वर्षी मुद्रणाची जबाबदारी मंदार प्रिंटर्स, पुणे, यांच्यावर सोपवली. व्यवस्थापक श्री. वि. ह. वाडेकर यांच्या आपुलकीने व दक्षतेने, चित्रकार श्री. जयंत ताडफळे यांच्या कलात्मक मांडणीमुळे, प्रेसमधील सर्व कामगार बांधवांच्या निपुण सहकार्यामुळे, के. जोशी यांच्या स्पष्ट व रेखीव ब्लॉक्समुळे या अंकाला हे देखणे रंग-रूप लाभले आहे.

सर्वांचे मनःपूर्वक आभार. ++

---

**'मेडिकोज गिल्ड' बारामती**

या संस्थेने आमच्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम्. व वसतिगृहातील विद्यार्थी / विद्यार्थिनी यांची ८२-८३ या वर्षी वैद्यकीय तपासणी करण्यासाठी सर्वतोपरी हार्दिक सहकार्य दिले आणि या तपासणीच्या मोबदल्याची सर्व रक्कम रु. १५९०/- संस्थेला देणगी म्हणून दिली. त्यांच्या या उदार सहकार्याबद्दल महाविद्यालय मेडिकोज गिल्ड या संस्थेचे ऋणी आहे.



## प्रेरणा व प्रोत्साहन

The College can easily take a place among mofusil institutions from the point of view of examination results & facilities made available to students.

**G. S. Mahajani**
Vice-Chancellor, Poona Uni.
23-6-73

ग्रामीण भागात उच्च विश्वविद्यालयीन शिक्षणाचा विस्तार होत असता शिक्षणातील गुणवत्तेला विसरून चालणार नाही, हे उद्दिष्ट या महाविद्यालयाच्या प्राध्यापक-प्राचार्यवर्गाने नीट जपले आहे, हे त्वरित लक्षात येते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्नही नीट ध्यानात ठेवून शिक्षणाचा कार्यक्रम अमलात आणला जात आहे, हेही लक्षात भरते.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
६ मार्च, ७६

It's always a joy to note the significant progress registered by individuals & institutions... The Principal and his band of devoted Colleagues deserve to be congratulated upon their Signal Success. All glory to them ! 'To them, to them, a Song of Praise is due !'

**Bar. P. G. Patil**
Vice-Chancellor,
Shivaji University, Kolhapur
24-9-77

योजनापूर्वक व वेगाने हे महाविद्यालय प्रगती करीत आहे. येथील सर्व कार्य पाहून मनाला समाधान वाटले.

**प्राचार्य नरहर कुरुंदकर**
२४-१-७९

पदवीपूर्व व पदव्युत्तर विभागांची प्रगती पाहून फार आनंद वाटला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत प्राप्त केलेले सुयश निश्चितपणे लक्षणीय आहे.

**प्रा. डॉ. यू. म. पठाण**
प्रमुख, मराठी विभाग
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२४-३-७९

सुंदर आणि विशाल परिसर
नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करू शकणारे दुर्लभ योजक,
स्वेच्छेने सहकार्य करणारी विद्याप्रेमी माणसे– यशस्वी संस्थेच्या या तिन्ही गरजा पूर्ण झाल्यावर अंगीकृत कामात यश आले नसते तरच नवल.

वसंत बापट
३०-८-८०

कॉलेजची भव्य वास्तू व त्या भोवतालचा परिसर देखणा तर आहेच, परंतु कॉलेजच्या विद्यार्थ्यांत व प्राध्यापक मंडळींत नवीन परिवर्तनाची जाणीव व अगत्यपूर्वक करीत असलेले प्रयत्न पाहून आनंद झाला.

नारायण सुर्वे
१-८-८१

गेल्या काही वर्षांत पदव्युत्तर विभागांचा या महाविद्यालयात जो विकास झाला आहे तो अभिनंदनीय आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या विविध योजनांत हे महाविद्यालय सहभागी झाले आहे ही विशेष समाधानाची गोष्ट आहे.

प्रा. ग. प्र. प्रधान
२७-९-८१

I could learn a few lessons from the successful efforts this college has made in planning so extensively for development.

**Prin. K. Bhogishayana**
Sangameshwar College, Solapur
19-2-82

संस्थेचा परिसर रमणीय आणि विद्यार्जनाला स्फूर्तिदायक आहे आणि तीच प्रसन्नता येथील प्राध्यापकांच्या मुद्रेवरही फुललेली आहे. कल्पक धडाडीचे नेतृत्व आणि कष्टाळू ध्येयवादी प्राध्यापकांचे सहकार्य यामुळे संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होत जाईल याबद्दल खात्री वाटते.

प्रा. वसंत कानेटकर
२४-२-८२

या महाविद्यालयाची अशीच जोमाने प्रगती होत राहो व या भागातील शैक्षणिक, सांस्कृतिक व विकासकार्यात हे प्रगत केन्द्र बनो ही सदिच्छा.

प्रा. डॉ. राम ताकवले
कुलगुरू, पुणे विद्यापीठ
७-३-८२



# प्रेरणा व प्रोत्साहन

The College can easily take a place among mofusil institutions from the point of view of examination results & facilities made available to students.

**G. S. Mahajani**
Vice-Chancellor, Poona Uni.
23-6-73

ग्रामीण भागात उच्च विश्वविद्यालयीन शिक्षणाचा विस्तार होत असता शिक्षणातील गुणवत्तेला विसरून चालणार नाही, हे उद्दिष्ट या महाविद्यालयाच्या प्राध्यापक-प्राचार्यवर्गाने नीट जपले आहे, हे त्वरित लक्षात येते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्नही नीट ध्यानात ठेवून शिक्षणाचा कार्यक्रम अमलात आणला जात आहे, हेही लक्षात भरते.

लक्ष्मणशास्त्री जोशी
६ मार्च, ७६

It's always a joy to note the significant progress registered by individuals & institutions... The Principal and his band of devoted Colleagues deserve to be congratulated upon their Signal Success. All glory to them ! 'To them, to them, a Song of Praise is due !'

**Bar. P. G. Patil**
Vice-Chancellor,
Shivaji University, Kolhapur
24-9-77

योजनापूर्वक व वेगाने हे महाविद्यालय प्रगती करीत आहे. येथील सर्व कार्य पाहून मनाला समाधान वाटले.

प्राचार्य नरहर कुरुंदकर
२४-१-७९

पदवीपूर्व व पदव्युत्तर विभागांची प्रगती पाहून फार आनंद वाटला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत प्राप्त केलेले सुयश निश्चितपणे लक्षणीय आहे.

प्रा. डॉ. यू. म. पठाण
प्रमुख, मराठी विभाग
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२४-३-७९

सुंदर आणि विशाल परिसर
नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करू शकणारे दुर्लभ योजक,
स्वेच्छेने सहकार्य करणारी विद्याप्रेमी माणसे– यशस्वी संस्थेच्या या तिन्ही गरजा पूर्ण झाल्यावर अंगीकृत कामात यश आले नसते तरच नवल.

वसंत बापट
३०-८-८०

कॉलेजची भव्य वास्तू व त्या भोवतालचा परिसर देखणा तर आहेच, परंतु कॉलेजच्या विद्यार्थ्यांत व प्राध्यापक मंडळींत नवीन परिवर्तनाची जाणीव व अगत्यपूर्वक करीत असलेले प्रयत्न पाहून आनंद झाला.

नारायण सुर्वे
१-८-८१

गेल्या काही वर्षांत पदव्युत्तर विभागांचा या महाविद्यालयात जो विकास झाला आहे तो अभिनंदनीय आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या विविध योजनांत हे महाविद्यालय सहभागी झाले आहे ही विशेष समाधानाची गोष्ट आहे.

प्रा. ग. प्र. प्रधान
२७-९-८१

I could learn a few lessons from the successful efforts this college has made in planning so extensively for development.

**Prin. K. Bhogishayana**
Sangameshwar College, Solapur
19-2-82

संस्थेचा परिसर रमणीय आणि विद्यार्जनाला स्फूर्तिदायक आहे आणि तीच प्रसन्नता येथील प्राध्यापकांच्या मुद्रेवरही फुललेली आहे. कल्पक धडाडीचे नेतृत्व आणि कष्टाळू ध्येयवादी प्राध्यापकांचे सहकार्य यामुळे संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होत जाईल याबद्दल खात्री वाटते.

प्रा. वसंत कानेटकर
२४-२-८२

या महाविद्यालयाची अशीच जोमाने प्रगती होत राहो व या भागातील शैक्षणिक, सांस्कृतिक व विकासकार्यात हे प्रगत केन्द्र बनो ही सदिच्छा.

प्रा. डॉ. राम ताकवले
कुलगुरू, पुणे विद्यापीठ
७-३-८२

हे महाविद्यालय वर्धिष्णु आहे. प्राचार्य प्रयत्नशील आहेत. संचालक मंडळ उत्साही आहे. प्राध्यापकांची साथ आहे.
थोडक्यात : हे महाविद्यालय हा एक शैक्षणिक वाद्यवृंद आहे. येथे निर्माण होणाऱ्या संगीताला तोड नाही. तुलना नाही.

प्राचार्य शिवाजीराव भोसले
७-३-८२

विस्तृत परिसर, नियोजनबद्ध विस्तार योजना, प्राचार्य व प्राध्यापक यांची एक विचाराने काम करण्याची पद्धती यामुळे ग्रामीण भागात असूनही एका नामवंत कॉलेजचा दर्जा या महाविद्यालयाने प्राप्त केला आहे.

ना. शंकरराव जगताप
उपसभापती, विधानसभा, महाराष्ट्र राज्य
२६-९-८२

या विद्यालयाच्या प्राचार्यांचा आणि प्राध्यापकांचा जनता संपर्क आणि व्यावहारिक प्रश्नांशी असलेले संबंध खूपच वाखाणण्यासारखे आहेत. आपल्या देशात बव्हंशी शिक्षण आणि व्यवहार यांची प्रभावी सांगड दिसून येत नाही. तथापी हे महाविद्यालय त्याला अपवाद दिसते... हे विद्यालय बहुविध राष्ट्रीय समस्यांवर अधिकाधिक विचारमंथन करून राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यास मदत करील अशी अपेक्षा करू या.

मा. श्री. अण्णासाहेब शिंदे
२६-२-८३

समाजात जे बदल होत असतात त्यांचा प्रवास ‘वरून खाली’ होत असतो, हा पं. नेहरूंचा विचार मला मोलाचा वाटतो. शिक्षणक्षेत्रात अपेक्षित बदल होण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षकांना खूप काही करता येईल. या महाविद्यालयाकडून असा आदर्श नजीकच्या काळात निर्माण होईल अशी आशा येथील एकूण शैक्षणिक वातावरण पाहून मनात जागी झाली.

वि. वि. चिपळूणकर
शिक्षण संचालक
५-३-१९८३

I noticed that the college has made progress in many a field of academic activities. It is indeed as every college should be a place where excellence in life is being cultivated.

**Prof. R. K. Kanbarkar**
Vice-Chancellor
Shivaji University, Kolhapur.
18-3-83

'अनेकान्त'च्या गेल्या दोन अंकांतील आपल्या अनुचिन्तनाचे सूत्र 'अनेकान्त' हेच आहे.

वस्तू अनंत धर्मात्मक असते. आपल्या मर्यादित बुद्धीने तिचे पूर्ण आकलन होऊ शकत नाही.

अनंत गुणधर्मांनी युक्त असे वस्तुस्वरूप, विपर्यास न करता, यथार्थपणे समजून घ्यायचे असेल तर वास्तवाकडे पाहायची आपली दृष्टी 'अनेकान्तात्मक' असली पाहिजे.

ही अनेकान्तात्मक दृष्टी, विराट वस्तुतत्त्व समजून घेताना, सत्याचा केवळ अंश ग्रहण करू शकणाऱ्या आपल्या वेगवेगळ्या दृष्टिकोणांतील सापेक्षता आधी ध्यानात घेते. वस्तूच्या एका गुणाचा विचार करताना अन्य विरोधी गुणांचे अस्तित्व ती विसरत नाही.

हे ८०-८१ च्या अंकातील चिन्तनाचे विचारसूत्र आहे. तर ८१-८२ च्या अंकात चिन्तनाचा विषय आहे 'अनेकान्तमयी वाणी'.

वास्तवाकडे पाहण्याची दृष्टी अशी व्यापक बनली की आपली अभिव्यक्तीची पद्धतीही बदलते. ती दुराग्रही वा एकांगी राहात नाही.

आपल्याला जाणवलेलं सत्य निरपेक्ष किंवा संपूर्ण नाही, तर ते आपल्या विशिष्ट हेतूच्या संदर्भातील सत्य आहे हे समजलं की ते व्यक्त करताना आपली वाणी दुसऱ्या बाजूचं भान जागे ठेवणाऱ्या सावध सापेक्ष पद्धतीचा स्वीकार करते. हीच 'अनेकान्तमयी वाणी'.

या अंकातील चिन्तनाचे सूत्र आहे 'सिद्धिरनेकान्तात्'.

प्रत्येक वस्तू क्षणाक्षणाला बदलत असते. एक रूप नाश पावते, तर त्याच क्षणी दुसरे रूप निर्माण होते. पण हा नाश, ही निर्मिती त्या वरवरच्या बदलणाऱ्या रूपापुरतीच असते. वस्तूचे मूळ स्वरूप नाशही पावत नाही व निर्माणही होत नाही. उत्पत्ती, नाश व ध्रुवता तिन्ही एकाच वस्तूच्या ठायी असतात. म्हणूनच ती अनंत गुणांनी युक्त असते. बदलणाऱ्या रूपाच्या दृष्टीने ती क्षणभंगुर, अनित्य असते, तर मूळ स्वरूपाच्या दृष्टीने शाश्वत नित्य असते. सामान्यत्वाच्या अपेक्षेने अभिन्न असते, तर विशेषत्वाच्या अपेक्षेने भिन्न असते. एवढेच नव्हे तर, स्व-रूपाच्या दृष्टीने तिचे अस्तित्व असते, तर पर-रूपाच्या दृष्टीने ती नसतेही.

वस्तू अशा प्रकारे परस्पर विरोधी वाटणाऱ्या अनंत गुणांनी युक्त असते म्हणूनच ती कार्यकारी असते. म्हणूनच हे संसारचक्र अविरत सुरू आहे.

वस्तूच्या एकाच अवस्थेकडे पाहून, तेवढेच पूर्ण सत्य मानून वस्तुस्वरूप तसेच आहे असा एकांगी आग्रह धरला तर त्यातून तत्त्वतः काहीच निष्पन्न होत नाही, तो कार्यकारी ठरत नाही. संसारचक्राचा उलगडाच होऊ शकत नाही. केवळ एकाच विवक्षित गुणधर्माची वस्तू कार्यकारी असू शकत नाही.

म्हणूनच म्हटले आहे, 'सिद्धिरनेकान्तात्' कोणत्याही कार्याची सिद्धी अनेकान्तानेच होऊ शकते.

नित्याच्या दैनंदिन व्यवहारातही हाच प्रत्यय येतो. लोकव्यवहाराचा 'अनेकान्त' हाच आधार आहे.

अहंकारी दुराग्रहाची विकृती दूर करणारे आणि अनेकतेत एकता व एकतेत अनेकता पाहण्याची निर्मल व विशाल दृष्टी देणारे अनेकान्त हे दिव्य अंजन आहे.

वस्तुस्वरूप अनेकान्तात्मक, ते समजून घेणारं ज्ञान अनेकान्तात्मक, आणि समजलेलं ज्ञान व्यक्त करणारी वाणी अनेकान्तमयी अशा तऱ्हेनं अनेकान्त हे समग्रतेचं व्यापक व पूर्णग्राही 'दर्शन' आहे.

++

हे महाविद्यालय वर्धिष्णु आहे. प्राचार्य प्रयत्नशील आहेत. संचालक मंडळ उत्साही आहे. प्राध्यापकांची साथ आहे.
थोडक्यात : हे महाविद्यालय हा एक शैक्षणिक वाद्यवृंद आहे. येथे निर्माण होणाऱ्या संगीताला तोड नाही. तुलना नाही.

**प्राचार्य शिवाजीराव भोसले**
७-३-८२

विस्तृत परिसर, नियोजनबद्ध विस्तार योजना, प्राचार्य व प्राध्यापक यांची एक विचाराने काम करण्याची पद्धती यामुळे ग्रामीण भागात असूनही एका नामवंत कॉलेजचा दर्जा या महाविद्यालयाने प्राप्त केला आहे.

**ना. शंकरराव जगताप**
उपसभापती, विधानसभा, महाराष्ट्र राज्य
२६-९-८२

या विद्यालयाच्या प्राचार्यांचा आणि प्राध्यापकांचा जनता संपर्क आणि व्यावहारिक प्रश्नांशी असलेले संबंध खूपच वाखाणण्यासारखे आहेत. आपल्या देशात बव्हंशी शिक्षण आणि व्यवहार यांची प्रभावी सांगड दिसून येत नाही. तथापी हे महाविद्यालय त्याला अपवाद दिसते... हे विद्यालय बहुविध राष्ट्रीय समस्यांवर अधिकाधिक विचारमंथन करून राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यास मदत करील अशी अपेक्षा करू या.

**मा. श्री. अण्णासाहेब शिंदे**
२६-२-८३

समाजात जे बदल होत असतात त्यांचा प्रवास 'वरून खाली' होत असतो, हा पं. नेहरूंचा विचार मला मोलाचा वाटतो. शिक्षणक्षेत्रात अपेक्षित बदल होण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षकांना खूप काही करता येईल. या महाविद्यालयाकडून असा आदर्श नजीकच्या काळात निर्माण होईल अशी आशा येथील एकूण शैक्षणिक वातावरण पाहून मनात जागी झाली.

**वि. वि. चिपळूणकर**
शिक्षण संचालक
५-३-१९८३

I noticed that the college has made progress in many a field of academic activities. It is indeed as every college should be a place where excellence in life is being cultivated.

**Prof. R. K. Kanbarkar**
Vice-Chancellor
Shivaji University, Kolhapur.
18-3-83

'अनेकान्त'च्या गेल्या दोन अंकातील आपल्या अनुचिन्तनाचे सूत्र 'अनेकान्त' हेच आहे.

वस्तू अनंत धर्मात्मक असते. आपल्या मर्यादित बुद्धीने तिचे पूर्ण आकलन होऊ शकत नाही.

अनंत गुणधर्मांनी युक्त असे वस्तुस्वरूप, विपर्यास न करता, यथार्थपणे समजून घ्यायचे असेल तर वास्तवाकडे पाहायची आपली दृष्टी 'अनेकान्तात्मक' असली पाहिजे.

ही अनेकान्तात्मक दृष्टी, विराट वस्तुतत्त्व समजून घेताना, सत्याचा केवळ अंश ग्रहण करू शकणाऱ्या आपल्या वेगवेगळ्या दृष्टिकोणांतील सापेक्षता आधी ध्यानात घेते. वस्तूच्या एका गुणाचा विचार करताना अन्य विरोधी गुणांचे अस्तित्व ती विसरत नाही.

हे ८०-८१ च्या अंकातील चिन्तनाचे विचारसूत्र आहे. तर ८१-८२ च्या अंकात चिन्तनाचा विषय आहे 'अनेकान्तमयी वाणी'.

वास्तवाकडे पाहण्याची दृष्टी अशी व्यापक बनली की आपली अभिव्यक्तीची पद्धतीही बदलते. ती दुराग्रही वा एकांगी राहात नाही.

आपल्याला जाणवलेलं सत्य निरपेक्ष किंवा संपूर्ण नाही, तर ते आपल्या विशिष्ट हेतूच्या संदर्भातील सत्य आहे हे समजलं की ते व्यक्त करताना आपली वाणी दुसऱ्या बाजूचं भान जागे ठेवणाऱ्या सावध सापेक्ष पद्धतीचा स्वीकार करते. हीच 'अनेकान्तमयी वाणी'

या अंकातील चिन्तनाचे सूत्र आहे 'सिद्धिरनेकान्तात्'.

प्रत्येक वस्तू क्षणाक्षणाला बदलत असते. एक रूप नाश पावते, तर त्याच क्षणी दुसरे रूप निर्माण होते. पण हा नाश, ही निर्मिती त्या वरवरच्या बदलणाऱ्या रूपापुरतीच असते. वस्तूचे मूळ स्वरूप नाशही पावत नाही व निर्माणही होत नाही. उत्पत्ती, नाश व ध्रुवता तिन्ही एकाच वस्तूच्या ठायी असतात. म्हणूनच ती अनंत गुणांनी युक्त असते. बदलणाऱ्या रूपाच्या दृष्टीने ती क्षणभंगुर, अनित्य असते. तर मूळ स्वरूपाच्या दृष्टीने शाश्वत नित्य असते. सामान्यत्वाच्या अपेक्षेने अभिन्न असते, तर विशेषत्वाच्या अपेक्षेने भिन्न असते. एवढेच नव्हे तर, स्व-रूपाच्या दृष्टीने तिचे अस्तित्व असते, तर पर-रूपाच्या दृष्टीने ती नसतेही.

वस्तू अशा प्रकारे परस्पर विरोधी वाटणाऱ्या अनंत गुणांनी युक्त असते म्हणूनच ती कार्यकारी असते. म्हणूनच हे संसारचक्र अविरत सुरू आहे.

वस्तूच्या एकाच अवस्थेकडे पाहून, तेवढेच पूर्ण सत्य मानून वस्तुस्वरूप तसेच आहे असा एकांगी आग्रह धरला तर त्यातून तत्त्वतः काहीच निष्पन्न होत नाही, तो कार्यकारी ठरत नाही. संसारचक्राचा उलगडाच होऊ शकत नाही. केवळ एकाच विवक्षित गुणधर्माची वस्तू कार्यकारी असू शकत नाही.

म्हणूनच म्हटले आहे, 'सिद्धिरनेकान्तात्' कोणत्याही कार्याची सिद्धी अनेकान्तानेच होऊ शकते.

नित्याच्या दैनंदिन व्यवहारातही हाच प्रत्यय येतो. लोकव्यवहाराचा 'अनेकान्त' हाच आधार आहे.

अहंकारी दुराग्रहाची विकृती दूर करणारे आणि अनेकतेत एकता व एकतेत अनेकता पाहण्याची निर्मल व विशाल दृष्टी देणारे अनेकान्त हे दिव्य अंजन आहे.


वस्तुस्वरूप अनेकान्तात्मक, ते समजून घेणारं ज्ञान अनेकान्तात्मक, आणि समजलेलं ज्ञान व्यक्त करणारी वाणी अनेकान्तमयी अशा तऱ्हेनं अनेकान्त हे समग्रतेचं व्यापक व पूर्णग्राही 'दर्शन' आहे.

++

## अभिवादन !



श्रीमान शेठ वालचंद हिराचंद
जन्मशताब्दी निमित्ताने
विनम्र आदरांजली



डॉ. एस्. एस्. भिर्डी, जयसिंगपूर
अमृतमहोत्सव
।। जीवेत शरदः शतम् ।।

'माझ्या समोरच्या श्रोत्यांत काही असे वाचक असतील की जे संभाव्य लेखक असतील, किंवा काही कोवळे कोंभ असे असतील की त्यांच्यात महावृक्षाचं आश्वासन असेल, त्यांना मी हेच सांगेन की, अनुभवाशी प्रामाणिक राहा. आणि स्वतःचीच अभिरुची साक्षी ठेवून लिहा. कुठलीही मळलेली वाट धरू नका. तुमची वाट तुमच्याच पायांना पाडू द्या. ही भूमी एवढी विशाल आहे की नव्या वाटेसाठी तिच्यावर नित्य जागा असतेच. कोणासारखे होण्यासाठी खपू नका, स्वतःला ओळखण्यासाठीच खपा. प्रतिभावंताची एकच प्रत निसर्ग काढतो आणि तो साचा मोडून टाकतो. एक झाड दुसऱ्या झाडासारखं नसतं. एक कलावंत दुसऱ्यासारखा नसतो. यशस्वी होण्याची घाई करू नका. अटीतटीच्या खटपटी करू नका, अनुकूल असा मोसम येताच वेलीला फळ धरतं. मोसम प्रत्येकाच्या बावतीत जवळचा किंवा दूरचा असू शकतो. खाजगी वा सरकारी पारितोषिकांना फार महत्त्व देऊ नका. रसिकांनी दिलेली दाद हे फारच श्रेष्ठ पारितोषिक असतं. समीक्षकाच्या मतामुळे खट्टू होऊ नका. ते त्याचं एकट्याचं मत असतं आणि अखेर तोही एक वाचकच असतो अखेर समीक्षा ही पाण्यावरची अक्षरं असतात, पाषाणावरची नव्हेत. जे सांगाल ते सोप्या मराठीत सांगा. सोपं लिहिणं ही फार कठीण गोष्ट असते. शब्दही नेमके येऊ द्यात .. तुमचं कुतूहल सतत जागं ठेवा. कसलीही कुंपणं घालून घेऊ नका .. तुम्ही जर स्वतःच्या स्वप्नांना अनुसरत, आत्मविश्वास बाळगून पुढं पुढं जात राहिला आणि स्वतः कल्पिलेलं जीवन जगू पाहण्याची धडाडी दाखवलीत, तर नेहमीच्या सामान्य वाटणाऱ्या घटनांतसुद्धा तुम्हांला लोकविलक्षण श्रेयाची प्राप्ती झाल्यावाचून राहणार नाही.'

**व्यंकटेश माडगूळकर**
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन
५७ वे अधिवेशन, अंबाजोगाई : ४ फेब्रुवारी ८३
अध्यक्षीय भाषणातून

'मार्क्स तत्त्वज्ञानाचा एक विशेष होता. ते एक मानवाच्या समग्र इतिहासाचे तत्त्वज्ञान होते– आणि ते मानवाच्या सर्व ऐतिहासिक अवस्थांचा वेध घेणारे तत्त्वज्ञान होते. ते गतिमान परिवर्तनशील जीवनाचा संदर्भ राखणारे तत्त्वज्ञान होते मार्क्सवाद हे नुसते आर्थिक परिवर्तनाचे तत्त्वज्ञान नव्हते. ते मानवाच्या समग्र परिवर्तनाचे तत्त्वज्ञान होते. ते जागतिक इतिहासाचे तत्त्वज्ञान होते, तसे या इतिहासाच्या केंद्रस्थानी असलेल्या मानवाचे तत्त्वज्ञान होते. ते मानवाच्या दैनंदिन जीवनकलहाचे तत्त्वज्ञान होते तसे ते मानवाच्या सांस्कृतिक संचिताचे आणि परिवर्तनाचे तत्त्वज्ञान होते. ते नुसते भांडवलशाहीच्या भेसूर स्वरूपाचे, त्या समाजरचनेतील अपरिहार्य पिळवणुकीचे, कामगारांच्या दैनंदिन लढ्याचे तत्त्वज्ञान होते असे नव्हे, तर ते समाजाच्या सर्व अंगोपांगांचे, त्याच्या आर्थिक घडामोडीचे, राजकीय प्रवाहांचे, सामाजिक स्थित्यंतराचे, वाङ्मयीनधारांचे, धार्मिक तात्त्विक विचारप्रणालींचे,– मानवी जीवनाच्या सर्व अंगांना सखोल स्पर्श करणारे तत्त्वज्ञान होते. ते मानवाचे तत्त्वज्ञान होते तसे सृष्टीचे होते, व्यक्तीचे होते तसे वर्गाचे होते, राजकीय होते तसे सामाजिक होते, आर्थिक विवंचनांचे होते तसे वैचारिक विभ्रमांचे होते. पण ते केवळ विचारांच्या अमूर्त पातळीवर नव्हते. व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाला येऊन भिडणारे असे ते होते . अंतःकरणे खेचून घेण्याची विलक्षण शक्ती अर्थातच त्यामुळे त्याच्यात आली होती.

**प्रभाकर पाध्ये**
मानव आणि मार्क्स पृ. २६–२७

# औद्योगिक भारताचे थोर शिल्पकार : शेठ वालचंद हिराचंद

**कु. हर्षा शहा**
एस्. वाय्. बी. कॉम्.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाकडे पाहताना प्रथम डोळ्यांसमोर उभे राहातात ते 'शेठ वालचंद हिराचंद.'

शेठ वालचंद हिराचंद यांच्या कर्तृत्वाचा इतिहास म्हणजे, गेल्या साठ वर्षांतील महाराष्ट्रातील औद्योगिक इतिहास घडविणारी ती एक प्रभावशाली व्यक्ती होती. शेठ वालचंदांच्या जीविताचे एकमेव ध्येय, भारताला आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देणे हे होते.

शेठ हिराचंद ह्यांचे महाराष्ट्रीयत्व कोणत्याही महाराष्ट्रीयाहून उणे पडणारे नव्हते. या थोर पुरुषाच्या छत्राखाली सोलापूर येथे २३ नोव्हें. १८८२ रोजी शेठ वालचंद यांचा जन्म झाला. वालचंदांच्या जन्मानंतर अवघ्या १५ दिवसांनी त्यांच्या मातोश्री 'राजुबाई' यांनी चिरनिद्रा घेतली व मातृसुखाला ते पारखे झाले. पण त्यांच्या चुलतीने– उमाबाई– यांनी ही उणीव भासू न देता आपल्या मायेच्या पदराखाली त्यांचे संगोपन केले.

आपल्या मुलांचे शिक्षण केवळ विद्यालयातील गुरूंवर न सोपवता शेठ हिराचंद स्वतः त्यांच्याकडे जातीने लक्ष देत. त्यामुळे शेठ वालचंद ह्यांचे पहिले विद्यागुरू हिराचंद स्वतः बनले. १८९९ साली मॅट्रिक्युलेशनची परीक्षा सोलापूरच्या सरकारी हायस्कूलमधून उत्तीर्ण झाल्यानंतर १९०० साली त्यांचा विवाह झाला. शेठ हिराचंदजींची, त्याचप्रमाणे स्वतः वालचंदांची इच्छा आपण उच्च शिक्षण घ्यावे अशी होती. त्याप्रमाणे ते 'सेंट झेवियर्स कॉलेज'मध्ये जाऊ लागले. परंतु १९०२ साली त्यांच्या कुटुंबावर प्लेगच्या साथीची करुण छाया पसरली. त्यात त्यांचे कर्ते भाऊ माणिकचंद व जिवराज दगावले. त्यामुळे त्यांचे वडील असहाय, विषण्ण झाले व धंद्यावरील त्यांचे लक्ष उडाले. ते पाहून त्यांनी वडिलांच्या विरोधाला न जुमानता उच्च शिक्षणाचा कायमचा निरोप घेतला.

त्यानंतर त्यांच्या वडिलांनी त्यांना व्यावसायिक शिक्षण देण्यास सुरवात केली. परंतु 'वडिले जे आचरिले तेच पुढे चालविले, ह्यात विशेष ते काय केले ?' 'आयत्या पीठावर बसून कारभार करण्यात बहादुरी ती कसली ?' 'स्वतःच्या बुद्धीच्या आणि मनगटाच्या जोरावर जो नवी राज्ये संपादून व स्वतंत्र पीठ निर्माण करून आपल्या धोरणानुसार कारभार करतो तोच खरा बहादूर !' अशी होती त्यांची खऱ्या पराक्रमी जीवनाची कल्पना. म्हणूनच त्यांनी पारंपारिक व्यवसाय क्षेत्राहून निराळीच व्यवसाय क्षेत्रे हुडकून काढून आपल्या साहसी वृत्तीला स्वतंत्र वाव दिला.

शेठ वालचंद यांना उद्योग-व्यवसायांची आवड होती. त्यांचा स्वभाव हट्टी, बाणेदार, धाडसी, कामसू, मनमिळावू, प्रामाणिक होता. औद्योगिक क्षेत्रात संधी मिळण्याची ते वाटच पाहात होते. त्यांना जास्त काळ वाट पाहावी लागली नाही. १९०४ साली ही संधी प्राप्त झाली. 'बार्शी लाइट रेल्वे' या नावाने ओळखला जाणारा रेल्वे रस्ता त्यांनी श्री. फाटक यांच्या सहकार्याने तयार केला. 'हार्बर ब्रँचचे रे रोड ते कुर्ला' हा रेल्वे रस्ता मुदतीच्या आत तयार करून त्यांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. रेल्वे कंपनीचे

उद्योग क्षेत्रातून पूर्णपणे निवृत्त झाले. उद्योग क्षेत्रातील झुंज त्यांनी संपविली, परंतु त्यांची दुसरी झुंज सुरु झाली.

मृत्यूशी त्यांनी शर्थीची झुंज दिली. पण अखेर त्यांच्यावर विषमज्वराने प्रखर हल्ला चढविला व आपले इच्छित साध्य केले. अशा या अचाट कर्तृत्वाच्या पुरुषाची इहलोकीची यात्रा सिद्धपूर येथे ८ एप्रिल १९५३ रोजी आटोपली.

वालचंदांच्या प्रयाणाबरोबरच भारतातील मोठ मोठ्या वैयक्तिक साहसांचे एक युगही संपले.

++

संदर्भ : वालचंद हिराचंद : श्री. गं. दे. खानोलकर

साहाय्य : कु. संगीता शहा
कु. विभावरी क्षीरसागर
एस्. वाय्. बी. कॉम्

---

"आपल्या औद्योगिक कर्तृत्वाने भूगर्भ, भूमी, पाणी आणि आकाशही पादाक्रांत करणाऱ्या आणि दूरदृष्टीने भारताच्या औद्योगीकरणाचा पाया घालणाऱ्या शेठ वालचंद हिराचंद यांचे स्थान जागतिक कीर्तीच्या रॉकफेलर, फोर्ड, ओनॅसिस, लॉर्ड नेफिल्ड या उद्योगपतींच्या मालिकेत शोभून दिसतो."

उपराष्ट्रपती **एम्. हिदायतुल्ला**

'मी त्या दिवसाची वाट पाहात आहे, ज्या दिवशी... परदेशांतून आणाव्या लागणाऱ्या हजारो वस्तू येथे निर्माण होत असलेल्या मला दिसतील. अशी ही निर्मिती जेव्हा होऊ लागेल तेव्हा या देशात उपाशीपोटी झोपी जावे लागणारा एकही माणूस, भिक्षा मागत फिरणारा एकही भिकारी आढळणार नाही. अमेरिकेसारख्या समृद्ध देशात असणारे उच्च राहणीमान आपल्याही देशात आढळेल. दारिद्र्यावस्था भूतकाळापुरती होती असे प्रत्ययाला येईल. कोठेही कोणालाही कशाची वाण न भासता सर्वत्र सुख व समृद्धी नांदू शकेल. ही स्थिती येण्यासाठी सरकारचे साहाय्य व शास्त्रशुद्ध राष्ट्रीय नियोजन आवश्यक आहे याची पूर्ण जाणीव मला आहे. आपणही सर्वांनी त्यासाठी कंबर कसून पुढे व्हायला हवे. चर्चा व वाद यामध्ये गुंतून न राहता आपण आपल्या इच्छा व अपेक्षा कृतीमध्ये आणायला हव्यात. आमच्यातील व्यापाऱ्यांनी व साहसी व्यक्तींनी आपले सारे लक्ष यापुढे नवनव्या औद्योगिक धाडसांत गुंतवायला हवे!'

**शेठ वालचंद हिराचंद**
६ ऑगस्ट १९४३
सोलापूर येथील देना बँकेच्या
शाखेच्या उद्घाटनप्रसंगी
केलेल्या भाषणातून



# वृक्षगंगा

**टी. ई. पवार**
एस्. वाय्. बी. ए.



'वृक्षगंगा' दिंडी १९ नोव्हेंबर, १९८२ पासून सुरू झाली. परंतु मी आणि माझे सहकारी मित्र या दिंडीत २७ नोव्हेंबरपासून सामील होणार होतो. त्या दृष्टीने तयारी जोरात चालली होती. सगळा प्रवास सायकलवर करणार होतो म्हणून सायकल २-३ वेळा दुरुस्त करून घेतली. थंडीचे दिवस असल्याने पुरेसे अंथरूण, पांघरूण, स्वेटर, मफलर असे बरेच साहित्य घेतले होते. शनिवारी जायचं म्हणून शुक्रवारी रात्रीपर्यंत सगळी तयारी पूर्ण केली. सकाळी मला लवकर उठवलं. मी कशीतरी अंघोळ करून कपडे घातले व निघण्याच्या तयारीला लागलो. घरून निघताना आई-वडिलांनी मला आशीर्वादपूर्वक निरोप दिला.

२७ नोव्हेंबरला मी, काकडे ए. जे., बनकर एस्. एस्., वनवे एन्. के. असे चौघेजण जाणार म्हणून कॉलेजने एक छोटासा कार्यक्रम आयोजित केला होता. माझे एन्. एस्. एस्. मधील मित्र-मैत्रिणी, प्राध्यापकवर्ग आम्हांला निरोप द्यायला आले होते. विद्यार्थी बंधू-भगिनी, प्राध्यापक, अध्यक्ष यांनी प्रोत्साहनपर अशी भाषणे केली. नंतर मुलींनी आम्हा चौघांना ओवाळले. अध्यक्षांनी आमचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. हा कार्यक्रम झाल्यावर सर्वजण आम्हांला वेशीपर्यंत सोडायला आले व त्यांनी शेवटचा निरोप दिल्यावर आम्ही प्रवासाला सुरवात केली. हा कार्यक्रम मला फार आवडला. ह्या कार्यक्रमामुळे मला स्फूर्ती मिळाली म्हणूनच मी हा साहसाचा प्रवास करू धजलो. नाहीतर ५५१ कि. मी. चा प्रवास म्हटल्यावर मी ळमळलो होतो.

आमचा प्रवासाचा मार्ग भिगवण, राशिन, कर्जत, नगर, शेवगाव, पैठण असा होता. ह्या दिंडीची सांगता ३० नोव्हें. १९८२ रोजी पैठण येथे होणार होती. वाटेने जाताना एखादं गाव आलं की आम्ही चौघेजण थांबत होतो आणि गावकऱ्यांना वृक्षारोपण व कुटुंब-नियोजन ह्यांचे महत्त्व पटवून देत होतो.

वृक्षगंगा संस्थेने वृक्षारोपण, कुटुंब-नियोजन, एक गाव एक पाणवठा, हुंडा-विरोध यांचा प्रचार व इतर दुष्ट सामाजिक प्रथांचे निर्मूलन इत्यादी उद्दिष्टे स्वीकारली आहेत. 'मानवांनीच निर्माण केलेली ओसाड वाळवंटे, सांस्कृतिक ऱ्हास व सामाजिक विघटन थांबविण्याकरिता स्नेहल आणि मंगलमय वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवत आहे. त्याकरिता वृक्षारोपण व कुटुंब-नियोजन यांशिवाय दुसरा तरणोपाय आजतरी धूसर क्षितिजावर दिसत

नाही.' तसेच 'दीर्घकालीन होणाऱ्या आघातामुळे सर्वच तऱ्हेचा ऱ्हास दिसून येत असला तरी भारतीय परंपरेत धार्मिक श्रद्धेचा झरा अखंडपणे वाहत आहे. ज्ञानराज माऊलीच्या पादुका पालखीमध्ये नाचत-गाजत आजही पंढरपूरला जातात. कावेरीची कावड महादेवाच्या पिंडीवर आजही प्रयागराज येथे जाते. भारतियांच्या धार्मिक परंपरेचा हा सोहळा देशाच्या प्रत्येक भागात साजरा होत असतो. परंतु या धार्मिक रूढींना नवनिर्मितीची जोड देणे आवश्यक आहे.' या विचाराने प्रेरित होऊन अशा प्रकारचा प्रयोग 'मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालय', चंद्रपूर, १९८० सालापासून ५१ कि. मी. ची पदयात्रा काढून राबवीत आहे. १९८१ साली सोमनाथ येथे झालेल्या राष्ट्रीय योजना शिबिरात युवाशक्तीची जोड मिळाली. तरुणाईला एक नवीन आव्हान मिळाले. युवाशक्तीस राष्ट्राच्या नवनिर्मितीच्या कार्याची नवीन दिशा मिळाली. नवनिर्मितीची क्षितिजे विस्तारली. महाराष्ट्र राज्यात सर्व कानाकोपऱ्यांत हा लोकशिक्षणाचा व लोकजागरणाचा संदेश पोचविण्याकरिता 'मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालयाने' पैठण दिंडीची कार्ययोजना व आराखडा राष्ट्रीय सेवा योजनेस १९८१ साली सादर केला. २५ जून, १९८२ च्या प्राथमिक सभेत पैठण दिंडीचा निर्धार कायम झाला. त्यानंतर ८ जुलै १९८२ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक, मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालयाचे प्रतिनिधी, इतर जागरूक नागरिक यांची सभा आनंदवनात नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू श्री. जी. बी. कदम यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत श्री. बाबा आमटे यांनी मार्गदर्शन केले आणि यातूनच 'वृक्षगंगा' या संस्थेची स्थापना झाली. वृक्षारोपण व कुटुंबकल्याण ह्या द्विसूत्री कार्यक्रमाविषयी लोकशिक्षण व लोकजागरण करण्याकरिता 'बालतरू' पालखीचे माध्यम निश्चित केले.

समाजजागृतीचे हे कार्य करण्यासाठीच आम्ही या 'बालतरू' पालखीत सहभागी झालो होतो. वाटेने जाताना प्रत्येक माणूस आमच्या सायकलचे बोर्ड, पिशव्या व इतर साहित्य पाहून थांबायचा, चौकशी करायचा. गावातली लहान मुलं धावत येऊन रस्त्याच्या कडेला उभे राहून बघत. आम्ही बारा वाजता राशिन गावामध्ये पोहोचलो. दुपारचं जेवण तिथेच करायचं ठरवलं. तिथं एका मंदिरात आम्ही जेवण केलं आणि पाणी पिण्यासाठी हॉटेलमध्ये गेलो. आमचा हा वेष (सायकल, हाफ टी शर्ट, हाफ पँट, बॅगा, काठी) पाहून त्या हॉटेल मालकाने आमची चौकशी केली आणि आम्हांला पाणी तर दिलेच परंतु चहा देऊन स्वागत केले. हा एक चांगला अनुभव प्रवासात आला. आमचा पहिला मुक्काम कर्जतमध्ये झाला. दिवसभर ५०-६० मैलांचा प्रवास केल्याने अंथरुणावर पडल्या पडल्याच मला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मित्रांनी मला लवकर उठवलं. काल जेवढा प्रवास केला तेवढाच आज पण करायचा होता. कर्जतमध्ये सकाळी वृक्षारोपणाचा कार्यक्रम केल्यावर गावातून आम्ही घोषणा देत-देत नगरच्या रस्त्याला लागलो. कर्जतमधील दोन विद्यार्थी आमच्याबरोबर या दिंडीत सामील झाले. हे दोघेही मनमिळाऊ होते. त्यांनी आम्हांला शेवटपर्यंत साथ दिली. वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक गावाचा सर्व्हे केला. गावातील लोकसंख्या किती, सुशिक्षितांचे प्रमाण किती, प्रमुख व्यवसाय कोणता, सरकारी दवाखाने आहेत का, गावात जातीयता पाळली जाते का, अशा स्वरूपाचा सर्व्हे करत करत आम्ही चाललो होतो. एका गावात आम्ही दुपारच्या जेवणाकरिता थांबलो होतो, तेथे फार विचित्र अनुभव आला. तेथील मंदिरात हरिजनांना जाण्याची परवानगी नव्हती. त्यांच्या पिण्याच्या पाण्याची विहीर पण वेगळी होती. हा प्रकार पाहून मी फार अस्वस्थ झालो. आम्ही गावकऱ्यांना भेटून हे सर्व बंद केले पाहिजे असं समजावून सांगितलं व पुढे निघालो. असे विविध अनुभव घेत-घेत आम्ही नगरमध्ये पोहोचलो. 'सारडा महाविद्यालया'च्या वसतिगृहात राहण्याची सोय केली होती, तर त्याच महाविद्यालयाच्या उपाहारगृहामध्ये जेवणाची व्यवस्था केली होती.

नगरमध्ये त्या दिवशी दिंडीत सामील होणारांची संख्या १००० पर्यंत झाली होती. २९ नोव्हेंबरला सकाळी नगरमधील जागरूक नागरिक, महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनी आमचे समारंभपूर्वक स्वागत



केले व पुढे जाण्याचा मार्ग सांगितला. दोन दिवस प्रवास केल्याने मी फार थकून गेलो होतो. सायकलवर बसू वाटत नव्हते. नसतो आलो तर बरे झाले असते असेही वाटले. परंतु अशी संधी परत येणार नाही या जाणिवेने मी तसाच सायकल जोराने चालवत पुढे निघालो. नगर ते शेवगाव हे अंतर ६५ कि. मी. होते. रस्ताही खराब होता. वाटेने मोठे-मोठे चढ-उतार होते. चांदबिबीचा घाट फार मोठा आहे. तो आम्ही कसातरी पार करू शकलो. घाट उतरत असताना मला फार भीती वाटली. खोल दऱ्या पाहून डोळे गरा-गरा फिरायचे. एका मागे एक अशा शेकडो सायकली पाहून लोकांना आश्चर्य वाटायचे. त्या दिवशी आमच्या न्याहरीची व्यवस्था तिसगावमधील श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यातर्फे एका छोट्याशा खाणावळीत केली होती. जेवणानंतर आम्ही पुन्हा सायकलवर बसलो ते शेवगावमध्येच सायंकाळी उतरलो. तिथे आमचे बँड-ताशे वाजवून स्वागत करण्यात आले. हा आमचा तिसरा मुक्काम शेवगावमध्येच झाला. कॉलेजसमोर मोठा मंडप घातला होता आणि लाउडस्पीकर पण चालू होता. हे वातावरण पाहून मी फार आनंदित झालो. रात्री जेवणानंतर भजन, प्रवचन, लोकनाट्य इत्यादी माध्यमांतून सांस्कृतिक देवाण-घेवाण घडवून आणण्याच्या दृष्टीने काही कार्यक्रम झाले परंतु हे कार्यक्रम पाहता-पाहताच मी झोपलो.

शेवगावमध्ये बालतरूंची संख्या १६०० ते १७०० च्या दरम्यान होती. शेवगावच्या नागरिकांनीही आमचे समारंभपूर्वक स्वागत करून आम्हांला निरोप दिला. वाटेतील गावांना माहिती देत-देत आम्ही पैठण जवळ करू लागलो.

मौजे घोटण येथे गावकऱ्यांनी ठिकठिकाणी कमानी उभारून स्वागत केले व प्रत्येकाला अल्पोपाहार दिला. तेथे फार गंमत झाली. आम्ही गावकऱ्यांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व सांगत असताना ऐकणारे खेडूत हळूहळू पसार होऊ लागले. त्यांना वाटले आम्ही प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करायलाच आलो आहोत.

पैठणमध्ये आमचे टाळ, मृदंग व भजन यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. पैठणमधील भगिनींनी प्रत्येक बालतरूला ओवाळले. भेटीगाठीचा कार्यक्रम झाल्यावर आम्ही पैठण शहरामधून 'वन मॅन-वन ट्री', 'जायेंगे भाई जायेंगे। पेड लगाके जायेंगे', 'हम सब एक है', 'बालतरूंचा विजय असो', 'दारू सोडा मटका सोडा। जातीयतेचे बंधन तोडा', 'लावा रे लावा। झाडे लावा', 'तिकडे एशियाड। इकडं झाडच झाड' अशा घोषणा देत बालतरूंची पालखीतून मिरवणूक काढली. पैठणमधील नागरिकांनी ठिकठिकाणी कमानी उभारून, तर कोणी फटाके वाजवून, तर कोणी अल्पोपाहार देऊन आमचे स्वागत केले. शेवटी ही मिरवणूक एका धर्मशाळेपुढे थांबली. तेथे आमच्या जेवणाची सोय केली होती. प्रत्येक विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय वेगळी केली होती. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे– पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर आणि मराठवाडा तसेच कृषी विद्यापीठे– अकोला, परभणी, राहुरी आणि दापोली, अशा या सर्व विद्यापीठांतगत महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या संघटनेचा या दिंडीत सहभाग होता. त्यामुळे तेथे यात्रिकांची (विद्यार्थ्यांची) संख्या इतकी वाढली की सर्व शाळा– कॉलेजमध्ये राहायला जागाच शिल्लक उरली नाही. मराठवाडा विद्यापीठातील यात्रिकांची सोय केली, तर कोल्हापूर महाराजांच्या मंदिरात विद्यापीठातील विद्यार्थ्यांची सोय एका मशिदीत केली होती. आमची (पुणे विद्यापीठाची) राहण्याची सोय एकनाथ हायस्कूलमध्ये केली होती.

सायंकाळी आम्हांला जायकवाडी प्रकल्पावर नेऊन त्या प्रकल्पासंबंधी माहिती सांगितली. नंतर शेजारील ज्ञानराज माऊली उद्यानात वृक्षारोपण केले व आम्ही निवासस्थानी परत आलो. दुपारी त्यांनी आम्हांला मसालेभात, वांग्याची भाजी, चपाती असे रुचकर जेवण दिले तसेच रात्री पण छोटेसे जेवण देऊन आम्हांला समाधानी केले.

१ डिसेंबरला सकाळी ८ वाजता कालच्याप्रमाणेच पालखीत बालतरू ठेवून घोषणा देत देत आम्ही पैठणमधून वाघाडीकडे निघालो. वाघाडी हे ८ कि. मी. अंतरावर असल्याने सर्वजण सायकलवर निघाले. वाघाडी येथे वृक्षारोपणाची भव्य तयारी केली होती. सर्व विद्यार्थी एकत्रित झाल्यावर १०-१२ जणांचा ग्रूप एकत्र घेऊन, वृक्ष कसे लावायचे याबद्दल काही सूचना

देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम ताकवले यांच्या हस्ते झाले. त्यांनी भाषण वगैरे केले नाही तर प्रत्यक्ष वृक्षारोपण करूनच उद्‌घाटन केले. मग आम्हीही कामास सुरवात केली. पाहता पाहता हजारो वृक्ष जमिनीवर उभे राहिले. वृक्षारोपण करीत असताना स्पीकरवर स्फूर्तिगीते सुरू होती. प्रत्येकजण आळस झाडून काम करत होता. वृक्षारोपणाचे हे काम सतत दोन-तीन तास चालू होते. नंतर मौजे वाघाडी येथील नागरिकांनी शीतपेय देऊन आम्हांला निरोप दिला. पैठणला परत आल्यावर आम्ही तिथल्या रहिवाशांना ह्या कार्यक्रमाची सर्व उद्दिष्टे सांगितली. रात्री जेवणानंतर लोकशिक्षण व लोकजागरणाकरिता लोकनृत्य, लोकगीत, गायन, वादन, चर्चा, नकला असा विविध करमणुकीचा कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रार्थना झाल्यावर पैठणकरांनी पुन्हा एकदा आमचे स्वागत केले व परत येण्यास निरोप दिला.

ह्या वृक्षगंगा दिंडीमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला वृक्षारोपणाचे व कुटुंब-नियोजनाचे महत्त्व चांगले पटले आहे. ह्या वृक्षगंगा दिंडीचा माझ्या मनावरील परिणाम कधीही पुसला जाणार नाही. ह्या दिंडीमुळेच मी शेकडो मैल सायकलवर प्रवास करून पैठण येथे पोहोचलो. वृक्षाचे महत्त्व तर मला इतके पटले आहे की ते मरेपर्यंत विसरणार नाही व समाजालाही विसरू देणार नाही. त्यासाठी मी अविरत कष्ट करीन. ह्या कार्यक्रमात सहभागी झाल्यामुळे आपणात एक प्रकारची क्रांतीच झाली आहे असे मला वाटते आणि ही क्रांतीची ज्योत मी मरेपर्यंत माझ्या हृदयात तेवत ठेवीन.

अशा प्रकारचा अभूतपूर्व कार्यक्रम प्रथम महाराष्ट्राच्या भूमीवर झाला याचा मला अभिमान वाटतो आणि त्याहीपेक्षा मला जास्त आनंद ह्या दिंडीत सहभागी झाल्याने होतो आहे. या अपूर्व कार्यक्रमास व्यापक प्रसिद्धी मिळणे आवश्यक आहे. हे महत्त्वाकांक्षी सांस्कृतिक अभियान केवळ महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता सर्व देशभर पसरले पाहिजे असे मला वाटते.

++

क्रांतीचे नाते निर्मितीशी आहे,
विनाशाशी नाही.
तिचा चेहरा घामानं डंवरलेला आहे,
रक्तानं माखलेला नाही.
घामानं डंवरलेला तरुणाईचा चेहरा हाच
क्रांतीचा चेहरा आहे.
**—बाबा आमटे**

निर्मितीचं एक नातं जमिनीशी आहे
कारण तीच आहे जन्मदात्री साऱ्या भविष्याची
मातीशी इमान सांगणारे युवकांचे तांडे
प्रेरणांच्या तरफांवर उद्याची क्षितिजं उजळीत
अन् ओसपणाचे कोसचे कोस तुडवीत
जेव्हा निघतील दहा दिशांनी
दऱ्याखोऱ्यांतून आपले निश्वास उतरवीत
तेव्हा ही धरित्री होईल
सुजलाम् सुफलाम् मंगलदायिनी
**—बाबा आमटे**



# अणुबाँबची संहारक शक्ती

**प्रवीणसिंग पी. पाटील**
एम्. कॉम्. II

सर्वसामान्य माणसाला अणुयुद्धाची भयानकता समजलेली नाही ही खरी शोकांतिका आहे. कारण सर्वसामान्य माणसाला या भयानकतेची कल्पना पूर्णपणे कुणी दिलेलीच नाही. ती कल्पना या लेखाद्वारे यावी अशी अपेक्षा आहे.

आज साऱ्या जगभर अणुबाँबला प्राणपणाने विरोध करणारी एक चळवळ फोफावते आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जपान यांची गोष्ट सोडा, अगदी रशियातसुद्धा या चळवळीने मूळ धरलं आहे. फार मोठ्या सभा होतात. मोठी निदर्शने होतात. अणुबाँबची महाभयानकता सांगत, वाटेल ती किंमत मोजून अणुबाँबवर अगदी एकतर्फी बंदी घाला म्हणून आग्रह धरतात. त्यात मोठे-मोठे शास्त्रज्ञ व विचारवंतही आहेत.

आइनस्टाइनसारखा शास्त्रज्ञ म्हणाला होता, "विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाने जगाला म. गांधी आणि अणुबाँब दिलेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात यातील कोणाला आपण स्वीकारणार आहोत हे ठरवायचे आहे." एक मोठे लोकशाहीवादी शास्त्रज्ञ रुदरफोर्ड यांनीही म्हटले होते, "अणुबाँब विरुद्ध मनुष्यजात असे एक महाभयानक युद्ध आता सुरू झालं आहे. या युद्धात तुम्ही कुणाच्या बाजूने आहात हे तुम्हांला ठरवायचं आहे." हा मोठा निर्णय त्यांनी आपणांवर सोपवला आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपण वावरत असल्याने ही सारी जबाबदारी आपल्यावर पडली आहे. अर्थात आपण कोणताही निर्णय घ्यावयास मोकळे आहोत.

तसे पाहिले तर अणुयुद्ध झाले तर पाच-दहा मिनिटांत संपूर्ण जगाचा नाश होईल, हे वाक्य आपण सहज बोलून जातो. ते वाक्य अनेक वेळा वापरून आता गुळगुळीत झाले आहे. पण जे घडणार आहे ते यापेक्षा अनेक पटींनी महाभयंकर आहे. नरकाची कल्पना मांडणाऱ्यांनासुद्धा ज्या कल्पना स्वप्नातही सुचल्या नसत्या अशा गोष्टी प्रत्यक्षात उतरणार आहेत. तुम्ही आम्ही, आपली पोरेबाळे कोणत्याही क्षणी त्यांची वा इतर कोणाची काहीही चूक नसताना त्यात बळी पडणार आहोत.

आज जगात किमान ५० हजार अणुबाँब आहेत असा अंदाज आहे. हिरोशिमा, नागासाकी येथे फोडलेले बाँब्स् त्यांच्यासमोर खेळण्यातले बाँब्स् वाटावेत अशी त्यांची विध्वंसक शक्ती आहे. हिरोशिमा, नागासाकी येथे फोडलेले बाँब्स् अनुक्रमे प्रत्येकी दहा आणि वीस किलो टन 'टी.एन्.टी.' एवढ्या शक्तीचे होते. टी.एन्.टी. म्हणजे 'ट्राय नायट्रो टोल्युइन' हा रासायनिक पदार्थ. एक टन ट्राय नायट्रो टोल्युइनमधून जी विध्वंसक शक्ती निर्माण होते, त्याला एक टन टी.एन्.टी. असे म्हणतात. एक किलो टन म्हणजे हजार टन टी. एन्. टी. म्हणजेच नागासाकी येथे फोडलेल्या अणुबाँबची विध्वंसक शक्ती वीस हजार टी.एन्.टी. एवढी होती. आज अणुबाँब निर्माण करणारे असल्या मामुली आकड्यांत बोलत नाहीत. मेगॅटन हा नवा मापक (शब्द) आज वापरला जातो. एक मेगॅटन म्हणजे दहा लाख टन. आजच्या अणुबाँबची विध्वंसक शक्ती किमान १००-२०० मेगॅटन टी.एन्.टी. एवढी असते. हे बाँब्स् काय करतील हे समजावून घ्यावयाचे असेल तर प्रथम हिरोशिमाला काय झाले हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

डॉ. रॉबर्ट जे. लिफ्टन यांनी आपल्या 'डेथ इन लाइफ– सरव्हायवर्स ऑफ हिरोशिमा' या पुस्तकात म्हटले आहे "शहराच्या मध्यभागी १८०० फूट उंच हवेत बाँब फुटला त्या जागेपासून तीन कि. मी. अंतरावरील घरे, शाळा, बाजारपेठा, रुग्णालये इ. इमारती, सारे काही पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळून आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. तीन ते पाच कि. मी. अंतरावरील निम्म्याहून अधिक इमारती जमीनदोस्त झाल्या. जवळजवळ नव्वद हजार इमारती नाहीशा झाल्या. स्फोटातून बाहेर पडलेल्या आगीच्या धगीमुळे माणसे कापरासारखी जळून गेली. ती स्फोटापासून किती अंतरावर होती व त्या वेळी त्यांनी कोणते कपडे घातले होते यावर हे जळणे अवलंबून होते. स्फोटामुळे कोसळणाऱ्या इमारतींतून बंदुकीच्या गोळ्यांप्रमाणे बाहेर उडणाऱ्या काचांचे आणि धातूंचे तुकडे जिवंत व मृत माणसांच्या अंगात रुतून बसले.

अडीच लाख वस्तीच्या या शहरातील एक लाख लोक या बाँबने मरून गेले. त्यांपैकी सुमारे २५ हजार कापरासारखे जळाले होते. सुमारे ५० हजार कोसळणाऱ्या इमारती आणि उडणारे धातूंचे तुकडे यांची शिकार बनले होते. होणाऱ्या किरणोत्सर्गाने २० हजार लोक मेले होते."

या अग्निप्रलयातून वाचलेल्या लोकांच्या आठवणी संकलित करणारे आणखी एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. ते म्हणजे 'अन्फरगेटेबल फायर.' या पुस्तकात नोंदलेले काही मोजके अनुभव असे– 'सकाळी आठ वाजून सोळा मिनिटांनी हिरोशिमावर बाँब फुटला. सव्वाआठपर्यंत सारे शहर कसे नेहमीच्या कार्यक्रमात मग्न होते. छोटी मुले कपडे करून शाळेत जात होती. आई स्वयंपाकघरात गुंतली होती. आठ वाजून वीस मिनिटांनी शहरात उरली होती जळलेली प्रेते, हाडांचा ढीग, जळालेल्या मांसाचा वास, ढिगाऱ्याखाली चेंगरलेली आणि होरपळून निघालेली माणसे. लहान मुले आई-बाबांना आणि आई-बाबा लहान मुलांना शोधत वेड्यासारखे ते ढीग उकरत हिंडत होते."

असे हे अनुभव उलट्या काळजाच्या माणसालाही अस्वस्थ करून टाकणारे आहेत. हिरोशिमामध्ये जे घडले ते एखाद्या वार्ताहराने टिपावे तसे जॉन हेरसे यांनी आपल्या 'हिरोशिमा' या पुस्तकात नोंदवले आहे. ते वाचले तर काळीज कितीही कठीण केले तरी वाचकांच्या काळजाचा ठोका चुकेल म्हणून ते वर्णन मुद्दाम मी टाळत आहे.

हा होता तात्कालिक झालेला संहार. पण अणुबाँबमधून होणाऱ्या किरणोत्सर्गाचे दुष्परिणाम पुढील पिढ्यांना देखील भोगावे लागले आहेत. अजूनही भोगावे लागत आहेत. हिरोशिमाची नगरपालिका आणि तेथील शास्त्रज्ञ यांच्यातर्फे त्या दूरगामी परिणामांची नोंद घेणे अद्यापी चालू आहे. अणुबाँबमधून उत्सर्जित होणाऱ्या गॅमा किरणांचा मानवी जीवनावर जो परिणाम होतो तोही चिंतनीय आहे. प्रत्यक्ष मेलेल्या लोकांची संख्या सोडून अशा उत्सर्जनाच्या प्रभावाच्या कक्षेत आलेल्या व्यक्तींची संख्या पावणेचार लाख आहे. असे सुमारे दोन हजार लोक दरवर्षी मृत्युमुखी पडत आहेत. स्फोटापासून अडीच मैल त्रिज्येच्या क्षेत्रात असलेले जे लोक त्या वेळी जिवंत राहिले किंवा स्फोटानंतर दोन आठवड्यांच्या अवधीत त्या दोन शहरांच्या गॅमा किरण-संपृक्त परिसरात जे लोक वावरले किंवा स्फोटाच्या वेळी जे आपापल्या आईच्या पोटात गर्भावस्थेत होते, असे सर्व लोक त्या वेळच्या किरणोत्सर्जनाचे जिवंत बळी ठरले आहेत. त्या दोन शहरांच्या परिसरात त्या सुमाराला गरोदर असलेल्या चार हजार महिला पुढे यथाकाल प्रसूत झाल्यानंतर त्यांपैकी साठ बालकांची मस्तके व मेंदू लहान आकाराचे झाले आणि तीस बालके मतिमंद निपजली. अनेक बालकांच्या डोक्यांवर केस व बोटांवर नखे नव्हती. त्यांचे वजन कमी होते. वार्धक्यावस्थेवर या किरणोत्सर्जनाचा परिणाम काय होतो याचा अंदाज अजून पूर्णपणे आलेला नाही.

आता हे झाले वीस किलो टन क्षमतेच्या अणुबाँबच्या बाबतीत. परंतु आता अणुबाँबची विध्वंसकता कमालीची वाढली आहे. अणुबाँबचा विकास करणाऱ्या आजच्या काही शास्त्रज्ञांनी आणि राजकारणी पुरुषांनी मांडलेले विचार राक्षसांचीही झोप उडविणारे आहेत. ते म्हणतात की हिरोशिमाला आणि नागासाकीला माणसांना फार त्रास झाला. कारण बाँब फार कमी क्षमतेचा होता. मात्र आता बाँबची क्षमता हजारो पटीने वाढलेली असल्याने नंतरच्या मरण-यातना



भोगावयास जवळपास कोणीही जिवंत उरलेला नसेल. हिरोशिमाला जो बाँब फोडला होता, त्यातून निर्माण होणाऱ्या धगीमुळे दोन मैल अंतरावरचे वर्तमानपत्राचे सारे कागद जळून जातील आणि आता पाच मेगॅटन क्षमतेच्या बाँबमुळे दहा मैल अंतरापर्यंतचे सारे कागद भडका उडून जळतील. या पाच मेगॅटन क्षमतेच्या बाँबपासून निर्माण होणारा किरणोत्सर्ग पृथ्वीवर किंवा पृथ्वीखालच्या पाण्यात किंवा भुयारात लपलेल्या माणसांनाही सोडणार नाही. प्रत्येक माणूस त्याची शिकार बनेल.

असा २० मेगॅटन शक्तीचा बाँब एखाद्या शहरावर टाकला तर काय होईल याची कल्पना येण्यासाठी एक उदाहरण म्हणून अमेरिकन शास्त्रज्ञांनी एक शास्त्रीय गणित मांडले होते. ती आकडेवारी जर पाहिली तर आपल्याला या २० मेगॅटन शक्तीच्या बाँबच्या भयानकतेची कल्पना येईल. ते उदाहरण असे : 'समजा अमेरिकन शास्त्रज्ञांनी बोस्टन शहराच्या मध्यभागी हा बाँब फोडला, तर त्या जागी शेकडो फूट खोल आणि सुमारे अर्धा मैल व्यासाचा एक खड्डा तयार होईल. स्फोटाच्या जागेपासून चार मैल त्रिज्येच्या वर्तुळात आलेल्या सर्व मजबूत इमारती जमीनदोस्त होतील. चार ते सहा मैल त्रिज्येच्या वर्तुळातील काही इमारती वाचतील, पण पंधरा मैल त्रिज्येच्या वर्तुळातील बहुतेक सर्व इमारती नादुरुस्त होतील. वीस मैलांवर असलेल्या लोकांच्या अंगावरील कपडे पेट घेतील. उष्णतेमुळे कातडी जळेल. चाळीस मैल अंतरावरील लोकांनी स्फोटाच्या आवाजाने दचकून आकाशात पाहिले, तर त्यांना पेटलेला सूर्य दिसेल. त्याच्या तेजाने त्यांचे डोळे जळून ते अंधळे होतील. स्फोटाच्या ठिकाणी निर्माण होणारा दाब एवढा प्रचंड असेल की ध्वनीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने तो बाहेर फेकला जाईल. त्यानंतर तासाला हजार मैलांपेक्षा अधिक वेगाचे वादळ उठेल. लागलेल्या आगी त्यामुळे अधिकच भडकतील. वाचलेले लोक या वादळाने हवेत फेकले जातील. चार मैल त्रिज्येच्या वर्तुळात आलेले सात लाख एकोणचाळीस हजार लोक केव्हाच संपलेले असतील. पण चाळीस मैल त्रिज्येच्या वर्तुळातील आणखी पंधरा लाख लोक मरण पावतील. मरणाऱ्या लोकांची एकूण संख्या २२ लाख एवढी प्रचंड असेल. फक्त २० मेगॅटन शक्तीच्या या छोटेखानी बाँबची एवढी विध्वंसकता. परंतु आजकालच्या नव्या बाँबच्या क्षमतेच्या दृष्टीने २० मेगॅटन शक्तीचा बाँब म्हणजे किस पेडकी पत्ती.

आज परिस्थिती अशी आहे की, अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स व चीन यांच्याकडे अणुबाँबपेक्षा शेकडो पटींनी विध्वंसक असे हायड्रोजन बाँब्स आहेत. आणि त्यांनी आपापल्या मित्र राष्ट्रांमध्ये व मांडलिक राष्ट्रांमध्ये ते पेरून ठेवले आहेत. अमेरिका व रशिया या दोन महासत्ता व इतर प्रगत देश संरक्षणाच्या नावाखाली जागतिक वर्चस्वाच्या कल्पनेने प्रेरित होऊन नवनवीन संहारक अस्त्रे शोधत आहेत. आता अणुबाँब मागे पडला असून त्यापेक्षा भयानक व कित्येक पटींनी संहारक असे हायड्रोजन व न्यूट्रॉन बाँब्स निर्माण करून त्यांचा साठा करीत आहेत. न्यूट्रॉन बाँब तर स्थावरजंगम जड वस्तूंचे फारसे नुकसान न करता फक्त सजीव प्राण्यांचा नाश करणारं भयानक अस्त्र आहे. काही बाँबमुळे विशिष्ट प्रकारचे जंतू निर्माण होतात व ते स्फोटाच्या ठिकाणापासून कित्येक शेकडो चौरस मैल परिसर दूषित करतात. त्यांचा प्रभाव कित्येक वर्षे टिकून राहील. हिरोशिमा व नागासाकी येथे जे घडले ते काहीच नाही; त्याहीपेक्षा संहारक असे घडेल, असा या बाँब्सच्या चाचण्या घेणाऱ्या शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

अशा या 'अणुबाँब विरुद्ध मानवजात' या युद्धात तुम्ही कोणाची बाजू घेणार आहात ? तुम्हीच ठरवा.

++

अमेरिकेतील 'न्यूज-वीक' या दैनिकाने अण्वस्त्राबाबत सार्वत्रिक मतदान घेतले. त्याच्या निष्कर्षावरून अमेरिकेतील ६८ टक्के लोक अण्वस्त्रांचे उच्चाटन व्हावे या मताचे आहेत असे आढळून आले आहे. युरोपमध्येही स्पेन, इटली, स्वित्झर्लंड, नेदरलँड, स्वीडन, नॉर्वे, प. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या देशांत आणि इतर अनेक ठिकाणी शांतता आंदोलने आणि अण्वस्त्रविरोधी चळवळ मूळ धरू लागली आहे. इटलीमध्ये पाच लाख लोकांनी मोर्चा काढला. लंडनमध्ये हाइड पार्कवर दीड लाख लोकांचा मोर्चा निघाला. ब्रूसेल्समधील मोर्चा दोन लाखांचा होता. युरोपियन जनतेच्या अण्वस्त्रविरोधी उद्रेकाची जाणीव हे मोर्चे करून देत आहेत.

# भारतातील नयनरम्य सरोवरे

कु. चंद्रशोभा चौधरी
टी. वाय्. बी. ए.

गेल्या काही वर्षांपासून शहरातील सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात आपला जीव गुदमरतो आहे. भोवताली जीवघेणी गर्दी, कानांवर आदळणारा गोंगाट, गिरणी-कारखान्यांच्या धुराड्यांतून बाहेर ओकणारा काळा धूर आणि त्यामुळे मनावर पडणारी दडपणे; ह्या सर्वांमुळे कासावीस होण्याची पाळी येते आहे. आपले काय बरे हरवले आहे, ह्याच्या शोधासाठी बाहेरच्या मोकळ्या हवेत जावेसे वाटते. अशा वेळी आपल्या परिसराची शोभा वाढविणारी निसर्गसुंदर सरोवरे रसिकांना आकर्षित करतात. आपल्या सौम्य व शीतल सहवासात देहभान विसरायला लावणाऱ्या या सरोवरांची रमणीयता मनाला अलौकिक आल्हाद देते. या सरोवरांनी कवीच्या प्रतिभेला प्रोत्साहन दिले आहे. आपली प्राचीन महाकाव्ये व पुराणे यांत सरोवरांच्या रम्यतेचे सुंदर चित्रण आढळते. काही सरोवरांना पौराणिक कथांचा संदर्भ लाभलेला आहे. काही सरोवरे इतिहास सांगतात तर काही धर्मकथांची आठवण करून देतात.

ज्यांच्या केवळ दर्शनानेही प्रवासाचा थकवा नाहीसा होईल अशी कितीतरी सरोवरे भारतात विखुरलेली आहेत. निसर्गाने आपले देणे या सरोवरांकाठी मुक्त हस्ताने उधळलेले दिसते. काश्मीरमधील दाल व वूलर; पंजाबमधील रामदास; राजस्थानमधील पुष्कर, पिचोला व सांबर; महाराष्ट्रातील लोणार; ओरिसा-तील चिल्का, आंध्रमधील कोलेरू व पुलिकत ही सरोवरे रसिकाला स्वर्गीय सुखाचा आनंद देतात. या सरोवरांच्या सान्निध्यात साधकालाही त्याचे श्रेय गवसते. पक्ष्यांचे आश्रयस्थान आणि माशांचे विहारस्थान म्हणून सरोवरे उपयोगी पडतात. पक्ष्यांची मंजुळ किलबिल आणि झाडांची गूढ सळसळ ऐकताना मन धुंद होते. येथे निसर्गाची रोमँटिक तरलता मनाला भिडते आणि त्रस्त करणाऱ्या विचारापासून मुक्तता मिळते. मानसिक शांतीसाठी आसावलेल्या जीवाला प्रशान्त निसर्गाच्या सान्निध्यात एखाद्या सरोवराकाठीच विसावा मिळतो. नितळ सुखाचे निर्मल क्षण येथेच भेटतात.

काश्मीरच्या डोंगररांगांत लपलेले, काश्मीरची शान असलेले 'दाल' सरोवर प्रसिद्ध आहे. याच सरोवराच्या पश्चिमेस काश्मीरची राजधानी श्रीगर वसलेली आहे. या जलाशयाने २१ चौ. कि. मी. क्षेत्रफळाचा प्रदेश व्यापला आहे. त्याची लांबी ८ कि. मी. व रुंदी ३.२ कि. मी. आहे. काठावरील चिनारवृक्ष व मोगल बादशहांनी उभारलेल्या शाही बागा या सरोवराच्या सौंदर्याची शोभा द्विगुणित करतात. शालीमार, निशात या बागा तर जगप्रसिद्ध आहेत. तरती उद्याने व फळाफुलांनी डवरलेले वृक्ष येथे आढळतात. निसर्गसौंदर्य आणि मानवी कल्पकता यांचा उत्कृष्ट मेळ या ठिकाणी घातला गेल्याने या सरोवराचे सौंदर्य अपूर्व वाटते. याच सरोवराकाठी काश्मीरच्या महाराजांचा भव्य प्रासाद आहे. हे सरोवर झेलम नदीस जोडल्याने जलविहाराची चांगली सोय झाली आहे. दाल व झेलम यांचे तळ कमी अधिक उंच असल्याने लॉक पद्धतीने ते जोडले आहे. सुंदर हाउस-बोटींनी सज्ज असलेले हे सरोवर प्रेमिकांना वरदान ठरले आहे.

काश्मीरमधील 'वूलर' हे सर्वांत मोठे चंद्राकार सरोवर आहे. समुद्रसपाटीपासून १७२६ मीटर उंचीवर असणारे ११५ चौरस कि. मी. क्षेत्रफळाचे हे विस्तीर्ण सरोवर पश्चिमेकडून उत्तरेकडे खोल होत गेले आहे. झेलमच्या प्रवाहमार्गातील या सरोवराच्या तिन्ही बाजू पर्वतांनी वेढलेल्या आहेत. या चंद्राकार सरोवरा-सभोवतालचा आसमंत गर्द जांभळ्या-निळ्या रंगाच्या डोंगरदऱ्यांनी व हिरव्यागार वनश्रीने वेढलेला असल्या-मुळे अप्रतिम सुंदर दिसतो. साहजिकच हा सरोवर-प्रदेश पर्यटकांना विशेष आवडतो. वाहत्या व गोड्या पाण्याचे सरोवर म्हणून ते प्रसिद्ध आहे. या सरोवरासंबंधी अनेक पौराणिक आख्यायिका सांगितल्या जातात. प्राचीन-काळी हे सरोवर 'महापद्म' या नावाने ओळखले जात होते, असे संशोधकांचे मत आहे. 'माहसीर' हा प्रसिद्ध काश्मिरी मासा या सरोवरात आढळतो.

पंजाब राज्यात अमृतसर येथे 'रामदास' सरोवर आढळते. सुवर्णमंदिराच्या सभोवताली असणाऱ्या या सरोवराला एक इतिहास आहे. शिखांचे चौथे धर्मगुरू यांच्या सन्मानार्थ त्यांचे नाव या सरोवराला देण्यात आले आहे. सभोवती हिरवागार वनप्रदेश, समोर चकाकणारे पाणी, वर निळे अथांग आकाश या सर्वांमुळे ह्या सरोवराचे दर्शन चित्तवेधक ठरते.

राजस्थान राज्य आंतरवाहिनी नद्यांमुळे शुष्क असूनही काही सरोवरांकरिता प्रसिद्ध आहे. जयपूरच्या पश्चिमेस ६४ कि. मी. अंतरावरील 'सांबर' सरोवर १८ ते २१ मीटर खोलीचे आहे. त्याचे क्षेत्रफळ २३४ चौरस कि.मी. आहे. हे सरोवर पूर्णपणे खाऱ्या पाण्याचे आहे. कच्छच्या रणातून येणारे वारे आपल्याबरोबर क्षारकण वाहून आणतात, ते निरनिराळ्या जलप्रवाहात पडून या सरोवरात येऊन साचतात. या सरोवराच्या तळाशी ४.५ मीटर जाडीचा मिठाचा थर आहे. वार्षिक ५ कोटी मेट्रिक टन मीठ यापासून मिळेल असा अंदाज आहे. अजमेरच्या वायव्येस ११ कि. मी. अंतरा-वर 'पुष्कर' हे एक अद्वितीय सरोवर आहे. या शांत व संथ जलाशयाला धर्माचे अधिष्ठान लाभले असल्याने ते एक पुण्यतीर्थ बनले आहे. या सरोवराची जन्मकथा फार चमत्कृतिपूर्ण असल्याचे समजते. ती पद्मपुराणात दिली आहे. या सरोवराच्या काठावरील देवालये आध्यात्मिक वातावरणाची निर्मिती करतात. धर्मप्रेमी लोकांचे हे श्रद्धेचे ठिकाण आहे. प्रत्येक वर्षी कार्तिक पौर्णिमेस येथे मोठी यात्रा भरते. ब्रह्मदेवाच्या हातातून गळून पडलेल्या पुष्पाचे हे ठिकाण, म्हणून ब्रह्मदेवाने या सरोवरास 'पुष्कर' हे नाव दिले, असे म्हणतात. हे सरोवर नास्तिकाला आस्तिक व अश्रद्धाला सश्रद्ध बनविते. याच राजस्थान राज्यात निसर्गरम्य अशा उदयपूर शहरात 'पिचोला' हे सरोवर आढळते. १४ व्या शतकाच्या अखेरीस बांधून तयार करण्यात आलेल्या या सरोवराचे क्षेत्रफळ अंदाजे १० चौ. कि. मी. आहे. या सरोवराभोवती टेकड्या आहेत. याच्या काठा-वर स्नानासाठी पुष्कळ घाट आहेत, तसेच मंदिरे व राजवाडेसुद्धा याच्या सान्निध्यात उभे आहेत. हे सरोवर मानवनिर्मित असल्याने या स्थानाला एक वैशिष्टयपूर्ण आकर्षकता प्राप्त झाली आहे. या सरोवराच्या मध्यभागी जननिवास राजप्रासाद आहे. महाराणा दुसरा जगतसिंह याने तो इ. स. १७५७ मध्ये बांधला आहे. हे ठिकाण रसिकाला मंत्रमुग्ध करते.

भारतात पवित्र समजल्या जाणाऱ्या चार सरोवरां-मध्ये गुजरात राज्यातील नारायण सरोवर हे एक आहे. या सरोवराच्या काठावर दक्षांच्या पुत्रांनी तप केले होते अशी आख्यायिका आहे.

महाराष्ट्रात विदर्भामध्ये बुलढाणा जिल्ह्यात 'लोणार' हे सरोवर आहे. या सरोवराच्या निर्मिती-विषयी मतभेद आहेत. काही अभ्यासकांच्या मते सुमारे एक दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवर आढळलेल्या एका प्रचंड उल्केच्या आघाताने निर्माण झालेल्या विवराच्या ठिकाणी हे सरोवर तयार झाले आहे. हे सरोवर २००० मीटर व्यासाचे व १९० मीटर खोलीचे आहे. पूर्वी हे सरोवर निद्रिस्त ज्वालामुखीचे तोंड असावे व त्यात पाणी साठल्याने सरोवर निर्माण झाले असावे असा समज होता. परंतु अलीकडेच झालेल्या भू-शास्त्रीय संशोधनावरून हे विवर उल्कापिंडाच्या आघाताने निर्माण झाले असल्याचा निर्विवाद पुरावा मिळाला आहे. याच्याच पूर्वेस असलेल्या झऱ्यातून त्याला पाणी-पुरवठा होतो. भोवतालच्या प्रदेशातील क्षार विरघळून सर्व पाणी झिरपत झिरपत या सरोवरात गोळा होत असल्याने ह्या सरोवरात रासायनिकदृष्टया महत्त्वाचे असे सोडियम कार्बोनेट हे खनिज मीठ मिळते.

ओरिसा राज्यात जगन्नाथपुरीजवळ समुद्र किनाऱ्या-वर विशाल व नयनरम्य असे 'चिल्का' हे सरोवर

आहे. समुद्रात वाळू साचत जाऊन एका वाळूच्या दांड्यामुळे हे अलग झालेले खाजण असून ते समुद्र-किनाऱ्याला ७० कि. मी. समांतर आहे. हे सरोवर एका लहान खाडीने समुद्राला जोडले आहे. या सरोवराचे एक वैशिष्ट्य म्हणजे हे सरोवर पावसाळ्यात गोडे व उन्हाळ्यात खारे असते. पावसाळ्यात याचे क्षेत्र सुमारे ११७० चौ. कि. मी. तर उन्हाळ्यात ते फक्त ८५४ चौ. कि. मी. असते. याची खोली सर्वात कमी असून साधारणपणे ती १॥ ते २ मीटर आढळते. पावसाळ्यात नद्यांचे व पावसाचे पाणी साचून हे सरोवर गोडे होते. अशा वेळी तेथे मासेमारी चालते. पाणीपुरवठा कमी होत गेल्याने उन्हाळ्यात ते खारे बनते. हिवाळ्यात या सरोवराच्या परिसरात निरनिराळ्या भागांतून विविध प्रकारचे पक्षी येतात. परिकूड व मालूड अशी दोन सुंदर बेटे या सरोवरात आहेत. देशातील तसेच परदेशांतील अनेक हौशी लोक या रम्य स्थळास भेट देतात. हा जलाशय जंगली पाखरे, बदके, मासे यांचे आवडते ठिकाण आहे.

आंध्र प्रदेशात समुद्रकिनाऱ्याच्या भागात 'कोलेरू' हे सरोवर निर्माण झाले आहे. गोदावरी, कृष्णा नद्यांच्या त्रिभुज प्रदेशाच्या दरम्यानच्या भागात या सरोवराची निर्मिती झालेली आहे. हे उथळ सरोवर सुमारे २५० चौ. कि. मी. क्षेत्रफळाने विस्तारलेले आहे. समुद्रापासून सुमारे ८ कि. मी. अंतरावरील गोड्या पाण्याचे हे सरोवर पेलिकन पक्ष्यांचे आवडते स्थळ आहे. हिवाळ्यात हे सरोवर फारच सुंदर दिसते. आजूबाजूच्या हिरवळीचा हिरवा रंग अधिकच गहिरा दिसतो. तारुण्याची नुकतीच चाहूल लागल्यावर एखादी सुंदर मुग्ध युवती जशी बावरल्यासारखी दिसावी तशी ही सरोवरसृष्टी दिसते. तिचे बावरे सौंदर्य डोळ्यांना सुखवीत असते.

तामीळनाडू राज्याच्या उत्तरेस समुद्रकिनाऱ्यावर 'पुलिकत' सरोवर आढळते. समुद्रलाटांच्या संचयन-कार्यामुळे या सरोवराची निर्मिती झाली आहे. हे एक खाजणच आहे. याची लांबी ८६ कि. मी. आहे. श्रीहरिकोटामुळे हे सरोवर समुद्रापासून अलग झाले आहे. याच्या काठाकाठाने असणारी मखमली हिरवळ वाऱ्याच्या झुळकीने डोलताना मोठी लोभस दिसते, तर कडेच्या वृक्षराजींनी तिच्यावर धरलेले छत्र मोठे आकर्षक भासते.

भारतात सर्वत्र विखुरलेली अशी अनेक सरोवरे असली तरी ती लहान असल्याने आर्थिकदृष्ट्या त्यांचा फारसा वापर नाही. परंतु सृष्टिसौंदर्यामुळे ती प्रसिद्ध आहेत. जलप्रवाहावरून झरझर जाणाऱ्या सावल्या, पाण्याच्या खळबळीबरोबर झुलत राहणाऱ्या सूर्य-किरणांची मौज, मध्येच सुळकी मारून बाहेर डोकावणारी मासळी, आपल्याच सावलीकडे कुतुहलाने वाकून बघणारी काठावरची वृक्षराजी, सोनेरी रंगाने न्हाऊन निघणारा हिरवागार वनप्रदेश, निळसर रंगाची नाजूक फुले, पक्ष्यांचे थवे या सगळ्यांचे सौंदर्य आणि मौज पाहायला तुम्हांला कधीतरी उसंत मिळेल काय ?

++

'काम करायला माणसे नाहीत' असे म्हणणारी 'माणसे' ठिकठिकाणी आढळतात. जो तो स्वतःला मोजण्याचे सोडून देतो आणि हिशोब करावयाला बसतो. स्वतःला वगळून विश्वाचे कोडे सोडविण्याची खटपट फुकट आहे.... स्व-रूप पाहा. विश्व-रूप पाहू नका. स्वरूप दर्शन हेच विश्वरूप दर्शनाचे उत्तम साधन आहे. स्वरूप दर्शन मध्यबिंदूसारखे म्हटले तर विश्वरूप दर्शन परीघासारखे आहे. मध्यबिंदू पकडून ठेवल्याशिवाय परीघ हाती लागावयाचा नाही.

०

ग्रंथ-गंगा कितीही गंभीर असली तरी मनुष्य आपल्या लोट्यानेच तिच्यातील पाणी घेणार, आणि म्हणून ह्या विश्वातून 'बाह्यत:' आपणांस तेच आणि तितकेच शिक्षण मिळणार, की ज्याची आणि जितक्याची बीजे आपल्या 'आत' असतील. जे आपल्या 'आत' नाही ते बाहेरून मिळणे अशक्य आहे.



# खलिस्तान : एक समस्या

**किरण गुजर**
टी. वाय्. बी. ए.

खलिस्तानचा प्रश्न ही देशासमोरील एक महत्त्वाची समस्या आहे. भाषावार प्रांतरचनेची मागणी केंद्र सरकारने अत्यंत अनिच्छेने मान्य केली. पंजाबच्या बाबतीत सरकारची ही अनिच्छा अधिकच प्रकर्षाने जाणवली. संत फत्तेसिंग आपली आत्मदहनाची धमकी प्रत्यक्षात आणतील याची खात्री पटल्यावर केंद्र सरकारने पंजाबी सुभ्याची मागणी मान्य केली. इतर राज्यांप्रमाणेच या मागणीभोवती पंजाबमधील सर्व समान घटक एकत्र आल्याचे चित्र मात्र दिसले नाही. अकाली दलाच्या नेत्यांनी त्याला शिखांची मागणी असे स्वरूप दिले. शीख हे काही बाहेरून आलेले नाहीत, तर पंजाबच्या भूमीतच त्यांची मुळे रुजलेली आढळून येतात. आपल्या देशातील सर्व धर्मातील संतांच्या वचनांचा शिखांच्या ग्रंथसाहेबात समावेश आहे. अकाली चळवळीला अशीच उज्ज्वल परंपरा लाभलेली आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीला विरोध करण्यात अकाली आघाडीवर होते. परंतु काळाबरोबर अकाली नेत्यांतही विविध प्रश्नांवरून फूट पडत आली. फत्तेसिंग आणि मास्टर तारासिंग यांच्या निधनानंतर अकाली प्रश्नात तीव्र मतभेद निर्माण झाले. सध्या पक्षातील प्रबळ गटाचे नेतृत्व प्रकाशसिंग बादल यांच्याकडे आहे.

## काँग्रेसचा अरुंद पाया

व्यापक पाया बांधण्यात पंजाबमधील काँग्रेस पक्ष मात्र कधीच यशस्वी झाला नाही. दिल्लीतील सत्ताधाऱ्यांविरुद्ध सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी मतदानाच्या 'आहेरे' व 'नाहीरे' लाटांवरच या पक्षाची कायम भिस्त राहिलेली आहे. त्यामुळे प्रतापसिंग कैरों किंवा सरदार स्वर्णसिंग यांच्या तोडीचे नेतृत्व पुढे आणण्यास काँग्रेस अपयशी ठरली आहे. स्वातंत्र्यापूर्वी पंजाबचे दोन भाग पडत. महाराज रणजितसिंग यांच्या साम्राज्याचा प्रमुख भाग असलेल्या व नंतर पाकमध्ये गेलेल्या बहुतेक भागात शीख धर्माचा फारसा प्रसार झालेला नव्हता. या भागातील बहुतेक शेतकरी जाट मुसलमान होते. हिंदू व शीख हे नागरी व्यवसायांत गुंतलेले दिसून येत. खेड्यांत मात्र ते प्रामुख्याने सावकारी व व्यापारी व्यवसाय करीत होते. स्वतःच्या मालकीची जमीन असूनही त्यांनी स्वतः शेती केल्याचे आढळून येत नाही. भाक्रा कालवा यंत्रणा अस्तित्वात आल्यानंतर पंजाबची भरभराट व्हायला सुरवात झाली. पंजाब देशाचे धान्य कोठार मानले जाऊ लागले. मात्र अनेक कारणांमुळे पंजाबमधील उद्योगधंद्यांचा शेतीएवढा विकास झाला नाही.

## अपुरा उद्योग विकास

शेती व्यवसायावर आधारित उद्योगधंद्यांचा राज्यात पाहिजे तेवढा विकास झालेला नाही, ही पंजाबची अनेक वर्षांपासूनची तक्रार आहे. परंतु दिल्लीतील नियोजनकार ही तक्रार फेटाळून लावतात. पंजाबची उद्योगीकरणाची मागणी फेटाळली जात असतानाच या राज्यातील शेतीच्या विकासावर मर्यादा घालण्याचा विचारही नियोजनकारांच्या मनात येत नाही. केवळ कच्च्या मालाचे उत्पादक म्हणून राज्याकडे पाहण्यात येत असून उत्पादन प्रक्रियेचे फायदे मात्र इतर भागांना मिळतात. याबद्दल पंजाबमध्ये असंतोष आहे.

## घातक कल्पना

पंजाबच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्या राज्यातील लोकांना लष्करात भरती करण्यात येईल असे नवीन धोरण अवलंबिण्यात आले. त्याबद्दल ते म्हणतात, देशाच्या ७० कोटी लोकसंख्येत पंजाबी हे केवळ दीड कोटी असल्याने प्रत्यक्षात त्यांना लष्करात दीड टक्केच जागा मिळू शकतील. लष्करी भरतीची ही कल्पना धोकादायक असून राष्ट्रीय धोरणाच्या पूर्णतया विरोधी आहे. एकदा का या जागा टक्केवारी पद्धतीने भरावयास सुरवात केली तर राष्ट्रीय एकात्मतेचा भंग होण्यास फारसा अवधी लागणार नाही. अकाली पक्षाने हा प्रश्न हाती घेतलेला आहे. पंतप्रधानांनी देखील या प्रश्नाबाबत समाधानकारक उत्तर न दिल्याचा अकालींचा दावा आहे. त्यांच्या तक्रारीचा काहीसा विपर्यास करण्यात येत आहे असे वाटते.

राज्यांना जास्ती अधिकार मिळावेत यासाठी पंजाबमध्ये उभ्या राहिलेल्या चळवळीत अकाली पक्ष आघाडीवर आहे. शिखांतील अतिरेकी गटांना अलग करणे ही गोष्ट सर्वप्रथम करावी लागेल. पंजाबचे प्रश्न हे शीख व हिंदू या दोन्ही जमातींच्या जिव्हाळ्याचे आहेत हे लक्षात घेऊन हिंदू व शीख नेत्यांनी अतिरेकी प्रवृत्तींना आवर घालण्यासाठी प्रयत्न करणे जरूरीचे आहे.

### अकालींची जबाबदारी

अकाली दलातील विविध गटांच्या नेत्यांवर फार मोठी जबाबदारी आहे. आपल्या मागण्यांचे व तक्रारींचे पंजाबीकरण करण्यासाठी अकालींना पुढाकार घ्यावा लागेल. व्यापक आघाडी बांधूनच त्यांना सत्तेवर येणे शक्य आहे. अशा आघाडीद्वारेच ते केंद्राकडून राज्याच्या योग्य त्या मागण्या मान्य करून घेऊ शकतील. अकाली दलातील शहाण्या-सुरत्या नेत्यांनी खंबीर व समंजस भूमिका घेण्याची आता वेळ आली आहे.

पंजाबमधील शिखांनी इंडियन एअर लाइन्सची विमाने पळवायला सुरवात केली. त्याचप्रमाणे गेल्या मार्च-एप्रिलमध्ये बराचसा हिंसाचार झाला व त्याला हिंदू विरुद्ध शीख असे स्वरूप प्राप्त झाले. त्यातूनच काही शिखांनी खलिस्तानची मागणी पुढे केली. त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेला एक आव्हान मिळाले आहे.

शिखांची ही मागणी एकाएकी पुढे आलेली नाही. याला स्वातंत्र्यापासूनचा इतिहास कारणीभूत आहे. अकाली दलातील मध्यममार्गी गटाचे नेते लोंगोवाल यांचेदेखील असे मत आहे की, शिखांना अतिशूद्रासारखी वागणूक दिली जाते. वास्तविक स्वातंत्र्यानंतर पंजाब विधानसभेत हिंदू व शीख यांनी पुढील ठराव मंजूर केला होता.

'शिखांच्या न्याय्य मागण्यांसाठी व हक्कांसाठी खास घटनात्मक तरतुदी करणे आवश्यक आहे.'

म्हणून लोंगोवाल यांची तक्रार आहे की, 'भारत सरकारने त्यांच्या या मागण्यांना नकार दिला आहे आणि शिखांना दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून वागणूक दिली जात आहे.'

सध्या अकालींच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक अशा ४५ तक्रारी आहेत. मुख्यमंत्री दरबारासिंग यांच्याही काही तक्रारी आहेत. या प्रश्नाबाबत वास्तविक पुढील-प्रमाणे परिस्थिती आहे.

(१) खलिस्तानची मागणी ही अकाली दलातील अतिरेकी गटाची मागणी आहे. त्यासाठी सर्व वैध-अवैध मार्गांचा अवलंब करावा असे त्यांचे मत आहे. विमाने पळविणे या प्रकाराला त्यांचा मनापासून पाठिंबा आहे.

(२) खलिस्तानची मागणी शहरी विभागातील शिखांची आहे, ग्रामीण विभागातील शिखांची नाही. कारण शहरी विभागातील शिखांना असुरक्षिततेची भावना वाटत आहे. ग्रामीण भागात शीख प्रभावी आहेत. महाराष्ट्रातील मराठा समाजाप्रमाणे ते सर्वत्र पसरलेले आहेत. असे चित्र इतर जातींबद्दल दुसऱ्या कोणत्याही राज्यात दिसत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात जातीय तणाव नाही.

(३) याच्या जोडीला पंजाबमधील सत्तासंघर्ष आहे. पूर्वीचे मुख्यमंत्री दरबारासिंग व सध्याचे राष्ट्रपती– पूर्वीचे केंद्रीय गृहमंत्री– श्री. झैलसिंग यांच्यात काँग्रेसमधील तीव्र सत्तास्पर्धा होती. दोघांचेही पटत नव्हते. याची चर्चा सर्वत्र होत असे. श्री. दरबारासिंग हे जाट समाजाचे आहेत, तर झैलसिंग हे सुतार समाजाचे आहेत.

(४) दरबारासिंग यांनी लाला जगत नारायण या 'पंजाब केसरी' वृत्तपत्राच्या संपादकाच्या खुनानंतर परिस्थिती कौशल्याने हाताळली नाही. अकाली दलातील अतिरेक्यांशी वागताना कडक धोरण स्वीकारले जात नाही.

(५) १९७७ ते ८० च्या कालखंडात अकालींचे राज्य होते. त्या वेळी मतभेद, संघर्ष दबला होता. पण १९८० साली दरबारासिंग यांचे काँग्रेस (आय) सरकार सत्तेवर आले व संघर्ष सुरू झाला. सत्ता आपल्या हातातून काढून घेण्यात आली असा शिखांचा समज झाला व तो काँग्रेसला दूर करता आला नाही.

(६) यातूनच शहरी विभागात हिंदू विरुद्ध शीख असा जातीय संघर्ष वाढतच गेला. धार्मिक गोष्टीला महत्त्व आले.

खलिस्तानच्या मागणीविरुद्ध हिंदू मध्यमवर्गीय आवाज उठवू लागले. लाला जगत नारायण यांनी याविषयी अनेक लेख लिहिले. मग खलिस्तानवाद्यांनी भारताच्या राज्यघटनेची पाने फाडून विरोध दर्शविला. त्यामुळे हिंदू चिडले. त्याची प्रतिक्रिया म्हणून संत जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांनी मागणी केली की, 'अमृतसर येथे तंबाखूची विक्री केली जाऊ नये.' त्याला उत्तर म्हणून अकालींशिवाय इतरजण एकत्र आले व त्यांनी मोर्चा काढला. त्यात घोषणा होती–

'सिगरेट बिडी पियेंगे
हम शानसे जियेंगे ।'

या संघर्षातूनच लाला जगत नारायण यांचा खून झाला. रक्तपात व हिंसक दंगली झाल्या.

(७) खलिस्तानवाद्यांची आणखी एक तक्रार अशी आहे की, पंजाबमधील शिखांची लोकसंख्या कमी होत आहे.

१९७१ – ६१ टक्के

१९८१ – ५८ टक्के

खलिस्तानचा इतिहास हा असा आहे. खलिस्तानच्या मागणीला पाठिंबा वाढत गेला तर तो राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होईल. परंतु शिखांच्या काही मागण्या रास्त आहेत असे एस्. एम्. जोशी यांच्यासारख्यांचेही मत आहे. एकंदरीतच बहुसंख्य राजकीय पक्षांनी राजकीय सत्तेच्या मागे लागून सामाजिक सुधारणेकडे केलेले दुर्लक्ष, शासनातील सत्तासंघर्ष व अकार्यक्षमता ही या मागणीमागची खरी कारणे आहेत.

++

---

मनुष्याचे मत जरी कदाचित दूषित असले तरी आतला माणूस दूषित नसतो. म्हणूनच मताचा विचार करताना माणूस बाजूलाच राखला पाहिजे.

०

जीवनाची जबाबदारी ही भयानक वस्तू नाही, आनंदाने भरलेली आहे. पण जशी ती आनंदाने भरलेली वस्तू आहे, तशी ती शिक्षणानेही भरलेली आहे. जो जीवनाच्या जबाबदारीला मुकला तो सर्व शिक्षण गमावून बसला.

०

हरएकाला मतस्वातंत्र्य पाहिजे असे आपण म्हणतो. पण स्वतंत्र मत ह्याचा खरा अर्थ आपणांस कळलेला नाही. इंद्रियांचा पगडा बसू न देता स्वतंत्र वृत्तीने आपले मन आपल्याला जे सांगत असेल ते आपले स्वतंत्र मत. मत म्हणजे मनात येईल ते नव्हे. पण मन आणील ते.

---

# झोरबा : एक आगळे व्यक्तिचित्र

**राजेश आचार्य**
एस्. वाय्. बी. एस्सी.

**ग्रीस–** भारताप्रमाणेच प्राचीन संस्कृतीचे अधिष्ठान लाभलेला देश. ग्रीक समाजातील सॉक्रेटिस, प्लेटो, अलेक्झांडर फार पूर्वीच जग जिंकून गेले. पण असे पुत्र या मातीत निपजले असतील असे तिथले आजचे सामान्य समाजजीवन पाहून खरे वाटत नाही. भारताप्रमाणेच धर्मांधपणा, दारिद्र्य, निरक्षरता आणि अज्ञान यांनी गांजलेला हा समाज. ह्या समाजाचे यथार्थ चित्रण निकोस काझांटझकिस (Nikos Kazantzakis) ह्या ग्रीक साहित्यिकाने आपल्या कादंबऱ्यांतून केले आहे. त्यांची इंग्लिश भाषेत अनुवादित झालेली झोरबा द ग्रीक (Zorba the Greek) ही कादंबरी जगभरच्या रसिक वाचकांची मने जिंकून गेली आणि अँथनी क्वीन (Anthony Qinn) याने पडद्यावर सजीव साकार केलेल्या झोरबाने चित्रपट सृष्टी गाजवली. अशा या झोरबाच्या मला जाणवलेल्या व्यक्तित्वाचे हे रेखाटन.

एका वादळी पहाटे ग्रीसमधील पिरॅइअस (Piraeus) बंदरावरील कॅफेत लेखक क्रीट (Crete) बेटाकडे जाणाऱ्या बोटीची वाट बघत बसलेला असतो. आपल्या परममित्राने सल्ला दिल्याप्रमाणे पुस्तकी जगातून बाहेर पडावे या उद्देशाने आणि थोडा व्यवहाराचा अनुभव घ्यावा या विचाराने त्याने या बेटावर एक कोळशाची खाण चालवायला घेतलेली असते. पण तिकडे जावे की न जावे अशा द्विधा मनःस्थितीत तो तिथे बसलेला आहे. थोड्या वेळाने त्याच्या लक्षात येते की समोरच्या काचेच्या पॅनेलमधून एक साठीच्या घरातील उंच, सडपातळ व्यक्ती आपल्याकडे टक लावून बघत आहे. त्या उत्सुक नजरेमध्ये मिस्किलपणाबरोबरच एक विलक्षण चमक लेखकाला जाणवते. ती व्यक्ती सरळ लेखकाच्या रोखानेच येते आणि समोर पहाडासारखी उभी राहाते. गालाची उंचावलेली हाडे, रुंद जिवणी, विशाल भालप्रदेश, कुरळे करडे केस आणि भेदक नजर क्षणात प्रभाव पाडतात. लेखकाला ती व्यक्ती, सारं जग पालथं घालणाऱ्या सिंदबादसारखी वाटते. या व्यक्तीचे नाव अलेक्सिस झोरबा.

मदतनीस म्हणून बरोबर नेण्याची झोरबाने केलेली भारदस्त आवाजातली विनंती लेखकाला टाळणे अशक्य होते. झोरबाने आपल्याबरोबर त्याचे प्राणप्रिय संतूर आणलेले असते. सर्वस्व पणाला लावून संतूरवादन आत्मसात करणारा झोरबा, संसारातल्या रोजच्या कटकटीत संतूर वाजवणे जमत नाही म्हणून घरादारावर उदक सोडून कलंदरपणे भटकत असतो. जीवनातला प्रत्येक क्षण, सुखाचा वा दुःखाचा, रसरसून उपभोगणे आणि संतूरवादनात देहभान हरपणे हेच झोरबाच्या जीवनाचे सूत्र. योगायोगाने झोरबा कोळसा खाणीतील कामात कुशल असतो. शेवटी ही दुक्कल क्रीट बेटावर निघते. मदतनीस म्हणून बरोबर आलेला झोरबा पाहता पाहता लेखकाचे जीवनच व्यापून टाकतो.

प्रवासात झोरबाकडून त्याच्याविषयी बरीच माहिती मिळते. व्यवसाय किंवा नोकरी हे उपजीविकेचे केवळ साधन मानणारा झोरबा सर्व प्रकारच्या कामांतून तावून सुलाखून निघालेला असतो. कुंभारकाम करताना डाव्या हाताच्या तर्जनीची अडगळ, तर्जनी कापून तो दूर करतो. झोरबा तरुणपणी असाच फेरीवाला म्हणून क्रेटे बंदरावर आलेला होता. त्या वेळेस त्याने मोठ्या उत्साहाने तेथल्या स्वातंत्र्य-चळवळीत भाग घेतलेला होता. जेव्हा चळवळीचा विजय झाला तेव्हा इतरांप्रमाणे त्याचेही डोळे आनंदाश्रूंनी डबडबून आले होते. पण जसे केस पिकत जातात तसे मात्र झोरबा क्रांती आणि युद्ध या गोष्टींकडे त्रयस्थ दृष्टीने पाहायला लागतो. त्या वेळेस उसळत्या उत्साहात आपण केलेली माणसांची कत्तल त्याला आता मूर्खपणाचीच नव्हे तर पाशवी वाटू लागते आणि ज्या स्वातंत्र्यासाठी माणसे माणसांवर पशूप्रमाणे तुटून पडतात, त्या स्वातंत्र्याचा शेवटी अर्थ तरी काय असा प्रश्न त्याला पडतो. देश, धर्म, जात, हे सर्व बाजूला सारून, शत्रू-वैरी-परका या चौकटी ओलांडून माणसानं माणसाला माणूस म्हणून जवळ केलं पाहिजे, त्याच्या सगळ्या गुण-दोषांसह, दुबळेपणांसह त्याला स्वीकारलं पाहिजे, असं त्याचं मत होतं.

कोळशाच्या खाणीजवळील एका खेड्यात मॅडम डेम हॉर्टेन्स् (Dame Hortense) या फ्रेंच वयस्क बाईच्या घरगुती खाणावळीत ते मुक्काम टाकतात. ही फ्रेंच बाई तरुणपणी एक सुंदर कॅबेरे नर्तिका म्हणून गाजलेली होती. पण वार्धक्य आणि परिस्थिती यांमुळे आता ती एकाकी जीवन कंठत असते. झोरबाला तिचा हा एकाकीपणा जाणवतो आणि या थकल्या जीवावर तो अकृत्रिम प्रेमाचा वर्षाव करतो. त्यात भावनेचा आवेग असतो पण वासनेचा वणवा नसतो. पुढे काही दिवसांनी डेम हॉर्टेन्स् फार काळची सोबती नाही हे लक्षात आल्यावर झोरबा तिला प्रसन्न ठेवण्यासाठी लग्नाचे वचन देखील देतो. स्त्री हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. पुरुषाला हवासा वाटणारा स्त्री-सहवास आणि स्त्रीला पाहिजे असणारे पुरुषाचे अकृत्रिम प्रेम ह्या नैसर्गिक गरजा आहेत आणि जीवनातला तो एक गूढ आणि अपरिहार्य भाग आहे, असे त्याचे अनुभवसिद्ध तत्त्वज्ञान असते. ते तो मोकळेपणाने लेखकापुढे मांडत राहातो आणि त्याचे वागणेही त्यानुसार, तथाकथित सभ्यतेचा कोणताही आडपडदा न ठेवता, आदिम मोकळेपणाने चालू असते.

लेखक आणि झोरबा लवकरच कोळशाच्या खाणीजवळ समुद्रकिनाऱ्यावर झोपडी बांधून राहायला जातात. झोरबा खाणकामात स्वतःला पूर्णपणे झोकून देतो. खाणीतल्या कामाच्या साऱ्या विवंचना आणि जबाबदाऱ्या तो स्वतः सांभाळतो. अव्यवहारी मालकाचा सल्ला घेण्याची त्याला कधीच गरज पडत नाही. लेखक मात्र पुस्तके आणि लिखाण यातच गढून गेलेला असतो. कामात लक्ष घालणे त्याला प्रयत्न करून देखील जमत नाही. समाजवादाची पुस्तकी तत्त्वे त्याच्या डोक्यात घर करून असतात. कामगारांच्या कल्याणासाठी त्याची धडपड चालू असते. झोरबा मात्र कुठल्याच विचारप्रणालीचे भूत आपल्या डोक्यात वागवत नाही. त्याचा दृष्टिकोन पूर्णपणे स्वतंत्र आणि प्रामाणिक असतो. कामगार हे काम करून घेण्यासाठीच आहेत आणि त्यांच्यावर कोणीतरी अधिकार गाजवल्याशिवाय ते मनापासून काम करणार नाहीत असे त्याचे प्रामाणिक मत असते. कामगारांशी कठोर वर्तन करणारा झोरबा जेव्हा खाणीत अपघात होतो तेव्हा मात्र आपला जीव धोक्यात घालून सर्व कामगारांचे प्राण वाचवतो आणि सुटकेनंतरच्या आनंद-सोहळ्यात त्यांच्याबरोबर नाचून गाऊन तो त्यांच्यातला एक बनून जातो.

त्या गावात एक सुंदर विधवा असते. ती अगदी एकाकी जीवन जगत असते. मनाने निर्मळ असलेल्या या स्त्रीची आणि रूक्ष जीवन जगणाऱ्या मालकाची जवळीक साधून त्या दोन एकाकी जीवांच्या जीवनात ओलावा निर्माण करावा असे झोरबाला वाटत असते आणि तसा तो प्रयत्न करतो. पण रूढिप्रिय आणि धर्मांध गावकरी या बाईला पापी समजून तिचा क्रूरपणे वध करतात. पाप-पुण्याच्या कल्पनेने माणसं इतकी क्रूर होतात हे पाहून झोरबा अतिशय विषण्ण होतो.

आपल्या मालकाला पुस्तकी आणि अवास्तव अशा विचारांच्या कोषातून बाहेर काढण्याची झोरबाला प्रबळ इच्छा असते. एक दिवस तो लेखकाला म्हणतो, "तू तुझ्या सर्व पुस्तकांचा ढिगारा घालून तो जाळून टाक. तरच तुझी खऱ्या जगात वावरायची वाट मोकळी होईल, तुझा पढतमूर्खपणा निघून जाईल आणि मग कदाचित तुझा आम्हांला उपयोग होईल." झोरबाचे सर्व विचार-आचार स्वतंत्र आणि प्रामाणिक असतात. कोणावरही आणि कशावरही अंधळा विश्वास ठेवणे त्याला मंजूर नसते. लेखक त्याला विचारतो, "तुझा कशावरच विश्वास नाही का ?"

"नाही. मी कशावर आणि कुणावरही विश्वास ठेवत नाही. माझा विश्वास फक्त झोरबावर. झोरबा इतरांच्यापेक्षा चांगला आहे म्हणून नव्हे. तोही इतरांप्रमाणे एक पशू आहे. मी झोरबावर विश्वास ठेवतो, कारण तोच तेवढा एकटा मला पूर्ण परिचित आहे आणि फक्त तोच माझ्या अधिकारात आहे. बाकी सर्व जग जणू मायाजाल आहे. माझ्या नाशाबरोबर सर्व जग नाश पावेल. झोरबाचे सर्व जग (The whole Zorbatic world) रसातळाला जाईल." हे झोरबाचे डोके गरगरून टाकणारे उत्तर. लेखकाला वाटते झोरबा अहंकारी तर नाही ना ? पण झोरबा म्हणतो, "मी हे टाळू शकत नाही. मी झोरबा आहे आणि झोरबाप्रमाणंच बोलणार !" वेळोवेळी झोरबा असं काहीतरी वेगळं बोले आणि त्याचे वरवर विक्षिप्त वाटणारे शब्द लेखकाला खडबडून नवी जाग आणीत.

आपल्या मालकाला श्रीमंत बनवण्याची एक योजना झोरबाच्या मनात घोळत असते. कोळशाच्या खाणीच्या वरच्या भागातल्या जंगलातील झाडे विकत घेऊन लाकूडतोड सुरू करायची आणि लाकडाचे ओंडके, जाड तारांच्या उतरत्या मार्गावरून घरंगळत खाली आणायचे अशी त्याची ही योजना होती. लेखकाची संमती मिळताच झोरबा रात्रंदिवस कष्ट करून जाड लोखंडी तारा (केबल्स) वापरून हा मार्ग तयार करतो. पण मोठ्या प्रयासाने हुडकून काढलेला नेमका उतार (Right slope) चुकतो आणि प्रत्यक्ष उद्घाटनाच्या वेळी, वरून येणाऱ्या ओंडक्यांच्या प्रचंड वेगाने सर्व केबल्स तुटतात आणि झोरबाची सगळी योजना धुळीला मिळते. झोरबा दिङ्मूढ होतो, कष्टी होतो. वाया गेलेल्या पैशाची चिंता किंवा मालकाच्या बोलण्याची भीती त्याला नसते. पण आपल्या आणि कामगारांच्या काबाडकष्टाचे पाणी झाले याचे त्याला दुःख होते. योजना असफल झाली म्हणून गावातले लोक छी: थू करतात तीही तो मनावर घेत नाही. काही वेळातच सर्व भावनांना आवर घालून, जणू काही झालेच नाही अशा सहजतेने ते दोघेजण नेहमीच्या गप्पात रंगून जातात. जेवणाचा पुरेपूर रसास्वाद घेतात आणि नंतर तर झोरबा देहभान हरपून नाचू लागतो. योजना संमत होताच तो असाच अत्यानंदाने नाचलेला असतो. आनंद आणि दुःख यांना मोकळी वाट करून देण्यासाठी देहभान विसरून नाचणे ही त्याची नैसर्गिक ऊर्मी होती. अशा या ऊर्मीच्या नाचण्याने त्याच्या शरीराचा कण् अन् कण बोलू लागे आणि परक्या माणसालाही त्याच्या त्या शरीराचं ते बोलणं मनोमन उमगत असे. आत्ताचा देहभान विसरून नाचणारा झोरबा लेखकाला साक्षात आदिमानवच भासतो. त्याला वाटते जर झोरबा अश्मयुगात जन्माला आला असता, तर अनभिषिक्त सम्राट म्हणून त्याने त्या जगावर राज्य केले असते, पण नीतिमत्तेच्या चुकीच्या कल्पना उराशी बाळगून जगणाऱ्या सध्याच्या या खुरट्या आणि खोट्या मानवी जगात झोरबा कायम उपाशी आणि एकाकीच राहाणार.

धर्म, परमेश्वर यांना झोरबा फारसे महत्त्व देत नाही. केवळ श्रद्धेचे स्थान एवढाच या गोष्टींना तो मान देतो. त्याला धर्मांधपणा, आणि धर्माच्या नावाखाली जगणारी धर्मगुरू-भिक्षूंसारखी इतर ढोंगी माणसे यांचा राग येतो, याची जाणीव पदोपदी लेखकाला होत असते.

मध्यंतरी डेम हॉर्टेन्स्चे आजारपण विकोपाला जाऊन तिचा अत्यंत हृदयद्रावक अंत होतो. दरिद्री गावकरी तिच्या प्रेताखेरीज इतर सर्व मालमत्ता लुटून नेतात. झोरबा तिची आठवण म्हणून तिच्याकडील पोपट ठेवून घेतो. हृदयावरील हा आघात केवळ एक नैसर्गिक घटना या भावनेने झोरबा स्वीकारतो. असे एक एक घाव मनावर वागवीतच तो पुन्हा नव्या नव्या उसळीनं जगत असतो.

लेखक मुक्काम संपवायचे ठरवतो आणि झोरबा अत्यंत दुःखी होतो. परत भेटण्याची आश्वासने नानापरींनी देऊनही त्याचे समाधान होत नाही. या दुःखावेगात त्याची जीभ जणू नृत्य करू लागते. लेखकाला देखील पाझर फुटतो. एक तुर्की विरहगीत मनाच्या खोल गाभ्यातून झोरबाच्या ओठावर येते आणि लेखकाचा तो पुन्हा न भेटण्यासाठी निरोप घेतो.

लेखक आपल्या नेहमीच्या जीवनात गढून जातो. झोरबाच्या आठवणी मनात घर करून असतात. अधून मधून झोरबाची पत्रे येतात. तो वेगवेगळ्या खाणींत काम करत हिंडत असतो, नंतर तो लग्न देखील करतो,



अचानक सैबेरियातील एका गावातील शाळामास्तरचे पत्र येते. त्यात झोरबाच्या मृत्यूची बातमी असते. झोरबा अखेरच्या दिवसांत खाणमालक झालेला असतो आणि अखेरपर्यंत लेखकाच्या आठवणींतच तो हरवलेला असतो. आपले संतूर आठवण म्हणून लेखकाला द्यायला त्याने सांगितलेले असते. अखेरच्या क्षणापर्यंत झोरबा मनाने खंबीर असतो आणि अक्षरशः हसत हसत मृत्यूला स्वीकारतो.

असे हे झोरबाचे कलंदर जीवन. समाजजीवनाची चिवट बंधने तोडू न शकणाऱ्या आपल्या पांढरपेशा मनाला तो पेलता येत नाही, आणि विसरू म्हटले तरी विसरताही येत नाही.

++

# वनचरांचा सोयरा

कु. रंजना सरोदे
एम्. ए. (मराठी)

'निसर्गाचा आदिअंत नसलेला विशाल ग्रंथ मी पाहिला आणि त्यातील चार अक्षरे मला ओळखता येऊ लागली. ही अक्षरओळख झाली आणि लवकरच पशुपक्षी मारण्यातला आनंद नाहीसा झाला. त्यांच्याविषयीचे कुतुहल, जिव्हाळा एवढेच उरले. बंदुकीऐवजी दुर्बीण आणि रेखाचित्राची वही घेऊन रानात जाणे मला जास्ती आनंदाचे वाटू लागले.' असे व्यंकटेश माडगूळकर म्हणतात. हा आनंद मिळविण्यासाठी आपण आपल्या देशातील दूरदूरच्या जंगलांत राहावे, तिथले प्राणिजीवन, पक्षिजीवन, झाडेझुडे पाहात मनमुराद भटकावे आणि या अनुभवाला शब्दरूप द्यावे असे त्यांना वाटू लागले. काही परदेशी प्राणिशास्त्रज्ञांनी असा उद्योग करून लिहिलेली उत्तम पुस्तके त्यांच्या वाचनात आल्यावर त्यांची ही इच्छा फारच बळावली. त्यांनी अनेक ठिकाणी भ्रमंती केली आणि आपले अनुभव शब्दांतून व रेषांतून साकार केले.

प्राण्यांविषयीच्या याच निर्भेळ कुतुहलाने व जिज्ञासेने त्यांनी महाराष्ट्रातील नागझिरा येथे काही दिवस वास्तव्य केले आणि तिथले प्राणिजीवन, वनस्पतिजीवन अगदी जवळून पाहिले. तेथील वास्तव्यात कांचनमृगाचे भव्य शिंग आणि जबड्याचे हाड एका झाडाच्या खोडावर अडकवलेले ते रोज जाता येता पाहात असत. माडगूळकर म्हणतात, 'इतिहास-कालीन भग्न अवशेष पाहून होते तसे माझे मन ही शिंगे पाहून उदास होत असे.' माडगूळकरांनी निसर्ग आणि मानव यांच्यातील अतूट नाते पाहण्याचा प्रयत्न केला. त्यांनी माणूस निसर्गाच्या संदर्भातच पाहिला. शास्त्रज्ञाप्रमाणे केवळ, प्राण्यांच्या नोंदी करणे, वनस्पतींच्या जाती शोधणे हा त्यांचा उद्देश नव्हता, तर वन्य प्राण्यांची, पशुपक्षांची, वनस्पतींची वेगवेगळी रूपे न्यहाळणं आणि या जीवसृष्टींतून एकच जीवनप्रवाह कसा वाहतो आहे त्याचा अनुभव घेणं हाच त्यांचा उद्देश होता.

कोणतेही जनावर माणसावर, त्याची आगळीक नसेल तर हल्ला करत नाही. कारण माणूस हे कोणाचेही नैसर्गिक भक्ष्य नाही, असे ते म्हणतात. मात्र माणसाने संशय येईल असे टक लावून न पाहिले पाहिजे. एकदम बसणे, एकदम उठणे, वळणे, धावणे, हात मागेपुढे घेणे अशा संशयास्पद हालचाली टाळल्या पाहिजेत; स्वतःच्या श्रेष्ठतेची, कर्तृत्वाची घमेंड त्याने काढून टाकली पाहिजे असा ते आपला अनुभव सांगतात.

प्राण्यांच्या सहवासात असताना माडगूळकर अधिकच अंतर्मुख होतात. ते म्हणतात, "माझी गाठ अस्वलाशी, अजगराशी, बिबळ्याशी कधी पडली नाही, पण कधी-मधी माझी गाठ माझ्याशीच मात्र पडली." शिकार झालेली कांचनमृगी जंगलातील माणसे घेऊन गेली हे पाहून त्यांच्या मनात विचार येतो की, आदिमानवसुद्धा अशीच हिंस्र पशूने मारलेली शिकार बळकावत असेल. आणि आपल्याला जाणवते की अजून माणूस तसाच जंगली आहे.

रानकुत्री ही श्रेष्ठ धारिष्टय असणारी जंगली कुत्री-ही सर्वांच्याच रागाचा विषय असणारी. या प्राण्यांचा नाश करायला सरकारचीसुद्धा परवानगी आहे. पण याही कुत्र्यांचे जीवन ते समजावून घेतात. माडगूळकर त्यांना हिंस्र मानत नाहीत. या कुत्र्यांविषयीचा राग हा आपले भक्ष्य कोणी तिऱ्हाइताने मटकावले म्हणजे येतो तो राग असतो, असे ते म्हणतात. शिकारीला गेल्यावर जी पिले आणि अधू कुत्री मागे राहिली असतील त्यांनाही आपल्या शिकारीतला वाटा ही रानकुत्री देतात, त्यांच्यामध्ये खाण्यावरून एकमेकांत कधीच भांडणे होत नाहीत, अशी नवीन माहिती देऊन या रानकुत्र्यांकडेही ते आपल्याला सहानुभूतीने पाहायची दृष्टी देतात.

माणसांचा वावर नसलेला परिसर त्यांना अतिशय शांत आणि सुंदर वाटतो. तिरोडा रस्ता म्हणजे त्यांना जंगलचे वर्तमानपत्रच वाटते. लंगडणारा गवा गेल्याच्या खुणा, पाण्यावर आलेल्या चितळांचे लहानमोठे खूर, विश्रांतीनंतर खाल्लेल्या पानांची वानरांनी काढलेली ताजी रांगोळी, कांचनमृगाचे कळप, सांबरे गेल्याच्या खुणा यांची नैसर्गिक चित्रलिपी त्यांना सहजपणे वाचता येते. तेंदूचे लालचुटुक कोंब पाहून तांबड्या लाल रस्त्याला जरीपदरी ऐश्वर्य आल्यासारखे त्यांना वाटते. पण माणसांचा वावर सुरू झाल्यावर झाडाच्या फांद्या ओढल्यामुळे उठलेले कुरूप फराटे, बांबूंची छिन्न-विछिन्न बेटे, असे चित्र बदलल्यामुळे त्यांना रोज सकाळच्या वृत्तपत्राप्रमाणे वाचता येणारा तो सुंदर रस्ता भेळ खाऊन टाकलेल्या, चुरगळलेल्या रद्दी कागदासारखा दिसू लागतो.

जंगलातील काही प्राण्यांचे मरण पाहून माडगूळ-करांना थोडेफार 'मरण' दिसले. चारा खाऊन जगणारे प्राणी हे क्रूर पशूंचे अन्न आहे. हात असणारे हात नसणाऱ्यांना खातात, शूर प्राण्यांचे अन्न भित्रे प्राणी खातात, असंख्य जीवांचे बलिदान होते, बेडकांना करकोचे गिळतात आणि कासवे व बेडूक ह्यांचा रस्त्या-वरून जाताना गाडीखाली सापडून चेंदामेंदा होतो. कधी कधी जणू रक्तामांसाचा वर्षावच होतो. अपघाताची शक्यता लक्षात घेतली तर त्या मरणाचे स्वरूप कसे आहे ते कळून येते. माडगूळकरांसारख्या विवेकी माणसाच्या मनावर या मरणचक्राचा जो ठसा उमटतो तो विश्वातल्या निरागसपणाचाच असतो.

माडगूळकरांनी प्राण्यांचे निरीक्षण अगदी सूक्ष्मपणे केले आहे. वानरे उडणाऱ्या म्हातारीतील काळ्या बिया किती वेळ लागेल याला महत्त्व न देता खातात. अंजनाचा चार थेंब रस चाटण्यासाठी दात गमावण्याचा खटाटोपही ते करतात. एक वानर पाणी पीत असताना दुसरे वानर पाठीमागे संरक्षणासाठी बसते. नाकावरच्या व्रणामुळे विद्रूप दिसणारा वानराचा चेहराही त्यांची नजर टिपते. श्येन पक्ष्याच्या बारीक-सारीक हालचाली ते निरखतात. कोळ्याने माशीला आपल्या तडाख्यात पकडल्याचे नाटचही ते न्यहाळतात.

हे वन्य प्राणी पाण्यावर त्यांना धोका असेल तर झाडावरील पक्षी त्यांना सावध करतात. रात्री प्राणी पाण्यावर आल्यावर आवाज न करता पाणी पितात आणि परततात. रोजगारी माणसे तळ्यावर आल्यावर मात्र त्यांच्या आवाजाने भयभीत होऊन तहानलेली जनावरे पाणी न पिताच परत जातात, अशी त्यांची सूक्ष्म निरीक्षणे. कितीतरी.

एकांत, स्वावलंबन आणि प्रत्येक बाबतीत मितव्यय ही त्रिसूत्री पाळून जंगलात पायी भटकायचे, निसर्गाच्या कुशीत राहून निरागस असा आनंद लुटायचा या माफक अपेक्षेने ते नागझिरा येथे गेले. तेथील त्यांचा काळ फार आनंदाचा गेला. परतताना स्टेशनवरची गर्दी, गोंधळ, माणसे बघून पुन्हा आपल्या ओळखीच्या जगात आपण परत आलो याचा आनंद मात्र त्यांना झाला नाही. वेळ होता म्हणून झुळझुळीत कपडे घालून ते पोशाखी बनले. जेवण-खाण आटोपले, वृत्तपत्र वाचले, सिगरेटी विकत घेतल्या पण ते केवळ नित्याच्या सवयीने. प्राणी जातीचे संरक्षण करणे हाच उद्देश सवयीच्या मुळाशी असतो. सवय ही बाब घेतली तर माणूस आणि प्राणी ह्यांत काही फारसा फरक नाही हे त्यांना या अनुभवातून जाणवते आणि माणूस हाही शेवटी या निसर्गातीलच एक प्राणी आहे याची आपल्या-लाही ते जाणीव करून देतात.

माडगूळकरांनी 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसं' यांसारखे उत्कृष्ट साहित्य लिहले असले, तरी त्यांच्या 'रानमेवा', 'नागझिरा'सारख्या निसर्गाच्या सह-वासातील अनुभव-चित्रणाचे महत्त्व काही वेगळेच आहे. यापूर्वी मराठी साहित्यात असा प्रयोग फारसा झाला नाही. मनुष्यप्राणी, वन्यप्राणी, पशुपक्षी, कीटक, वनस्पती या सर्वांचा ते एकाच वेळी एकत्रित व एकमेकांच्या संदर्भात विचार करतात. त्यांना चित्र-रेखाटणाचीही आवड आहे. चित्र रेखाटण्याची त्यांची दृष्टी आणि साहित्यिकाची दृष्टी यांचा समन्वय साधून त्यांची जी कलाकृती निर्माण होते ती आगळ्या स्वरूपाची असते. चित्रकाराच्या दृष्टीमुळेच त्यांची शैली चित्रमय बनली आहे. त्यांनी मनुष्याच्या मूल्य कल्पना निसर्गावर लादल्या नाहीत किंवा 'केवळ भीषण, केवळ सुंदर' असे रोमँटिक रूपही त्याला दिले नाही. जीवनाचा विविधरंगी, विविधढंगी स्वाभाविक आविष्कार म्हणूनच त्याच्याकडे पाहिले आहे.

माडगूळकरांच्या या प्रकारच्या लेखनामुळे मराठी साहित्याला एक वेगळे परिमाण लाभले आहे आणि वाचकालाही केवळ प्राणिजीवनाकडेच नव्हे तर मानवी जीवनाकडेही पाहण्याची एक नवी सुजाण दृष्टी मिळाली आहे असं मला वाटतं. ++

## आरादखाना


दयानंद मिसाळ
एम्. ए. हिंदी– I


आज मंगळवार. रूपाबाईच्या घरी नुसती धावपळ चालली होती. तिच्या थोरल्या दोन मुली, थोरला मुलगा, त्यांची लेकरं-बाळं सगळी देव-देवासाठी आली होती. मुलानं कार्यासाठी चारशे रुपये दिलं होतं. बकर परचंच होतं. स्वैपाकाचा घरात धुमाकूळ उठला होता. तिन्ही खोल्यांतून धुराचं लोट निघत होतं. रूपाबाई बाहेर येऊन उंबऱ्यात बसली. समोरून एक म्हातारा येताना दिसला. तो जवळ आला आणि त्यानं येता येता विचारलं,

'काय रूपा, काय गडबड हाय ?' तशी ती हासत हासत म्हणाली,

'या की सितारामदादा. या.' तिनं गोधडं टाकलं. त्यावर तो बसतोय् तंवर रूपानं सुरवात केली,

'आवं, माझ्या धाकट्या पोरीच्या अंजूच्या हातावर आईचं ताट आलंय, तवा आरादखाना घालाय सांगितला हुता.'

'कुणी सांगितलं ताट आलंय म्हणून !'

'आपल्या माणकुभावनं सांगितलं की, नवं वारं हाय, आईचं ताट येतंय, म्हणून जरा आपिष्टा व्हतीय, आरादखाना घाल, मान पडंल.'

'आता ताट काय तोंडाचं हाय का ? तुळजापुरला जायाचं, ताट आणायचं, पुना सवासनींचा खर्च, बकरं, आराद्यांचं जेवाण, मिळून हाजारव्र रुपै खर्चं आलाच की.'

'मग ? आता ह्यो आरादखाना म्हणवलाय.'

'खरं हाय बया, खरं हाय. पर काय झालं हुतं आंजीला ?' तवा रूपा लेकीचं दुखणं सांगू लागली–

'काय हुयाचं ? नुसतं पोटच धरलं हुतं. मायंदाळ प्वाट दुखायचं. आज दोन म्हैनं झालं पोरीची नुसती खाट काढली बघा, प्वाट-प्वाट करूनच पोरीचा आकडा झाला हुता.'

'मग काय दवा डाग्तार बी करायचं का न्हवं ?'

'तर वो ! दोन सुया मारल्या, पण काय सुदीक उपेग न्हाय. मग माणकुभावनंच अंगारा लावला न् ताट येतंय म्हणून सांगितलं.'

मग तुळजापुराला जायाचं काय का...'

'तर-तर. आज सव्वाम्हैण्याचं तुळजापुराला जाऊन, राशीनच्या आयला सांगून आलू. तवा तर ही कारस्थान चाललंय.'

'मग हाय.' जरा थांबून म्हातारं पुन्हा म्हणालं, 'गुरू कोण करतीय् ?'

'आता दुसरं कोन ? माणकुलाच सांगितलंय्. त्याला कापडं बी घेऊन ठिवल्याती.' पुन्हा थांबून रूपा म्हणाली,

'आता गुरू मंजी म्होरक्याच की...'

'व्हय म्होरक्याच. पण कार्याचं सगळं बैजवार करावं लागतं, ज्याला ताट येतंय् त्याला मांडीवर धीयाचं, त्याचं कान फुकायचं मंजी हुंदकार गाजवायचा न् नाव सारून मोकळं हुयाचं.'



'आन् पोषाक चढऊन रिकामं हुयाचं.' म्हणीत रूपा हसायला लागली. म्हातारं बी हासायला लागलं आणि उठता उठता म्हणालं,

'बरं रूपा निघतु मी.' म्हणीत उभा राहिलं न् म्हणालं,

'साळुकडं निघालू हुतू. तिचं बी मदवं प्वार लई ज्यार हाय म्हणं. निरूप दिला हुता बाजारात आल्या बागवानाजवळ.'

'आता वो दादा.' रूपा काळजीनं बोलली, 'आमाला तर ह्यातलं कायबी माहीत न्हाय. आलं-गेलं, चुकलं-वाकलं सांगाया तुमी हायतच म्हणून मी तुमच्या-कडंच निघाली हुती आता.'

'मंजी आता माझंच जाणं रहीत करतीय् म्हण की.'

'व्हय. व्हय. त्येच म्हणत हुती मीबी. होवं तर उद्या जावा. परसाद घेऊनच.'

'वर-वर. बरं मार्गावरून जाऊन आला न्हवं ? का बकरंच लावलं न्हाय अजून ?'

'न्हाय की गा दादा'

'कां बरं इतका का उशीर केला ?' तसं रूपानं काळजीच्या सुरात माहिती पुरविली,

'आता मार्गावर जायाचं मंजी गुरूला घेऊन बोकडाचं लाऊन आनायचं का न्हाय ? पाच पावलावर जाऊन...'

'मग काय झालं ?' तशी रूपा पुढं सांगायला लागली–

'सकाळीच जायाचं हुतं लौकर करावं म्हणून. बकरं, निवद सगळं तयार हुत. पण माणकुच हाजर न्हाय. आन् आला उशीरा तर लागला की घोळ घालाया...'

म्हातारं कपाळाला आठ्या पाडत बोललं, 'का ? कशाचा घोळ घातला त्यानं ?'

'आता काय सांगू...' रूपा तावातावानं सांगाय लागली,

'त्याचं म्हणनं, त्या पारूचं ताट पुजाय न्हाय पायजी आन् म्या सांगल तेवढ्याच परड्या पुजाया पायजीत.'

त्याच सुरात म्हातारं कावलं, 'आसं कसं व्हयील ?

'मग आता तुमिच सांगा दादा, देवाला आसं दुजं धरून चालंल का ? व्हय ?' मग म्हातारं चिडलं,

'हिच्या बायलीला ! पेलं फिलं हुतं का काय ?'

'काय की ! आयला डोळं. पण आता म्या त्या शाकुलाच गुरू करून घ्यावं म्हणती.'

'हां–हां, त्या कुशीच्या मेळ्यातली व्हय ?'

'व्हय–व्हय. तीच शाकु. मालीची थोरली भन.'

'झ्याक केलं. तिला सांगितलंय न्हवं ?'

'तर. तीच की समदं सांगाय लागली. पण त्यो न्हाई आला.'

'नसु द्या. बोलव शाकुला. निवदाचं ताट घ्या. त्यांचा मेळा बोलवा, आल्यालं आरादी अन् बकरं घेऊन निघा बरं मार्गावर, चला.'

झालं ! एवढा सगळा लवाजमा निघाला. हालगी सुरू झाली. एकीनं झांज घेतली तर दुसऱ्या दोघीनं सूर काढला.

'गण म्या गाईला मंगळवारी,
गण म्या गाईला मंगळवारी
आली आंबीकीची स्वारी गं, ग ग या गं गण म्या गाईला...'

मागच्यांनी त्यांची री ओढली. लवाजमा वाटंवर आला. मुसलमान तयारच होता. शाकुनं पूजा केली. बकऱ्याला हाळद-कुंकू लावलं. तसं मुसलमानानं धरून त्याला पाडलं न् मुठीत पानी घेऊन त्याच्या तोंडात सोडलं अन बकऱ्याची मान उलटी झाली. रक्ताचा सडा सांडला. शाकूनं रक्त हातात धरून पाच दगडांवर सोडलं. मुसलमानानं ते ओझं उचलून घरी आणलं. त्याचा सगळा सदरा रक्तानं भरला. त्यानं सगळं नीट-निटकं करून दिलं. रूपाकडून सव्वापाच रुपै घेतलं न् निघून गेला. एवढं सगळं झाल्यावर माणिक तिथं हाजर झाला. त्याला बघून रूपा त्याला म्हणाली,

'का रं माणकुभाव, ये की घरात.' तर माणकु गुश्यातच म्हणतो,

'न्हाय. बरं हाय हितंच. मला कुकू दिलं न् गुरू दुसऱ्याला केला. करा की करा. पर नाव कसं सारतीया त्येच बघतु की मी पण.'

'आरं, पण झालं तरी काय ?' सिताराम म्हातारं बोललं. मग माणकुनं हकिगत सुरू केली, 'हे बघ दादा, गुरू होवं म्हणून मला कुकू दिलं.'

'मग काय झालं ?' तशी रूपा हात पुढं करून बोलली–

'मी सांगत्ये की काय झालं, तू नुसतं हुं म्हणून ऐक. हे बघ, ह्यो म्हणला मला, गुरू केलं तर आमकीचं ताट पुजू नकू, तमकीचं ताट पुजू नकू. आन आमी तर आपल्या मव्हल्ल्यातल्या सगळ्या आराद्यास्नी कुकू दिल्यालं..'

'मग ? व्हय्, द्यावंच लागतं की.'

'मग आता तूच सांग. आपल्या दारात आल्याली परडी पुजायची न्हाय, तर मग पुना आयचं खरूज-नायटं कुनी निस्तरत बसायचं, सांग !'

'तसं कसं ? तिलाच दुजं धरून डबल हिसकं कोन करंल ?' मग रूपा निर्वाणीचं बोलली, 'मग बाबा, मी म्हणलं, माझ्याच्यानं शाप जमायचं न्हाय. उगंच का गरिबाला 'घी हिसकं न् तोड दावं' कराय् लावतु ?' तसा माणकु गुराकला,

'मग मला कुकूच कशाला दियाचं हुतं ?'

'का रं बाबा ? तू देवाचं झाड. तुला कुकू दिलं, ती काय आमची चुकी झाली का ? सांग.'

'न्हवं. न्हवं... ...'

'बरं बरं, चला.' सिताराम म्हातारं समजावत बोललं, म्हणालं आन् माणकूला हातानं ढकलत येड्यागत करतोय्. 'माणकू, चल. तू बी शाणा आसून येड्यागत करतोय्. तूच आता ह्यास्नी बैजवार सांग बरं.' तरी माणकु अरेरावीत बोलतोय्.

'म्या का सांगन ? कोण गुरू हुतंय तिनंच सांगु दे की.' म्हातारं पुन्हा समजावत म्हणालं,

'आरं, पर तुलाच गुरु-घर मानुन त्यांनी एवडा खर्चं केलाय्. तुला उभा-पोशाक केलाय त्या खर्चाचं काय करायचं सांग ?'

'का ? माझ्या परस्पाऱ्या कुनी सांगितलं त्यानीच सांगु दे की आता. जोखमीचं काम आलं की माणकु आटावला काय ?' माणकुची अरेरावी चालूच. तरी म्हातारं समजावनीच्या सुरात म्हणालं, 'आरं, पर तू हिकडं यईना झाल्यावर त्यांनी तसं केलं. मंग आता

आलीच तर काय आसंल तसं सांगून तुझा तू गुरूचा मान घ्ये की.'

तसं माणिकबरोबरच्या आरादीनबाईनं मदीच तोंड घातलं,

'आता त्यो का म्हनून सांगंल ? अट्टल आरादीन हाय, ती सांगंल की.' तशी उंबऱ्यातनं शाकू कडाडली,

'व्हय व्हय. आगं जा. कोण मस्का लावतंय् फुगीराला ? आमचं आमी बघु सगळं. आमीबी हातावर परडीच घेतलीया न्हवं ? घाटी तर न्हाय !'

म्हाताऱ्यानं मदी तोंड घातलं, 'आरं, हे गरीबाचं कार्य हाय. देवाच्या कार्याला आडऊन धरताय् तुमी ! खर्च झाला ह्या गरीबाचा आन् भांडनं तुमची ! न्याय हाय गड्या !'

झालं. तात्पुरतं तरी ते थांबलं. घरातली सगळी आपापल्या कामात दंग होती. जिच्या हातावर ताट यायचं ती आंजू तर कशातच नव्हती. तिचं कार्य म्हणून जी काय होतं ते सगळं दुसऱ्यांनीच केलं होतं. काय चाललंय् तिला माहीतच नव्हतं. दुपारी हे सगळं घडलं होतं अन् आता पाच साडेपाच वाजल्या होत्या. आता पुन्हा मार्ग मळून झाल्यावर परड्याच भरायच्या होत्या. सैपाक सुरू होता. माणिक न् ती बाई त्यांच्या मेळ्यात बसली होती. दुसऱ्या दोन बाजूला दोन अन् समोर कुशीचा, आसं मेळं बसलं होतं. बघता बघता त्यांच्यातच भांडणं जुंपली. तशी एकीनं हाक दिली,

'रूपा, एऽऽरूपा. हिकडं ये बरं वाईच.'

'आली गऽ आली.' रूपा घरातूनच म्हणाली, 'एवडं निवदाचं ताट भरलं का कामच झालं' म्हणीत पदराला हात पुशीत बाहेर आली. तवा ती बाई म्हणाली,

'हे बघ रूपा, पयला निवद आमच्याच परडीत पडला पायजी, आमची मानाची ताटं हायती.' तंवर दुसऱ्या मेळ्यातून एक ओरडली,

'न्हाय न्हाय रूपा. पयला आमच्याच ताटात पडला पायजी. न्हाय तर सगळ्यास्नी ताटं घेव घेव घरी लावीन आन् मंग कोण मार्ग मळायला येतंय् ते बी बगीन.'



रूपा हे ऐकून चांगलीच घाबरली. 'आता कसं करू बया...'

'आता कसं करू. न्हवं. सांगितलं न्हाय म्हनु नकु पुना.'

'आन् हे बघ, परतेकीच्या परडीत सव्वा-सवा रुपाया बी टाकला पायजे.' आता मात्र रूपा पुरती दिनाऊन गेली. पुन्हा तीच बाई म्हणाली,

'आन् हे बघ, मी मातंगी आय हाय. ताटात सव्वा-पाच रुपये ठेवल्याबिगर निवदाचं ताटच हालु दियाची न्हाय. न्हवं, त्यो माझा मानच हाय.'

थांबून म्हातारं म्हणालं,

'हे बघा पोरीहो, तुम्ही देवाला आलाय का भांडायला ?'

तशी एक जणी गुरकली, 'का ? आमचं आमी बगुन घेव.' मग म्हाताऱ्याच्या स्वर जरा चढला,

'आता हिची बायली ! देव न्हायला, कार्य न्हायलं आन् मानासाठीच भांडता व्हय, हापापल्या वानी ? हितं पैसं टाका, तितं पैसं टाका, काय खान-बिन लागलीय व्हय पैशाची ?' आता मात्र सगळी गप्प झाली. म्हाताऱ्याचं बोलणं चालूच–

'पोटासाठी परड्या वागवताय का देवासाठी ? का देवीच्या नावावर तुमीच जगता, व्हय ? सांगा की. का ? आता काय वाचा बसली व्हय तुमची ?'

तशी एक आरादीन गळ्यातली कवड्यांची माळ सावरत हळूच म्हणाली, 'मंग आता आमी काय करावं सांगा की.' तसं म्हातारं सांगाय लागलं, 'हे बघा, पाच तितं परमेसर आसतो का न्हवं ? सांगा.' तसं दोन-चार जनी एकदाच बोलल्या, 'व्हय, आसतुया की. मंग ?' मग म्हातारं रूपाला म्हणालं,

'हे बघ रूपा, निवदाच्या ताटात पाच आण्याचं पैसं टाक आन् परतेकीच्या परडीत निवद, दोन भाकरी, बरबटाचा परसाद आन् पाच-पाच पैसं टाकायचं.' पुन्हा थांबून म्हणालं,

'उगंच आपलं गरीब घावलं की लुटायचं बघत्यात, आरादनी झाल्यात मनकवड्या.' हे ऐकून कुशाबाईच्या कपाळावर आठ चढल्या. ती जरा रागातच बोलली,

'आरं आरं आरं. आरादनीला तरी नावं ठिऊ नकू. जरा नीट बोल. आंबिकीला निंदू नकू. वल्या झाडाला आग लावती. तितं कस्पाटाची काय रं कथा ?' आणि हात जोडीत म्हणाली,

'आय आंबिके, बगुन घे गंऽऽ आय काशीमाय माझी.'

तसं म्हातारं तरकाटलं न् आवाज चढवून बोललं,

'हां हां हां. ती आरादनीचा बारा माकडी खेळ मला दाऊ नकू. मी बघतोय्च की, जी आयच्या कार्यात आडवून आनंल, तिचं कार्य सोडून आपल्या पैशाला गाट घालंल तिला बी आंबाबाय बघलंच की. का तिच्याच वक्ति तिचं डोळं फुटत्यात का काय ?'

तशा साऱ्या आरादनी गप झाल्या. मग कुशाबाईच म्हणाली,

'बरं हे राह्यलं. पण जिचं जिचं मेळं हायती त्यांच्या परतेकीच्या आरतीचं सव्वाआकरा-सव्वाआकरा रुपये द्यावं लागत्याल आन् गुरूला उभा पोशाक, त्याच्या वटीला सव्वाआकरा रुपय आन् वटीचं सामान घालावं लागंल.'

हे बाहेर चालू होतं तंवर घरातून अंजूचा आवाज आला,

'आगं आका, आजून किती निवाद करू गंऽऽ. माझ्या पोटात वाईच दुखाय लागलंय्.'

'राहू दी निवद, पड जरा, वाईच, बरं वाटंल.' रूपा भाइरनंच म्हणाली.

निवद करण्याचं काम चालूच होतं. मार्ग मळायला अजून जायचं होतं तंवरच त्यांची भांडणं सुरू झाली होती. आंजू तर घरातच. जे केलं होतं ते तिच्या होनाऱ्या गुरू शाकुनं. ह्यातच साडेसहा वाजत आल्या होत्या.

निवदाचं ताट भरलं. राहिलेल्या परड्या बोलावून आनल्या. त्यातल्या आरादनींच्या एका जोडीत बोलणं चाललं होतं,

'व्हय गं सुमा, आयताच उतारा मिळतोय, घेवू की आपुन बी थोडी, थोडी.' पण सुमा घाबरली,

'नकं बया, देवाचं काम हाय. आयचं कार्य्य आन् पुना कुनी निस्तरावं गं, उगंच आपलं 'हा म्हणता थोडं पळायचं.'

'आगं चल. आपुन बी आरादनीच हाय की, का कुनी वास घेनार हाय आपल्या तोंडाचा.'

परड्या घेतलेल्या, कवड्यांची माळ गळ्यात आडकवलेल्या न् हातात पोत घेतलेल्यांची संख्या तिसावर गेली होती. कुबट वास त्यांच्या मेळ्यांतून दरवळत होता. डोळे झिंगल्यासारखे झाले होते. जवळजवळ निम्म्यापेक्षा जास्त भक्त-भक्तिनी दारू प्यायल्या होत्या. त्यातनंच एक जन म्हणाली,

'कशात आडलंय गंऽ, चला की, मार्ग मळून येऊ म्हणावं. निवद दाखवायचा हाय का न्हाय ?' मग रूपानं तिला सांगितलं,

'आगं माझ्या आंजूच्या पोटात दुखतंय. ती वाईच पडलीय् म्हणून थांबलंय.' तशी सुमीची जोडीदारीन म्हणाली,

'आगं मग निम्या रातीला निवद दावतीच का काय ? तिकडनं येऊन परड्या भरायच्या, सवासनी, आरादनी जेवायच्या, पावनी-रावळी हायतंच अजून.'

'मग कसं करू म्हणती ?'

सुमी झिंगलेल्या डोळ्याला हात लावीत म्हणाली, 'चला चला. मुख्ये देवीचा गोडाचा चोख निवद तर हाय त्यो, त्याला कशाला आंजी ? मग दैत्याला बकरं हायच की. चला आपुन उशीर करू नका.'

'आगं पण, आंजुला घेण्याचं कसं काय ?'

'आग तिला पडूदी, नुसतं हाळद-कुकू निवदाच्या ताटाला लाव म्हणावं तिला.' सुमानं सांगितलं, मग रूपानं सितारामकडं पाहुन हात वाकडा केला,

'कसं वो दादा, मुख्ये मालकिनंच घरी न् आपलंच काय काम हाय तितं ? मला तर काय समजंना बाबा आता.'

'आता हे बघ रूपा, सकाळपास्नं ह्यांचाच गोंधूळ चाललाय. आता तरी काय ती म्हणत्यात तसं. कार्याची मालकीन घरात, निवदाचं ताट आपल्या हातात आन् देवीला दावाय् ह्या भगतीनी. चला. काय त्यांचं आसंल तसं.' म्हातारं निराश झालं. रूपानं बी निराशेच्या सुरात सांगितलं,

'सकाळपास्नं ह्यांनी डोकं उठीवलंय, आता मला तरी काय ठावं हाय का ?'

'आसू. देवि आय आंबाबाय गरीबाची भोळी भक्ती मानुन घे गं आय.' म्हणीत पाया पडून निवदाचं ताट तिनं हातावर उचलून घेतलं आणि तो सगळा ताफा रस्त्याला 'मार्ग मळायला' निघाला. गाणं सुरू झालं. हालगीनं ताल धरला.

'घेगं घेगं आंबाबाई, घेगं घेगं येडुबाई
आनला निवद तुला भगतानं
मानुनी घ्यावा तुळजामाई।'

ते रस्त्यावर अजून पोहोचायचे होते तवर एक आठ-दहा वर्षांचं पोरगं पाठीमागून धावत आलं आणि रूपाला हाका मारू लागलं, 'ए आका, एऽऽआकाऽ' कुनीतरी रूपाला थांबवलं. तिला वाटलं आजून काय इसारलं, म्हणून ती घाबरली.

'का रं बापू, का पळत आलास ?' तसं ती पोरगं दम घेत म्हणालं, 'आगं, आत्यानं तुला माघारी बोलवलंय.' ती जास्तच घाबरली. 'कारं काय झालं ?' ती पोरगं थांबून म्हणालं,

'आगं आंजू आत्याला कावळा शिवलाय, म्हणून बोलावलंय.'

झालं. एका घटकंत सगळं वातावरण शांत झालं. आराधांचं गाणं, हालगी, झांज गप झाली. घरच्या चुली शांत झाल्या. ओटचावर रूपा न् म्हातारं राहिलं. शेळीजवळ कोपऱ्यात आंजू डोळं पुसत होती आणि चुलवानावर हंडचात रश्यावर तेल वर आलं होतं.

++

# डायरी

**राजेंद्र कोकरे**
प्रथम वर्ष, कला

आज शेवटचा पीरिअड फारच बोअर झाला. तो शेवटचाच असल्यामुळं तशी प्रेझेंटी कमीच होती. बेलची वाट बघत बसलो होतो. टाइमपास म्हणून सरांचं 'स्केच' वहीत काढत होतो. एकदाची बेल खणखणली. आणि वर्गातून बाहेर पडलो. स्टँडपर्यंत जायला कोणाची कंपनीही नव्हती. स्टँडपर्यंत जाणं अगदी जिवावर आलं होतं. मेन गेटमधून बाहेर आलो. समोर काहीतरी चमकल्यासारखं दिसलं. डायरीसारखं काहीतरी असावं. पटकन जाऊन पाहिलं– ती डायरीच होती. डायरीतील पानं चाळू लागलो. बऱ्याच ठिकाणी तारखा टाकून मजकूर लिहिलेला होता. तारखाही रेग्युलर घातलेल्या नव्हत्या. अशाच एका पानापाशी थांबलो. ह्या पानावर दोन-तीन जाईची फुलं होती. कोमेजलेली. गंधहीन. वाळायला लागलेली.

शेवटच्या पानापर्यंत आलो. या पानावर ज्याची डायरी होती त्याचं नाव आणि पत्ता होता. पण नाव नाही सांगणार हं.



बराचसा मजकूर तिच्याबद्दल होता. आता काही जास्त उत्कंठा न वाढविता ही डायरीची तीन-चार पानं आपल्यापुढं पेश करतोय.

२७ जुलै...

गतजीवनातल्या कडू अन् गोड आठवणी नेहमीच येतात. ते लहानपणीचे दिवस मी कधीही विसरणार नाही. आठवणी जपणं मला फार आवडतं. कधीही एकटा असलो ना की, मला या आठवणी हमखास येतातच. अन् त्यांतच मी रंगून जातो.

... ... गावी निघालो होतो. बारामती एस्. टी. स्टँडवर आलो. स्टँडवर थोडीफार गर्दी. सर्व 'कॉमन' माणसं. त्यांत मीही. अचानक समोरून ती येताना दिसली. तिच्याबरोबर दुसरीही एकजण होती. तिला कुठंतरी पाहिलं होतं. पण नक्की कोण हे काही आठवत नव्हतं. तरीही अधून मधून नजर तिच्याकडे वळवत होतो... आठवलं, आठवलं. अरे ही जया... जया देशमुख ! जयश्री देशमुख !! आपली पूर्वीची, म्हणजे इयत्ता पाचवीतली क्लासमेट. वाटलं... खूप बोलावं हिच्याशी. आपल्या जुन्या वर्गाबद्दल, मित्रमैत्रिणींबद्दल इ. इ. पण मन मोठं विचित्र असतं म्हणतात. वाटलं... हिनं आपल्याला ओळखलं नाही किंवा ओळख दिली नाही तर ?

...बरं, जाऊ दे. हिच्यात पूर्वीचं किती साम्य जाणवतंय, ते पाहू लागलो. तिच्यात खूपसं पूर्वीचं साम्य जाणवलं... तेच ते विलक्षण बोलके डोळे. सावळा चेहरा. कपाळावर अगदी मधोमध लावलेली लाल गंधाची टिकली. केसात जाईचा गजरा... मला आठवतं, लहानपणीही हिच्या केसात जाईचा गजरा किंवा दोन-चार कसलीतरी फुलं खोवलेली असायचीच. असा एकही दिवस नसायचा की ज्या दिवशी ती 'फ्लावरलेस' असायची. हिच्या केसातली फुलं त्या वेळी हमखास माझं लक्ष वेधून घ्यायची. ती साधी होती. पण चारचौघींपेक्षा थोडी वेगळी होती. हे त्या वयातही जाणवायचं. मला तिच्याबद्दल खूप आदर वाटायचा. ती ही जया. पलीकडच्या बाकावर बसलेली होती. अन् आम्हा दोघांमध्ये अंतर होतं आठ वर्षांचं.

'केवळ तिनं आपल्याला ओळखलं नाही तर' या संशयानं चुकचुकलेल्या पालीमुळं मला तिच्याशी बोलता आलं नाही. बरं, जाऊ दे. पुन्हा केव्हातरी बोलू या, असं ठरवलंय.

१० सप्टेंबर...

सध्या मी गावीच आहे. सुट्टी असल्यामुळे. दररोजचे कार्यक्रम व्यवस्थित चालू आहेत. म्हणजे उशिरा उठणं. निवांतपणे सर्व आवरलं, इ. इ. आज मंगळवार. देवीचा वार. आज लवकर उठलो. कधीमधी देवाची आठवण आलीच तर देवाला जाणारा मी. आज देवीला गेलो होतो. सायकलवरून निघालो होतो. देवीच्या मंदिराजवळ आलो. सायकल स्टँडवर लावली. अन् पटापट पायऱ्या चढू लागलो. समोर पाहतो, तर पांढऱ्या फुलाफुलांच्या साडीत, हातात फुलांचं तबक अन् तांब्याचा तांब्या घेतलेली जया... माझ्यासमोर होती. तिच्या चेहऱ्यावरचा गोंधळ स्पष्ट जाणवत होता.'

एवढं वाचून मी मोठ्या आशेनं पान उलटलं आणि वाचू लागलो, 'एव्हाना तिच्या डोळ्यांनी मला ओळखल्याचं स्पष्ट दिसत होतं. मी तिच्याशी बोलणार इतक्यात...'

'काय जया, फार लवकर देवीला आलीस ?' हे वाक्य ऐकू आलं. देवीला प्रदक्षिणा घालता घालता एक म्हातारी काकूबाई तिची आस्थेवाईकपणे चौकशी करत होती. च्यायला ही म्हातारी कशाला मध्येच कडमडली... असा राग आला. चांगलाच mood off झाला. कसंबसं दर्शन आटोपून सायकलपाशी आलो. एव्हाना ती म्हातारी काकू आणि जया दर्शन आटोपून परत निघाल्या होत्या. अन् मी पाहात होतो, पाठमोरी जया अन् तिच्या केसातली सदैव हसणारी फुलं.

१५ सप्टेंबर...

आजच गावावरून कोल्हापूरला परत आलो. कॉलेज सुरळीत चालू झालंय. प्रवासामुळे कंटाळा आला होता. एक रुखरुख होतीच. जयाशी बोलायचं राहून गेलं याची. जयाची पाठमोरी आकृती मनःचक्षूसमोरून

काही हलत नव्हती.– अन् ती केसातली फुलं नजरेआड होत नव्हती. कॉटवर अडवा झालो. पुन्हा उठलो. वही, पेन घेतलं अन् जयाला चांगलं तीन-चार पानांचं पत्र लिहिलं. लहानपणाच्या गंमती... आठवणी... तिच्या-बद्दलचे माझे feelings वगैरे वगैरे... त्यामुळे तिच्याशी बोलल्याचं समाधान झालं. पत्र लिहिताना गेल्या आठ वर्षांतल्या भावना दाटून आल्या होत्या.

२ जानेवारी...

'अरे, ती कॉलेजला येत नाही हल्ली' ह्या वाक्याने मी चांगलाच हादरलो. तिच्याच कॉलेजमधला माझा मित्र विन्या मला सांगत होता. त्याला हे माझं जे काय चाललंय ते माहीत होतं व स्टँडवरच्या तिच्या भेटीपासून ते मंदिरातल्या भेटीपर्यंतची सारी टेप मी त्याच्यापुढे वाजवली होती. माझ्या पत्राने तर काही खळबळ उडवून दिली नसेल ना ? असं मला सारखं वाटत होतं. मी त्याला तसं बोलूनही दाखवलं. पण त्यानं माझी समजूत काढण्याचा, मला हसवण्याचा प्रयत्न केला. पण मी ? मी गंभीर.

माझं मन मला पुन:पुन्हा सांगत होतं– तुझ्या पत्रात काहीही वावगं नाही. त्यात कुठलीही अपेक्षा, आसक्ती नाही. एखादा मित्र मित्रालाच जसं फ्रँक्ली लिहितो तसंच लिहिलेलं पत्र होतं. पण मन मोठं विचित्र असतं. मला वाईट वाटत होतं. तिच्या घरी पत्राबद्दल काही गोंधळ उडाला नसेल ना ? याचं.

१२ फेब्रुवारी...

आजचं हे डायरीतील 'तिच्याविषयीचं कदाचित शेवटचंच पान. लिहायला मूडच नाही. पण लिहिलंच पाहिजे... मनाचा फार गोंधळ उडालाय. खुर्चीत बसून टेबलावरच्या रफ वहीत उगाचच रेघोट्या ओढत बसलो होतो... अडव्या तिडव्या रेघोट्या– रेघोट्याच रेघोट्या... आणखीच मनात गोंधळ. रेघोट्यांतच काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करत होतो. शेल्फमधील डायरी काढली अन् लिहायला बसलोय.

... त्या दिवशी विन्याबरोबर त्याच्या कॉलेजवर गेलो होतो. टाइमपास म्हणून. कँटीनमधला 'स्पेशल' घेऊन बाहेर आलो. पीरिअड सुटल्याची बेल झाली. वर्गावर्गातून पोरं-पोरी बाहेर येऊ लागली. प्राध्यापक स्टाफ रूमच्या दिशेनं जाऊ लागले. पलीकडच्या व्हरांड्यातून मैत्रिणींच्या घोळक्यातून जया येत होती. मला पाहताच ती माझ्याच दिशेनं यायला लागली. थंडीमुळे अंगावर शाल लपेटलेली जया मोठी लोभस दिसत होती. तिची पूर्वीचीच सर्व वैशिष्ट्ये तिच्या-बरोबर होती.

'विजू' तिनं हाक मारली.

मी थांबलो. विन्या सटकला.

'अरे, किती दिवसांनी भेटतोय़स ?' तिनं विचारलं. या विचारण्यात थोडं स्मित, थोडं आश्चर्य– थोडी फॉरमॅलिटी यांचं मिश्रण होतं.

मी फक्त हसलो.

'निदान तू मला हे तरी विचारलंस. तुला मी दोन-तीन वेळा भेटण्याचा प्रयत्न केला होता. पण काही ना काही अडथळे आले भेटण्यात.' मी.

मी मुद्दाम पत्राचा विषय काढला. त्यावर ती :

'विजू, तू असं पत्र पाठवायला नको होतंस.'

'का ? काय चूक झाली ? मला माहितीये तू काय बोलणार ते–' मी.

माझं वाक्य तोडत ती म्हणाली, 'नाही, तसं नाही रे. पण एखाद्या मुलीला एखाद्या मुलाचं पत्र आलं तर घरच्यांना काय वाटेल ? माझं किती bad impression झालं घरात.'

मी थोडा गंभीर झालो. मला तिचं बोलणं विचित्र वाटलं. आपण कोणत्याही अपेक्षेनं तिला पत्र लिहिलं नव्हतं. तरीही तिनं मला हे असं सुनवावं ?

'जया, मी तुला का पत्र लिहिलं ते सांगतो. तुझ्या-बद्दल मला पूर्वीपासून रिस्पेक्ट आहे. आजही आहे. तू एक लहानपणीची मैत्रीण. याच भावनेनं मी तुझ्याकडं पाहात आलोय. लहानपणापासून जी काही तुझी इमेज माझ्या मनात राहिली– ती कायमचीच राहिलीय. हायस्कूल संपवून कॉलेजात गेलो तरीही आपल्या जुन्या मित्रमैत्रिणींची मला आठवण येतच राहिली. त्यांत तुझं काही वेगळ्या स्वरूपातलं व्यक्तिमत्त्व माझ्या मनात घर करून राहिलंय.



त्या दिवशी तू अचानक स्टँडवर दिसलीस. अन् पूर्वस्मृतींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला. मी लहान झालो. सर्व सर्व आठवलं. तुला आठवतं... लहानपणी आपण कविता म्हणायचो. पण कविता म्हणताना माझा सूर इतरांच्या सुराबरोबर कधी जुळलाच नाही. आज माझं मलाच हसू येतंय. तू म्हणतेस, 'असं पत्र पाठवायला नको होतंस.'

मुलं-मुली एकमेकांना पत्र पाठवतात ते फक्त कोणत्यातरी अपेक्षेसाठीच का ? निरपेक्ष हेतूने कोणी पत्र पाठवू शकत नाही का ? पत्र पाठवल्यावर काही हलकटपणाच झालाय असंच समजायचं का ?

आता मला समजलंय की निरपेक्ष मैत्रीचाही आपला सूर इतरांबरोबर कधीही जुळणार नाही.' एवढं बोलून मी निघून गेलो.

आपण प्रवास करतो. प्रवासात आपली इतर प्रवाशांशी ओळख होते. काहीसा थोडाफार सलोखा निर्माण होतो. पण एकदा प्रवास संपल्यावर त्या प्रवासातल्या व्यक्ती पुन्हा कधी भेटत नाहीत... अन् भेटल्या तरी त्यांना नीट ओळखता येत नाही... आपलीही त्यांना ओळख पटत नाही."

एवढं वाचून मी खिन्न झालो अन् डायरी मिटली.

++

# देवऋषी

सौ. व्ही. आर. जंगम
एस्. वाय्. बी. ए.

आज रविवार आणि पौर्णिमा एकाच दिवशी आली होती. भगताच्या वाडीत नाथाच्या देवळात हळूहळू गर्दी जमू लागली होती. संध्याकाळचे ७ वाजायला आले होते. परगाववरून आठ-दहा गडी, बाया-माणसं आली होती. रात्री आरती झाल्यावर देवाच्या दरबारात गाऱ्हाणं मांडायचं अन् सोडवणूक मिळवायची. पावन्या मंडळींत एक बाई आली होती. आपल्या सहा महिन्यांच्या लेकराला जरीची घोंची अन् रंगी-बेरंगी गोंड्याचं टकुचं घालून त्याला बरोबर घेऊन ती आली होती. गाववाल्या लोकांकडे ती दत्तू सिरसाटाची चौकशी करीत होती. तेवढ्यात दत्तू सिरसाटच देवळात आला. आन् त्या बाईकडे पाहून चकित झाला. तिनं तर त्याला साष्टांग दंडवत घातला. आपलं पोरगं त्याच्या पायावर घातलं. त्याच्यापुढे ५१ रुपये, चांदीचा पाळणा आन् नारळ ठेवत ती म्हणाली,

'देवऋषी दादा, तुम्हीच हे तुमच्या हातानं नाथापुढे ठेवा आणि नवस फेडा.'

बाकीच्या मंडळींना याचा काहीच उलगडा होईना. कारण दत्तू सिरसाट म्हणजे भगतवाडीचा एक नंबरचा इद्रा माणूस. तसाच पट्टीचा दारुड्या. ती बाई त्याला देवऋषी दादा म्हणत होती. आणि बाकीचे सगळे कोड्यात पडले होते. दत्तू सिरसाटानं काहीतरी कारण सांगून गुरवाकडे बोट दाखवलं आन् तो तेथून सटकला. मंडळींचा नाइलाज झाला. त्या बाईनं रात्री देवाच्या

दरबारात आपल्या पोराला देवाच्या पायावर ठेवून नवस फेडला. आणि दुसऱ्या दिवशी ती निघून गेली.

हा प्रकार माझ्या समक्ष घडला होता. त्यामुळे ह्यात काहीतरी भानगड असली पाहिजे, असं मला वाटलं. मी दुसऱ्या दिवशी शिरसाटाच्या घरी गेले आणि त्याला विचारलं,

'दत्तू दादा, एक गोष्ट विचारू का ? रागावणार तर नाही ना ?'

तेव्हा दत्तू म्हणाला,

'अहो इचारा की; तुमच्यावर कशाचा राग ?' तेव्हा मी त्याला सरळच विचारलं– 'दादा, कालच्या रात्री ती कुसेगावची बाई तुम्हांला देवऋषी दादा म्हणत होती. तर तुम्ही देवऋषी कधीपासून झालात ?'

'हां, हां, ते होय ? आवं बसा, बसा की. ती एक गंमतच हाय बघा. ऐकायचीय तुम्हांला ?'

दत्तू दादा सांगू लागला,

'गेल्या सालची गोष्ट बघा. मी, मारत्या परीट, मन्या न्हावी आन् पांडू तात्या यवताला गेलो होतो. मारत्या परटाच्या किशाला सोयरिक बघायची हुती. सकाळच्याला उठून चौघं निघालो. यवताला पाहुण्यांच्याकडे बारा वाजता पोचलो. पोरगी बघितली आन् पावण्यांना राम-राम करून घर लवकर जवळ करावं म्हणून पाच वाजताच वडीनं घराकडं निघालो. पण यवत ते आपल्या भगतवाडीचा रस्ता चार-पाच तासांचा, तासभर चालल्यावर अंधार पडायला लागला. दिस थंडीचं, ह्या कडाका पडायचा. आजून तीन तासांचा रस्ता बाकी होता. पांडू तात्या थकील गडी; त्याच्याच्यानं चालनं होईना. आम्ही कुसेगावच्या माळावर आलो होतो.

पांडू तात्या म्हणाला, 'गड्यांनू, ही तितं वस्ती दिसतिया. तितंच रातच्या रात राहू आन् सकाळ उठून जाऊ. माझ्याच्यान् आता चालनं जमायचं न्हाय.'

आम्हांला बी कंटाळा आला होताच. पांडू तात्याचं म्हणनं आम्हांला पटलं. आम्ही वस्तीवर गेलो. तर एक म्हातारी गोठ्यात झाडून काढीत होती. गडी माणूस कोणीच दिसत नव्हतं. मी म्हणलं, 'आजे, आम्ही भगतवाडीचं पाव्हनं हाय. यवतावनं आलोय, अंधार पडलाय्; तवा रातच्याला वसतीला न्हातू. सकाळी उठूनशान् जाऊ.'

ते ऐकून म्हातारी उसळलीच.

ती म्हणाली, 'कुठलं पाव्हनं ? आन् कुणाचं ? हितं कोणी न्हायाचं न्हाई. मुडदं पाव्हनं म्हणून येत्यात् आन् रातचं सगळं गोळा करून नेत्यात. चालतं व्हा. न्हाईतर आता गावात जाऊन पाटलालाच सांगते.' इच्या आयला ही तर बिलामतच झाली. पांडू तात्या तर टरकलाच. मी मग सगळ्यांना म्हणालो,

'हे पाहा गड्यांनू, ही म्हातारी अशी दाद द्यायची न्हाय.' मी हळूच सगळा बेत त्यांना सांगितला. म्हातारी घरात गेली होती, गोठ्यात तिची दुभती म्हस उभी होती. मारत्या परटानं सांगितल्या-परमाणं माळावरला सराटा आणला. आन् पटकन् जाऊन म्हशीच्या कासंला टोचला. आम्ही वस्तीजवळ थांबलो होतो. एवड्यात म्हातारी कासांडी घेऊन धार काढायला आली. पण म्हस दूध कशी देणार ? ती लागली ठणा-ठणा उड्या मारायला, आन् लाथा झाडायला.

एवड्यात पांडू तात्या पुढं झाला आन् म्हणाला, 'आजे, आगं भगतवाडीच्या नाथाचा सेवक हा दत्तू तुझ्या दारात आला. आन् त्याचा तू अपमान केलास. आमचं नाथाचं दैवत फार कडक हाय. तुला ह्यो अनुभव दिलाच त्यानं. म्हस धार दीना झाली ती उगाच व्हय ? शानी असशील तर आता आमी सांगतो तसं कर. न्हायतर आमचा रस्ता आम्हांला मोकळा हाय.'

म्हातारी म्हशीनं मांडलेला थयथयाट बघून भेदरली होती. तशातच भगतवाडीच्या नाथाबद्दल तिच्या कानांवर व्हतंच. निदान पावणं काय म्हणत्यात ते तरी ऐकावं असा विचार करून ती म्हणाली,

'हे बगा बाबानू, मी म्हातारी बाई माणूस. माझी बुद्धी भरमिष्ट झालिया. काय करावं तेबी कळं ना. आता काय उपाय करावा ते तुम्हीच सांगा.'

तसा पांडू तात्या चटकन् म्हणाला, 'देव वाढवायला पाहिजे. देवाला अंगारा आणि लिंबू दिलं तर म्हस दूध दील. तवा गुलाल अन् एक लिंबू घेऊन ये. ती पल्याड धनगराची वस्ती हाय न्हवं ? तितनं ढोल मिळाला तर आन. येळ घालवू नगंस.'

म्हातारीनं धनगराच्या वस्तीकडं बघून हाळी घातली. बिऱ्या धनगराला ढोल घेऊन बोलावलं... तोही म्हातारीची हाळी ऐकून लगेच आला. मारत्या परटानं लगोलग ढोल गळ्यात बांधला.

ढम्पाक... ढवाडांग... ढम्पाक ढवाडांग.

ढोल घुमायला लागला, तसा मी अंगात देव संचारल्याचं नाटक करून उड्या मारायला लागलो. म्हातारीच्या हातावर लिंबू, गुलाल ठेवला. हा गोंधळ चालू असतानाच मन्या न्हावी कुणाचं लक्ष नाही असं बघून हळूच गोठ्यात गेला. आन् त्यानं म्हशीच्या कासंतला सराटा काढला, परत त्यानं मला खूण केली. मारत्या परटानं ढोल उतारला आन् माज्या अंगातलं वारं गेलं.

म्हातारी लगेच गोठ्यात गेली. तिनं म्हशीला गुलाल लावला. गोठ्यात फुंकला. लिंबू उतरून मेढीला बांधलं आणि कासांडी घेऊन ती धारंला बसली. आता म्हस सुतासारखी सरळ झाली होती. तिनं भसा-भसा चरवी-भर दूध दिलं. म्हातारीचा एकदम इस्वास बसला. ती माझ्या पाया पडली. आणि चुकलं म्हणून तिनदा थोबाडात मारून घेतलं. मोठ्या प्रेमानं तिनं आम्हांला ठिऊन घेतलं. आमची सगळी उस्तापास्त केली.

शेजारच्या वस्तीवर हा प्रकार लगेच कळला. दुसऱ्या दिवशी सकाळी निघायच्या येळंला वस्तीवरची बाया-माणसं आणि दोन-चार गडी माणसं जमली. सगळ्यांनी देव वाढवा म्हणून पुन्हा गळ घातली. आमचा नाइलाज झाला. पुन्हा रात्रीचं नाटक. मारत्यानं ढोल चढवला. आन् माझ्या अंगात वारं आलं. एकाएकाचं एक-एक कोंड झालं. त्यातच कालची ती बाई होती.

तिच्या लग्नाला १० वरसं झाली तरी पोर व्हत नव्हतं. तवा मी तिला लिंबू आणि गुलाल दिला होता आन् ती नवस बोलली होती, 'देवा मला मूल झालं तर चांदीचा पाळणा आन् ५१ रुपये वाहीन. तुझ्या दरबारात येऊन पोराला पायावर घालून नवस फेडीन.'

आणि आवं कशाचं काय ? 'आम्ही केलं नाटक आन् ते खरंच ठरलं. पण बघा मी असा इद्रा माणूस. रोज सांच्याला ढोसणारा. गावात माझी पत काय ? आन् भर देवळात ही बाई मला देवऋषी म्हणते. माझी मलाच लाज वाटली. म्हणून मी निघून आलो.

++

## मिळवत्या स्त्रियांच्या समस्या

कु. सुधा दि. क्षीरसागर
एफ्. वाय्. बी. ए.

समाजामध्ये स्त्रियांच्या समस्या अनेक असतात, परंतु मिळवत्या स्त्रियांच्या काही वेगळ्याच समस्या असतात. मिळवत्या स्त्रियांपुढे सामाजिक, आर्थिक व ऑफिसमधील अशा अनेक प्रकारच्या समस्या असतात.

मिळवत्या स्त्रियांचे जीवन काहीशा वेगळ्याच पद्धतीचे असते. सामाजिकदृष्ट्या त्यांना समाजामध्ये मान दिला जात नाही. मुख्यतः आपल्या भारतीय पद्धतीनुसार स्त्रियांनाच मुळी समाजात फारसं स्थान

नाही. त्या मिळवत्या स्त्रियांकडे समाज तुच्छ दृष्टीने पाहातो. त्यांच्यावर टीका करतो. काही उदाहरणे वगळता म्हणजे शेकडा ५% लोक आपल्या घरातील मिळवत्या स्त्रीवर अवलंबून असतात.

या मिळवत्या स्त्रियांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. सर्वांत पहिली समस्या म्हणजे कौटुंबिक. स्त्रीने नोकरी करावयाची म्हटलं तर कुटुंबातील सर्व लोकांची/व्यक्तींची मर्जी सांभाळावी लागते. घरातील सर्व काम आटोपून आपल्या नोकरीला जावे लागते. स्त्री म्हटलं की तिच्या पाठीमागे कितीतरी कामे असतात आणि तेवढी सगळी कामे तिला आटपावी लागतात. घरातील मुलांचे आवरून, त्यांचे डबे तयार करून त्यांना शाळेत पाठवावे लागते. शिवाय एवढे सगळे करून परत ऑफिसला वेळेवरच जावे लागते. घरातील व्यक्ती उदाहरणार्थ सासू, सासरे, नवरा हे जसे म्हणतील त्याचप्रमाणे वागावे लागते. ते सांगतील तसेच करावे लागते.

या स्त्रियांची दुसरी समस्या म्हणजे ऑफिसमधील मॅनेजरची अथवा अधिकाऱ्याची मर्जी सांभाळणे. घरातील सर्व कामे आटोपून ऑफिसला वेळेवर हजर व्हावे लागते. जर एखाद्या वेळी उशीर झाला तर तेथील मॅनेजर अगर ऑफिसर सहानुभूतीने विचार करत नाहीत तर उलट ते तिच्यावर आपला राग काढतात व तिला वाटेल ते बोलतात. अशा वेळी त्या स्त्रीचे मन किती दुखावलं जात असेल ! अशा वेळी तिला 'नको ती नोकरी आणि नको तो संसार' असे वाटू लागते. शिवाय ऑफिसमधील कागद-पत्र तयार करण्यास थोडासा जरी उशीर झाला तरी ते आपला अधिकार गाजवत असतात. ऑफिसची वेळ संपली तरी, काही काम असेल तर या स्त्रियांना घरी जाता येत नाही. काही वेळा ऑफिसचे अधिकारी चांगले असतात. तर काही वेळा हे अधिकारी अपसामाजिक वर्तन करणारे देखील असतात. या वेळी या स्त्रियांना स्वतःला खूप सांभाळून घ्यावे लागते. घरी कितीही काम असले, काही अडचणी असल्या तरी तिला ते सर्व सोडून ऑफिसला यावे लागते. काही वेळा ऑफिसमधील कामे रेंगाळलेली असतील किंवा पूर्ण झाली नसतील तर त्या स्त्रीला कामावरून कमी करण्याची धमकीदेखील दिली जाते. त्या वेळी त्या स्त्रीला असे वाटते की, 'हे ऑफिस नसून तुरुंगच आहे.'

त्यानंतरची समस्या म्हणजे सामाजिक समस्या. समाजात स्त्री नोकरी करते म्हणून तिला नावे ठेवली जातात. तिला नाही नाही ती बोलणी ऐकावी लागतात. 'नोकरी करणारांची घरे म्हणजे धर्मशाळा होत. फक्त महागड्या साड्या घेणं आणि घरकामातून सुटका मिळवणं यासाठीच या नोकरी करतात. 'या स्त्रियांची मुलं बिघडतात, या मुलांना ना संस्कार ना शिस्त,' 'नोकरी करणाऱ्या स्त्रियांमुळेच तर खरी बेकारी वाढलीय. त्यांना नोकऱ्याच देऊ नयेत' अशी नाना प्रकारची मुक्ताफळं तिला ऐकून घ्यावी लागतात.

याचबरोबर नोकरी करणाऱ्या स्त्रीसमोर अत्यंत महत्त्वाची समस्या म्हणजे आर्थिक समस्या. या आर्थिक समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत असतात. उदाहरणार्थ– समोरच्या कॉलनीतील मीनाचेच पाहा ना. तिला जवळजवळ नऊशे रुपये पगार आहे. परंतु तिला एवढा पगार असला तरी तिचा आपल्या पगारावर काहीएक हक्क नाही. स्वतःसाठी किंवा मुलासाठी एखादी वस्तू खरेदी करीन म्हटले, तर ती खर्च करू शकत नाही. त्यासाठी तिला कुटुंबातील व्यक्तींची परवानगी घ्यावी लागते. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियाही अजून पूर्णार्थाने स्वयंपूर्ण झालेल्या नाहीत. हजार रुपये काय किंवा बाराशे रुपये काय पगार मिळवणाऱ्या स्त्रीलाही दहा रुपये जरी खर्च करायचे म्हटले तरी त्यासाठी पतिराजांची संमती घ्यावी लागते. शिवाय चोवीस तास राबून देखील समाजामधे त्यांची किंमत शून्यच.

नोकरी करणारी स्त्री आणि गृहिणी यांच्यामधे एक कायमचं थंड युद्ध चालू असतं. खरं तर ही दरी असायला नको. परंतु अनेक पूर्वग्रह आणि चुकीच्या समजुती यामुळे हा झगडा चालूच असतो. नोकरी करणाऱ्या स्त्रीबद्दल अगदी प्रत्येकानेच चांगले किंवा वाईट पण काहीतरी मत नोंदवलेच आहे. तिला कळत नकळत समाजामधे कमी लेखले जाते.

नोकरी करण्यासाठी पहिले पाऊल टाकण्यापूर्वीच स्त्रीने विचारपूर्वक आपल्या कार्याच्या योजना आखल्या पाहिजेत. लेनिनच्या तत्त्वाप्रमाणे पुढील मार्ग आक्रमण करण्याकरिता कधी दोन पावलं पुढे, तर कधी एक पाऊल मागे असेच तत्त्व सांभाळले पाहिजे.

कठीण प्रसंग जीवनामधे येतच असतात. परंतु त्यासाठी एक तत्त्व अगदी तंतोतंत पाळले पाहिजे आणि ते म्हणजे माघार घ्यावयाची नाही. किंवा अर्ध्या वाटेवरून परत फिरावयाचे नाही.

शेवटी मिळवती काय किंवा गृहिणी काय. काळाचं व जबाबदारीचं भान ठेवून विचारपूर्वक, डोळसपणे ती भूमिका स्वीकारणं आणि होणाऱ्या परिणामांना निर्भय-पणे सामोरे जाण्याची तयारी ठेवणं हेच महत्त्वाचं.

++

# बलिहारी गुरु

दयानंद मिसाळ
एम्.ए., हिंदी – I

आधुनिक ज्ञान के पथपर जहाँ पग-पग पर आत्मा को ठोकरें खानी पडती हैं, जहाँ वह रास्ता भूल जाती है, वहाँ सहारा देकर निर्दिष्ट मार्ग बतलाना गुरु का काम है। आत्मा मोह-माया के क्षणिक आनंद में दुर्बल हो जाती है तो ज्ञान का तेज डालकर गुरु ही उसे उत्साहित करता है। इसी कारण तो गुरु का महत्त्व ईश्वर के महत्त्व से भी कहीं बढकर है। इस में कुछ भी संदेह नहीं कि– "गुरु पिता है, गुरू माता है, और यहाँ तक कि गुरु ईश्वर भी है। इसी कारण उसकी सेवा मनसा, वाचा, कर्मणा होनी चाहिए।"

गुरु का शब्द 'ज्ञान' होता है। पाप और पुण्य किसे कहते हैं? उन्नति और अवनति का क्या तात्पर्य है? लौकिक-अलौकिक में क्या अंतर है? आत्मा को काशित करने के क्या साधन हैं? आदि तो गुरु ही बता सकते हैं। कबीर कहते हैं–

"पीछे लागा जाइथा, लोकवेद के साथ।
आगे थै सत्गुर मिल्या, दीपक दिया हाथ।"

गुरु से प्रेरणा लेकर ही आत्मा जाग उठती है, परमात्मा के लिए तडपती है, परम-ईश्वर में लीन हो जाती है। गुरु ही ईश्वर के दिव्य-प्रकाश से परिचित करा देता है।

संत कबीर ने गुरू को बहुत ऊँचा स्थान दिया है। वह पथ-प्रदर्शक है, परमेश्वर स्वरूप है– "गुरु गोविंद तो एक है, दूजा यह आकार" इस भव-सागर को पार करने के लिए गुरु रूपी चतुर कर्णधार की आवश्यकता है। सूफी कवि तो गुरु-कृपा के बिना आत्मा-परमात्मा का मिलन असंभव मानते हैं। सांसारिक मोह-माया में ग्रासित जीव गुरु की दया से परमात्मा को प्राप्त कर सकता है। कबीर भी यही कहते हैं–

पाँसा पकड्या प्रेम का, सारी किया सरीर।
सत्गुरु दाँव बताइया, खेलै दास कबीर ॥

गुरु और ईश्वर को एक माना है– 'गुरु गोविंद दोनो खडे, काके लागूँ पाँव' इस स्थिति में 'बलिहारी वा गुरु की, जिन गोविन्द दिया दिखाय' कहकर कबीर गुरु और ईश्वर में गुरु कोही महत्त्व प्रदान किया है।

कवि जायसी ने भी गुरु को महत्त्व प्रदान किया है।

‘गुरु सुआ जेहि पंथ दिखावा।
विन गुरु जगत को निर्गुण पावा ॥’

संत तुलसीदास ने भी गुरु की वंदना की है– ‘बंदौं गुरुपद, कृपासिंधु नररूप हरि’ कवियों के सूरज और महाकवी सूरदास ने भी अपने गुरु को अत्यन्त श्रद्धा और भक्ति के साथ स्मरण किया है।

‘वल्लभ नख चंद्र-छटा विनु।
सब जग माँहि अँधेरो ॥’

इसी प्रकार संत तुकाराम भी– ‘सद्‌गुरु राये कृपा मज केली’ कहकर गुरु की महत्ता सिद्ध करते हैं।

जलालुद्दीन रूमी (रहस्यवादी) ने अपनी मसन वी के भाग एक में पीर (गुरु) की प्रशंसा की है– ‘विना साथी (गुरु) के तुम सड़क पर भी उद्‌भ्रान्त हो जाओगे। जिस पर तुम अनेक बार चल चुके हो।’ ‘पीर (गुरु) चुनो क्यों कि बिना पीर के यह यात्रा (जीवन / संसार) वहुत ही कष्टमय, भयानक और विपत्तिमय है।’ गुरु का सदैव साथ होना चाहिये, नहीं तो आत्मा न जाने रास्ता भूलकर कहाँ चली जाय।

गुरु अंधा भी हो लेकिन शिष्य निरंध होता है। उसे आचार-विचार दिव्य-ज्ञान की दृष्टि आती है। अगर शिष्य ही जान-बूझकर गुरु को टालता रहे तो गुरु बेचारा क्या करे? उसे समझाना तो ‘बंसी बजाई फूक’ ऐसी बात होगी।’ नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे।’ गुरु के बिना तो जो भी सीख मिलेगी, अधूरी मिलेगी। उनके बिना तो घर-घर जाकर भी ज्ञान की भीख नहीं मिलेगी। खान में होता है तब तक हीरा भी कोयल होता है। और जब वह किसी जौहरी के पास जाकर पहलूदार बनता है तब उसका मूल्य लाखों का हो जाता है। सो गुरु वह जौहरी है जो शिष्य रूपी कंकर / कोयले को हीरा बनाता है। चाहे हीरे का मूल्य बढे, लेकिन उसे ‘बनाने’ और ‘पहचानने’वाला उससे भी मूल्यवान होता है।

आज भी गुरु का वही स्थान है जो व्यास, वसिष्ठ, द्रोणाचार्य का था। द्रोणाचार्य ने ही अर्जुन जैसा अजेय धनुर्धारी बनाया। उसी प्रकार प्राइमरी स्कूलों से लेकर विश्व-विद्यालयों तक के पढानेवाले गुरु ही हैं। ये ही छोटे-बडे ऋषि-मुनि हैं। इन्हीं से बनाया हुआ कोई अर्जुन आइ. ए. एस्. अधिकारी बनता है, तो किसी रामदास का शिवाजी, एअर मार्शल, लोकपाल बनता है।

क्या ऐसी स्थिति में गुरुजनों को कम महत्त्व हैं? आज भी ये गुरु हमारे ईश्वर हैं। हाँ कुछ महाभाग ऐसे भी है, जो उन्हें ‘गुरु’ की जगह ‘शिक्षक’ मानते हैं। जब कि ‘गुरु’ में आदरनीय, पूजनीय भाव है, तो ‘शिक्षक’ में तनख्वाह लेकर पढाने वाला नौकर का इसी भाव के कारण युवा विद्यार्थियों को उनसे भय नहीं लगता है, और वे हो सके उतना सियानापन और हो सके उतना गधापन करनेपर उतारु हो जाते हैं। क्या इससे उचित मान और स्थान प्राप्त होगा? गुरु अपने शिष्य की बुराई सपने में भी नहीं सोच सकता, लेकिन आज शिष्य मन-मानी न हुई, तो गुरु को भी आँखे दिखाता है। क्या यह हीनता नहीं? इस स्थितिमें भी गुरु गुरु की भूमिका अदा करता है। लेकिन जो है कि, ‘नळी फुंकली सोनारे’ जैसा फिर से बुराई की ओर फिसलता जाता है और गुरु तो आखिर गुरु है, वह फिरसे उसे उठाने की कोशिश में लगा रहता है। जो भी हो ‘गुरु बिन चेला ज्ञान न लहै।’

++

विज्ञान, आन्मज्ञान आणि साहित्य या तीन शक्तींनीच जगाची घडण केली आहे. याच तीन शक्ती मनुष्याचे जीवन बदलत असतात. विज्ञानाने स्थूल रूप बदलते, आणि मनावर परिणाम होण्याची परिस्थिती उत्पन्न होते. पण ते मनावर प्रत्यक्ष परिणाम करू शकत नाही. वाणी (साहित्य) विज्ञानाच्या पुढे जाऊन सरळ हृदयावरच प्रहार करते आणि तेथपर्यंत थेट जाऊन भिडते. आत्मज्ञान अंतःकरणात प्रकाश पाडते. विज्ञान हृदयाच्या बाहेर आणि आत्मज्ञान आत असते आणि या दोघांना जोडणारा पूल वाणी (साहित्य) तयार करते. दोन्ही बाजूंचा जोड करते आणि दोन्ही बाजूंवर प्रकाशही टाकते.



# My Maiden European Visit

Taware H. D.
F. Y. B. A.



Author with a French Family

In October 1982, consequent upon my passing my H. S. C. and successful completion of the Dairy and Poultry Farming Course, I was selected to be a member of an Indian Study Group which visited some European countries, under Indo-French Cultural Exchange. The group comprised members of various professions, such as doctors, college teachers, leading farmers and students. The members of the group were distributed among different families in France to enable us to visit various agricultural projects.

I stayed in the Normandy region of France, where there is a concentration of dairy and poultry farming units. I spent a week in this region visiting various farms. Notable feature of these farms was the use of machines and mechanical devices for works in which we in India employ a lot of manual labour. Four hundred cows are looked after by only two persons, even milking being done mechanically. The grazing land for these animals was about 200 acres. The yield of milk per cow is more than 30 litres a day, and what stunned me was that cows whose milk-yield was found to be reducing were declared to be of no use and sent to be slaughtered. The dairy products are cheese, butter, biscuits, powdered milk etc. The poultry farms supplied eggs, and meat. I found vegetables and fruits costing here as much as Rs. 30 per kg.

I visited some schools and colleges here, and found most of them co-educational institutions with girls and boys mixing freely for studies and discussions on academic and national issues. Cleanliness of class-rooms and playgrounds is a natural and familiar thing to be found here. My visits to hospitals, poor-men's houses were also thrilling because of the especial importance given to cleanliness. I visited the world-famous Eiffel Tower, Notre-Dame, Versailles Palace, Napolean Museum, the Parliament House. They have tube railways here, with fastest suburban trains, that one felt no tiresomeness even after travelling 200 kilometres. The Gothic

arches and other historical monuments are well-cared for, unlike in India.

From Paris, the capital city of France, I and some of my friends visited Switzerland and its principal city, Zurich. Mount Plytamus, which is about 12,000 ft. above mean sea level, was ice-covered for most part of the year. From Zurich to London we went, where I met some of my Indian friends who had been my class-mates in India, and visited the Palace, the House of Commons and the House of Lords, West Minster Abbey, the Planetorium, Madam Tussad's Museum, the Trafalgar Square and was lucky to attend the Indian festival. On my way back to France, I visited Frankfurt in Germany and then Rome in Italy, where I visited the Vatican City, the Luna Park and then Florence the beautiful city poets have rendered famous.

My impression of the west is a highly optimistic one. I found the westerners passionately preserving their culture, their tradition and found them to be, above all, hard-working, of high probity in their professions. As people there say, "history awaits you on every street corner, for it is not a frozen, forbidding phantom. It is your friend of every day life, it is the door which leads you from ultra-modern buildings to the palaces of the kings. It is the Romanesque Church standing a few steps away from the Roman temple, the horizen where one glance takes in, the spire of the towers of Notre Dame and the pointed peak of the Eiffel Tower." It is also said that, "if houses could speak, in France each has a word to say –they tell one of the oldest histories in the world, the thousand and one nights and the thousand and one days of the heart of the west."

++

## Laser Radiations

Daruwala S. C.
T. Y. B. Sc.

'Laser' is one of the inventions that have attracted much attention now-a-days. The word 'laser' stands for 'Light Amplification by Stimulated Emission of Radiation.' The idea of stimulated emission was introduced first by Albert Einstein, later developed and detailed by two American Scientists A. L. Schawlow and C. H. Townes in December 1958 and finally, demonstrated experimentally by T. H Maiman in July 1960.

**Atomic Structure :** An atom is composed of a small, central position, called 'nucleus' which is positively charged due presence of protons. It is surrounded by negatively chargad electrons, encircling the nucleus in different orbits, each representing an energy state of the atom. Thus, the electrons around the nucleus of atoms are composed of a number of different energy levels.

The electrons, neither absorb nor radiate energy as long as they remain in an energy level. But, when an electron jumps from higher energy level to a lower one, it radiates energy. If energy is absorbed by atoms, one or more electrons may jump from a lower energy level to a higher one. When an atom reduces its energy due to an electron moving to a different permitted orbit, a photon is said to be emitted. Considering two energy states- a lower state El and an upper state E2- at ordinary temperature all the atoms tend to be in the lowest state and the upper levels are unoccupied. However, this situation can be changed if a photon of certain energy falls on the system it is absorbed by the atom and the atom is raised to the upper state E2. In the excited state the atom is unstable and within a short time it will be back in the original state without any external stimulus. This is called, 'spontaneous emission.' But, if another photon falls on the excited atom, the atom gives off a photon in addition to the one which triggered its emission and is thus transferred to the ground state. This is called, 'stimulated emission'.

२० ते २९ नोव्हेंबर ८२ : ओतूर येथे '२' आणि '३६' महाराष्ट्र बटालियन्सच्या 'एस्. डी. बाइज'चा एकत्रित कॅम्प. २४ छात्र सैनिक सहभागी.

**रेंज क्लासिफिकेशन**

१८ जाने. १९८३ : दौंड येथील एस्. आर. पी. रेंजवर सहभाग : १ अधिकारी व ७१ छात्र सैनिक.

**परीक्षा व निकाल**

फेब्रुवारी ८२ मध्ये परीक्षा.
'सी' सर्टिफिकेट ५ पैकी ३ उत्तीर्ण.
'बी' सर्टिफिकेट १३ पैकी ७ उत्तीर्ण.

### राष्ट्रीय सेवा योजना

प्रमुख : **प्रा. व्ही. डी. काकडे**

सहभागी विद्यार्थी ११०, विद्यार्थिनी ४०

उद्घाटन : १ ऑगस्ट १९८२ रोजी प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे यांच्या हस्ते.

दत्तक ग्रामे व झोपडपट्ट्या
(१) बऱ्हाणपूर (२) रुई-वंजारवाडी
(३) सिद्धार्थनगर (४) प्रतिभानगर (५) म. फुलेनगर

**शिबिरे**

१. उन्हाळी शिबिर
स्थान : रुई-वंजारवाडी
कालावधी : २१ जून ते ३० जून ८२
कार्य : एक कि. मी. लांब रस्ता-दुरुस्ती, ग्रामसफाई, गटारे खोदणे, शाळेचे मैदान तयार करणे, मंदिराचे आवार स्वच्छ करणे, तरुणांसाठी क्रिकेटचे मैदान तयार करणे, विहिरीची दुरुस्ती व स्वच्छता, सांडपाण्याची व्यवस्था, रस्त्याच्या कडेला व घरापुढे झाडांसाठी खड्डे तयार करणे, वृक्षारोपण, शाळेतील विद्यार्थ्यांची डॉ. खन्ना यांच्या सहकार्याने वैद्यकीय तपासणी, ग्रामस्थांसाठी व्याख्याने, वंजारवाडीचे आर्थिक, कौटुंबिक व सामाजिक दृष्टींनी सर्वेक्षण.

२. हिवाळी शिबिर
स्थान : बऱ्हाणपूर
कालावधी : १ डिसेंबर ते १० डिसेंबर १९८२
उद्घाटक : श्री. कोहिनकर, बी. डी. ओ. पंचायत समिती
अध्यक्ष : प्रा. डॉ. डी. टी. पाटील
सहभाग : ५० विद्यार्थी, ५ प्राध्यापक, पोलीस पाटील, सरपंच, प्रा. शाळेतील शिक्षक, स्थानिक तरुण, गावकरी.
कार्य : बऱ्हाणपूर-बारामती-सुपे एक कि. मी. रस्ता-दुरुस्ती, शाळा ते नदी २०० मीटर रस्ता-निर्मिती, वृक्षारोपणार्थ ६० खड्डे व वृक्षारोपण, शाळेतील २४० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, गावाचे शैक्षणिक, सामाजिक सर्वेक्षण, सामाजिक, आर्थिक समस्यांबाबत जनजागृती, स्त्रियांचा मेळावा, हळदी-कुंकू, शालेय विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा व रांगोळी प्रदर्शन, तज्ज्ञांची व्याख्याने.

सहकार्य : डॉ. कारंडे पाटील, डॉ. जे. जे. शहा, डॉ. दोशी, डॉ. राजेंद्र मुथा

भेटी : श्री. सतीश खोमणे, माजी सभापती, श्री. रसाळ, उपसभापती, श्री. तानाजीराव कोहिनकर, गटविकास अधिकारी.

३. एक दिवसीय शिबिर
स्थान : बऱ्हाणपूर
कालावधी १० ऑक्टोबर ८२ व ६ मार्च ८३
सहभाग : १४५ विद्यार्थी–विद्यार्थिनी
कार्य : शाळेच्या बांधकामास मदत, मंदिराच्या परिसराची स्वच्छता, वृक्षांची निगा, गाजर गवत निर्मूलन.

४. जिल्हा समन्वय शिबिर : २२–१–८३. निमसाखर (ता. इंदापूर) येथे जिल्हा समन्वय शिबिरात सर्वश्री शहा, श्री. चौधर, श्री. वणवे, श्री. कुलकर्णी यांचा सहभाग. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे 'गुण्या गोविंदाने' ही एकांकिका सादर करण्यात आली.

**इतर कार्य**

(१) प्रतिभानगर, म. फुले नगर, न. पा. रुग्णालय, येथे स्वच्छता / आंबेडकर वसतिगृहात वृक्षारोपण / बालसुधारगृहात रक्षाबंधन, क्रीडा स्पर्धा, तीळगूळ समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम / महाविद्यालयाच्या आवारातील गाजर गवत निर्मूलन व वृक्षारोपण / मराठी मुलींची शाळा, माळेगाव येथे वृक्षारोपण

(२) 'युनिसेफ' अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई, यांच्या वतीने बारामतीतील बालकांचे सर्वेक्षण.

**विशेष**

(१) पैठण येथे गेलेल्या 'वृक्षगंगा दिंडी'मध्ये

सर्वश्री बनकर, काकडे, पवार, वणवे यांचा सहभाग व सायकलवरून प्रवास.

(२) २५-१-८३ रोजी बारामतीस आलेल्या भाव जागरण दिंडीत १०० विद्यार्थ्यांचा सहभाग व वृक्षारोपण, विद्यार्थ्यांचा मेळावा, श्री. ना. ग. गोरे व श्री. यदुनाथ थत्ते यांचे मार्गदर्शन.

**विद्यार्थी नेतृत्व :** सर्वश्री एस्. एस्. बनकर, ए. जे. काकडे, पी. डी. शेळके, टी. ई. पवार, कु. आर. डी. भोसले, कु. व्ही. ए. क्षीरसागर

## राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना

**प्रमुख : प्रा. एस्. पी. कदम**

**मर्यवेक्षक :** श्री. सुनील महामुनी

शिक्षण केंद्रे व संघटक :

बारामती शहर :

(१) कसवा– श्री. आर. एस्. पाटसकर
(२) सिद्धार्थनगर– कु. एल्. एच्. नालंदे
(३) वसंतनगर– श्री. एच्. ए. लोहकरे
(४) टकार कॉलनी– श्री. के. आर. तुपे
(५) जवाहरनगर– श्री. एम्. डी. मुलाणी
(६) म. फुलेनगर– श्री. पी. ए. बंडगर
(७) खंडोबानगर– श्री. व्ही. व्ही. बोकील

बारामती परिसर :

(१) अंथुर्णे – श्री. एस्. एल्. भरणे
(२) अशोकनगर (भवानीनगर) श्री. एन्. बी. थोरात

लाभप्राप्त प्रौढांची संख्या ३००
स्त्रिया १६०
पुरुष १४०
अनुसूचित जातीतील प्रौढ १७४

सांस्कृतिक कार्यक्रम :

१-१२-८२, २५-१२-८२, ७-१-८३ रोजी कसबा, जवाहरनगर, खंडोबानगर येथे

इतर कार्यक्रम :

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन, महात्मा गांधी जयंती; सावित्रीबाई फुले जयंती.

सहकार्य :

श्रीमती लता चौधरी, प्रकल्पाधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे, श्री. विलास वाघ, समन्वय अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे.

## कमवा व शिका योजना

**प्रमुख : प्रा. डॉ. डी. के. मगदूम**

लाभ घेणारे विद्यार्थी : २०. मुलाखतीनंतर प्रवेश.

योजनांतर्गत कामे : बागकाम, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, ग्रंथालयीन, कार्यालयीन कार्य, प्रयोगशाळेतील व क्रीडांगणावरील कामे.

## व्यवसाय मार्गदर्शन समिती

**प्रमुख : प्रा. ए. एस्. पंढरी**

उद्देश : नोकरी व व्यवसायविषयक संधींची विद्यार्थ्यांना कल्पना देणे व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

कार्य :

व्यवसाय मार्गदर्शन पुस्तिकांचे व जाहिरातींचे सूचनाफलकावर प्रदर्शन.

अगरबत्ती, मेणबत्ती, दंतमंजनसारख्या लघु-कुटिरोद्योगाची प्रात्यक्षिकासह माहिती.

७-८ फेब्रुवारी ८३ रोजी स्वयंरोजगार शिबिराचे आयोजन (विज्ञान कार्यशाळेच्या सहकार्याने).

१२ वीतील निवडक विद्यार्थ्यांचे अभिक्षमता मापन व मार्गदर्शन (मानसशास्त्र विभागाच्या सहकार्याने).

बारामती परिसरातील शाळांमध्ये समितीतील प्राध्यापकांची '१० वीनंतरचे अभ्यासक्रम' व 'नोकऱ्या' या विषयीची मार्गदर्शनपर भाषणे.

## निरंतर शिक्षण केंद्र

**प्रमुख : प्रा. बी. एस्. माने**

१. झोपडपट्टीतील महिलांसाठी शिवणकला वर्ग

**कालावधी :** ३ महिने : २५ डिसें ८२ ते २५ मार्च ८३

**सहभाग : २५ महिला**

**मार्गदर्शन : सौ. थोपटे**



२. छायाचित्रकला वर्ग

**प्रमुख : प्रा. आर्. डब्ल्यू. जोशी**

कालावधी : २ महिने : १५ जाने. ८३ ते १५ मार्च ८३

सहभाग : २० विद्यार्थी : बारामती, भवानीनगर, डोरलेवाडी येथील हायस्कूलमधील शिक्षक, विद्यार्थी; गावातील जिज्ञासू नागरिक

मार्गदर्शन : श्री. अशोक स्वामी (माणिक फोटो स्टुडिओ) श्री. शंकर शिंदे (शिंदे फोटो स्टुडिओ)

३. योगाभ्यास वर्ग

कालावधी : १५ दिवस : १६ ते २६ फेब्रुवारी ८३
सहभाग : स्त्रिया ३५, पुरुष २०
मार्गदर्शन : श्री. द. ए. देशपांडे

४. नियोजित प्रकल्प

जनरल मेकॅनिक (टर्निंग-वेल्डिंग) व अकौंट्स अँड टॅक्सेशन

## सामान्य ज्ञान केंद्र

**प्रमुख : डॉ. सु. रा. काकडे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे होणाऱ्या परीक्षांसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर वर्ग सुरू करण्यात आले.

## महाविद्यालय परिसर विकास समिती

**प्रमुख : प्रा. डॉ. डी. के. मगदूम**

उद्देश : (१) महाविद्यालयाचे वातावरण स्वच्छ, प्रसन्न व निसर्गरम्य बनविणे
(२) वनसंपत्तीचे वर्धन करून शासनाच्या 'वृक्ष वाढवा' योजनेस सहकार्य करणे
(३) महाविद्यालयास उत्पन्न मिळवून देणे

कार्य : (१) महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून मुख्य इमारतीपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा सुरूच्या १०५ रोपांची लागवड
(२) परिसरात फळझाडांची लागवड : नारळ ९०, सीताफळ ६०, डाळिंब ४० व आंबा १० रोपांची लागवड / नारळांची एकूण झाडे २७०

(३) एक नवा उपक्रम :

११ वी व प्रथम वर्षातील निवडक व इच्छुक विद्यार्थ्यांस घरी जोपासण्यासाठी प्रत्येकी एक रोप, वर्षअखेरीस वृद्धिगत रोप आणून देणाऱ्या विद्यार्थ्यास वार्षिक परीक्षेत ५ गुण अधिक. ५० विद्यार्थ्यांचा प्रतिसाद.

(४) महत्त्वाकांक्षी प्रकल्प :

'सुबाभूळ वृक्षारोपण' कार्यक्रमांतर्गत ५१,००० रोपे लावण्याचा संकल्प / पैकी ३१,००० रोपांचे रोपण पूर्ण.

सहकार्य : जिल्हाधिकारी श्री. नंद लाल

उपजिल्हाधिकारी मिस् टी. मॅथ्यू. वनविभागाच्या पिंपळी व डाळज रोपवाटिकांतून रोपे विनामूल्य प्राप्त.

(५) शोभाकर व उपयुक्त अशा इतर ३५० झाडांचे रोपण.

(६) महाविद्यालयाच्या मैदानावर ६०x४० च्या खुल्या रंगमंचाचे बांधकाम.

(७) महाविद्यालयाच्या इमारतींवर पारदबाष्प (मर्क्युरी व्हेपर) दिवे.

नियोजित प्रकल्प :

मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ त्रिकोणाकृती बेट. त्यामध्ये बाग व मध्यभागी कारंजे, या वर्षअखेरीस पूर्ण होईल ही अपेक्षा आहे.

## मुद्रण कला केंद्र

**प्रमुख : प्रा. व्ही. ए. वकील**

आर्थिकदृष्ट्या मागास स्त्रिया व अपंग यांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने 'प्रिंटिंग प्रेस' व 'बाइंडिंग यूनिट'चा प्रकल्प सुरू होत आहे.

सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्ड, दिल्ली यांच्याकडून रु. १,१६,७००।– चे अनुदान.

आवश्यक ती सर्व यंत्रसामग्री आली आहे.

या वर्षअखेर प्रेस सुरू होत आहे.

## विज्ञान कार्यशाळा

**प्रमुख : प्रा. बी. बी. पाटील**

उद्देश : तांत्रिक शिक्षणाच्या माध्यमातून युवकांना

स्वावलंबी बनविणे, स्वतंत्र उद्योग सुरू करण्यास प्रवृत्त करणे हा मुख्य उद्देश. तथापि भोवतालचे साखर कारखाने, खाजगी कारखाने यांतून हा कोर्स पूर्ण करणारास नोकरीही लवकर मिळू शकते.

शिकविले जाणारे अभ्यासक्रम : जनरल मेकॅनिक कोर्स, टर्निंग, फिटिंग, वेल्डिंग व प्रामुख्याने फॅब्रिकेशन.

अभ्यासक्रमाचा कालावधी : ६ महिने

विद्यार्थी संख्या : पहिली सहामाही ३४ / दुसरी सहामाही १८

दिनांक ७ व ८ फेब्रुवारी ८३ रोजी स्वयंरोजगार प्रेरणा शिबिर (व्यवसाय मार्गदर्शन समितीच्या सहकार्याने)

सहभागी विद्वान :

(१) श्री. ए. एन्. सोमण, चीफ मॅनेजर, वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. (२) श्री. एंम्. बी. इंडी, सब्-डिव्हिजनल एम्प्लॉयमेंट ऑफिसर, पुणे (३) श्री. सावंत, जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, पुणे, (४) श्री. बी. के. कुलकर्णी, मॅनेजर, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे (५) डॉ. ए. व्ही. घोले, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (६) श्री. तांबडे, असि. रीज. मॅनेजर, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, पुणे (७) श्री. ए. आर्. जोशी महाराष्ट्र बँक, ग्रामीण विभाग, पुणे (८) श्री. अप्पासाहेब पवार, चेअरमन, बारामती इंजिनिअरिंग.

विषय : लघुउद्योग कोणकोणते ? लघुउद्योग कसा सुरू करावा ? शासनाकडून कोणकोणत्या सोयी-सवलती उपलब्ध होऊ शकतात ? कच्चा माल पुरवठा कोठून कसा प्राप्त करावा ? विक्रीव्यवस्था इत्यादी-संबंधी अधिकारी व्यक्तींकडून मार्गदर्शन.

उपस्थिती : जवळजवळ १०० विद्यार्थी व जिज्ञासू नागरिक यांनी लाभ घेतला.

## प्राध्यापकांचे कार्यकर्तृत्व

### प्रा. डॉ. दयाराम पाटील

- दि. ७ ते १२ जून १९८२ रोजी नाशिक येथे झालेल्या 'मराठी भाषाविज्ञान' शिबिरास उपस्थित. चर्चेत सहभाग.
- दि. ११ व १२ सप्टेंबर ८२ रोजी आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात 'साहित्यातील बांधीलकी' या विषयावर निबंध-वाचन.
- दि. २५ सप्टेंबर ८२ शेटफळ गढे येथील नागेश्वर विद्यालयात 'कर्मवीर भाऊराव पाटील जयंती' निमित्त व्याख्यान.
- दि. २८ सप्टेंबर ८२ भिगवण येथील भैरवनाथ विद्यालयात 'कर्मवीर भाऊराव पाटील जयंती' निमित्त व्याख्यान.
- दि. ४, ५ व ६ फेब्रुवारी ८३. अंबेजोगाई येथे झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनास उपस्थित.
- दि. २० व २१ फेब्रुवारी ८३. जुन्नर येथील शिवछत्रपती महाविद्यालयाच्या वतीने आयोजित पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण केंद्रात 'साने गुरुजी-जीवन, साहित्य व कार्य' या विषयावर व्याख्यान.
- दि. ३ मार्च ८३ न्यू. इंग्लिश स्कूल, लोणी भापकर, दहावी विद्यार्थी निरोप समारंभ व पारितोषिक वितरण समारंभ : प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित.

### प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे

- दि. ७, १२ जून ८२ नाशिक येथे झालेल्या 'मराठी भाषाविज्ञान' शिबिरास उपस्थित, चर्चेत सहभाग
- दि. ११, १२ सप्टें. ८२ रोजी आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात 'साहित्य में प्रतिबद्धता एवं प्रागतिकता' या विषयावर निबंध-वाचन.
- नव महाराष्ट्र, पणदरे येथे 'हिन्दी दिवस' कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित.

### प्रा. ए. एस्. किणिगे

- पदव्युत्तर वर्गासाठी 'इतिहास' विषय सुरू करण्याची मागणी करणाऱ्या एकूण तेरा महाविद्यालयांची तपासणी करण्यासाठी स्थानिक चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून ११ ऑक्टो. ते १६ ऑक्टो. ८२ या कालावधीत काम केले.



नाशिक, सटाणा, मालेगाव, धुळे, सिदखेडा, शिरपूर, पाचोरा, कोपरगाव, अहमदनगर, शिरूर इत्यादी ठिकाणच्या महाविद्यालयांना भेटी दिल्या.

### प्रा. व्ही. ए. संगई

- दि. ४ व ५ सप्टें. ८२ रोजी आपल्या महाविद्यालयात संपन्न झालेल्या इतिहास विषयाच्या चर्चासत्रात सहभाग व 'पेशवाईतील उद्योगधंदे' या विषयावर निबंध-लेखन.
- जून ८२ मध्ये झालेल्या रुई येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात 'दारूबंदी' वर भाषण.
- डिसें. ८२ मध्ये झालेल्या बऱ्हाणपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात भाषण. विषय- अंधश्रद्धा निर्मूलन.
- दिनांक २८-११-८२ रोजी कविवर्य मोरोपंत सभागृहात 'साया' या हिन्दी काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित. काव्यसंग्रहावर परीक्षणात्मक भाषण.
- प्रकाशित कथा- 'आयव्हरी टॉवर' शरविला मार्च ८२

### प्रा. बी. पी. जोहरापूरकर

प्रकाशित लेख-

१) भूराज्यशास्त्र- भारतीय समाजविज्ञान कोश
२) मिसिसिपी- स्वराज्य, २९ जानेवारी ८३
३) भाषेतील भूगोल- वाङ्मयशोभा, मार्च ८३

### प्रा. डॉ. एम्. बी. चौधरी

1) A paper on 'Retention Studies in Halates', has been accepted for the Symposium, organised by the Board of Research in Nuclear Sciences, Department of Atomic Energy, Govt. of India, held at Chemistry Department, University of Poona, Dec. 82.

२) विद्यापीठ अनुदान मंडळ, दिल्ली, यांच्याकडून शास्त्रीय विषयातील संशोधनासाठी रु. ७०००/- चे अनुदान मंजूर झाले आहे.

### प्रा. डॉ. सु. रा. काकडे

- चर्चा-सत्र विभाग

अ) दिनांक २७, २८ ऑगस्ट ८२ : आपल्या महाविद्यालयात झालेल्या 'भारतातील धर्मनिरपेक्षता' या चर्चासत्रात निबंध वाचन. विषय : 'खलिस्तान'

ब) दिनांक ७, ८ नोव्हेंबर ८२ : स. भु. महाविद्यालय औरंगाबाद. चर्चासत्र विषय : महाराष्ट्रातील आधुनिकीकरण. निबंध-वाचन, विषय : मराठवाड्यातील दलित जातीचे आधुनिकीकरण.

क) दिनांक २९, ३० नोव्हेंबर ८२ : ४थी महाराष्ट्र राज्य परिषद, संगमनेर. निबंध : 'विषमता व सामाजिक बदल'

२) व्याख्याने :

दिनांक ६ डिसेंबर ८२ : विषय : डॉ. आंबेडकर

स्थळ : सिद्धार्थनगर, बारामती

### प्रा. डॉ. व्ही. व्ही. आचार्य

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाने आयोजित केलेल्या Irrigated Farming in India या अखिल भारतीय पातळीवरील चर्चासत्रात निबंध-वाचन विषय : Flow vis-a-vis Lift Irrigation.

### प्रा. ए. एस्. पंढरी

१) प्रकाशित लेख

अ) अन्न टिकविण्यासाठी गामा किरणे : उद्यम जुलै ८२

ब) महानगरांच्या समस्या : किशोर, ऑक्टोबर ८२

२) शाळा महाविद्यालय समूह योजनांतर्गत राधेश्याम आगरवाल टेक्निकल हायस्कूल, बारामती, येथे माध्यमिक शिक्षकांसाठी 'बारावीनंतरचे टेक्निकल कोर्सेस व नोकऱ्या' या विषयावर भाषण.

३) निरा येथे ८ वी गणित शिक्षकांसाठी झालेल्या चर्चासत्रात मार्गदर्शन.

## उल्लेखनीय यश

- श्री. शेख अफझल सुलेमान, एस्. वाय्. बी. कॉम् दि महाराष्ट्र स्टेट कॉमर्स एज्यु. इन्स्टिटयूट असोसिएशन, मुंबई, यांच्या वतीने एप्रिल ८२ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पातळीवरील टायपिंग इंग्रजी

स्पीड ४५ प्र. श. मि. च्या परीक्षेत १००% गुण मिळवून संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम.
अभिनंदन !

## श्रद्धांजली

● अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेपासून महाविद्यालयाच्या उभारणीत सक्रिय भाग घेतलेले बारामती येथील **श्रेष्ठीवर्य श्री. माणिकचंद नथूराम दोशी, वकील,** यांचे दि. ७-१२-८२ रोजी देहावसान झाले.

● महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणमंत्री म्हणून अगदी अल्पकाळातच शैक्षणिक जगतात आपल्या कुशल कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या **सौ. शरच्चंद्रिका पाटील** यांचे दि. ५-१२-८२ रोजी पाचोरे येथे दुःखद निधन झाले.

● महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ या संस्थांचे भूतपूर्व अध्यक्ष व माजी आमदार व पुणे जिल्ह्याचे मान्यवर नेते **श्री. मामासाहेब तथा ना. सं. मोहोळ** यांचे दि. ६-१२-८२ रोजी दुःखद निधन झाले.

● बारामती परिसरातील एक प्रयोगशील व प्रगतिशील बागाईतदार, अनेक उद्योगसमूहांचे संस्थापक, संचालक व अध्यक्ष असलेले **श्री. माणिकराव जाचक** यांचे दि. २२-२-८३ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले.

या सर्वांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली !

## सूची विभाग

### एप्रिल १९८२ च्या विविध परीक्षांत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे सूची :

**अ) एम्. ए.**

१. श्री. मालेगावकर अशोक दयाराम (राज्यशास्त्र)
(राज्यशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम क्रमांक)
२. श्री. शास्त्री जगन्नाथ रघुनाथ (मराठी)
३. कु. देशपांडे शोभा भार्गव (हिंदी)
४. श्री. जगताप धनसिंग वळवंत (इतिहास)
५. सौ. इसराणी सुरेखा अप्पासाहेब (मराठी)
६. श्री. कोकरे अशोक दत्तात्रय (मराठी)
७. श्री. धापटे गेना तुळशीराम (इतिहास)
८. श्री. भुंजे संजय मनोहर (इतिहास)
९. कु. माळवदकर सुरेखा (हिंदी)
१०. श्री. जाधव दशरथ रामचंद्र (मराठी)
११. कु. गुरव सुरेखा काशिनाथ (राज्यशास्त्र)
१२. श्री. इंगवले सुरेश बळवंतराव (इतिहास)
१३. श्री. नाटेकर सुधाकर दामोदर (मराठी)
१४. श्री. शेंडगे नाना दगडू (मराठी)

**आ) बी. ए. स्पेशल**

१. श्री. चौधर आजिनाथ हरिभाऊ (भूगोल)
२. श्री. अडसूळ रमेश कोंडिबा (मानसशास्त्र)
३. श्री. शिंगाडे भगवान सावळा (भूगोल)
४. कु. जगताप सुनिता वसंतराव (राज्यशास्त्र)
५. श्री. धापटे नेमचंद अण्णा (भूगोल)
६. श्री. पाठक रमेश संभाजी (भूगोल)
७. श्री. यादव अशोक राजाराम (अर्थशास्त्र)
८. श्री. शेलार भगवंत लक्ष्मण (अर्थशास्त्र)
९. श्री. धोत्रे प्रदीपकुमार रामचंद्र (अर्थशास्त्र)
१०. कु. सरोदे रंजना रामदास (मराठी)
११. कु. शहा माधुरी विजयकुमार (इंग्लिश)
१२. श्री. भगत बाळासाहेब अण्णासाहेब (अर्थशास्त्र)
१३. कु. धुमाळ रश्मी पांडुरंगराव (मराठी)
१४. श्री. रूपनवार आजिनाथ नामदेव (राज्यशास्त्र)
१५. कु. कुलकर्णी प्रज्ञा शंकर (हिंदी)
१६. श्री. शेंडगे मल्हारी तुकाराम (भूगोल)
१७. कु. भुंजे श्यामला सिद्धेश्वर (मराठी)
१८. श्री. जाधव भीमराव बयाजी (मानसशास्त्र)
१९. कु. माने मीरा रामराव (अर्थशास्त्र)
२०. श्री. भापकर बबन वाजीराव (अर्थशास्त्र)
२१. श्री. खान जहांगिरनाथ इनायतुल्ला (अर्थशास्त्र)
२२. श्री. गाडेकर पांडुरंग आत्माराम (भूगोल)
२३. कु. धालपे मीना मदन (हिंदी)
२४. श्री. भोसले रावसाहेब माणिकराव (अर्थशास्त्र)
२५. श्री. बगाडे अशोक साहेबराव (अर्थशास्त्र)
२६. श्री. दुर्गे सुभाष आनंदराव (भूगोल)
२७. श्री. ठोंबरे विठ्ठलराव नामदेवराव (अर्थशास्त्र)



२८. कु. रणवरे सुवर्णा गुलाबराव (राज्यशास्त्र)
२९. कु. ढोवळे संजीवनी ज्ञानदेव (हिंदी)
३०. श्री. वणवे मारुती विठ्ठल (भूगोल)
३१. श्री. घोळवे रामचंद्र अर्जुन (भूगोल)
३२. श्री. कुंभार दत्तात्रय साधू (भूगोल)
३३. कु. भापकर जया मोहनराव (राज्यशास्त्र)
३४. कु. धामणसकर अमिता विश्वनाथ (इंग्लिश)
३५. श्री. खोमणे बबन सर्जेराव (राज्यशास्त्र)
३६. कु. गुजर नीलिमा विनोदकुमार (इंग्लिश)
३७. श्री. मिसाळ दयानंद एकनाथ (हिंदी)
३८. श्री. वणवे दिनकर गुलाबराव (अर्थशास्त्र)
३९. कु. धुमाळ सुरेखा कोंडिराम (इंग्लिश)
४०. कु. पुरंदरे प्रतिभा अरविंद (इंग्लिश)
४१. श्री. शिंगाडे लक्ष्मण पांडुरंग (राज्यशास्त्र)
४२. श्री. जाधव अरुण ज्ञानदेव (मानसशास्त्र)

**इ) बी. एस्सी.**

१. कु. निगडे तेजस्विनी त्रिंबकराव (प्राणिशास्त्र)
२. कु. मुथा उज्ज्वला शांतीलाल (वनस्पतीशास्त्र)
३. कु. देशपांडे जयश्री रामचंद्र (वनस्पतीशास्त्र)
४. श्री. ढोरगे सुनील महादेवराव (रसायनशास्त्र)
५. श्री. लावंड संपत पांडुरंग (रसायनशास्त्र)
६. कु. शहा शुभांगी अरविंद (गणितशास्त्र)
७. श्री. बागवान सलीम जुमेखान (रसायनशास्त्र)
८. कु. देसाई गीतांजली जयसिंगराव (प्राणिशास्त्र)
९. श्री. सायकर दादाराम रघुनाथ (वनस्पतीशास्त्र)
१०. श्री. डोईफोडे अजितकुमार महादेव (पदार्थविज्ञान)
११. श्री. मेरगळ भीमराव उमाजी (प्राणिशास्त्र)
१२. श्री. कोकरे मारुती केरबा (पदार्थविज्ञान)
१३. कु. शहा मीलन राजकुमार (प्राणिशास्त्र)
१४. श्री. फरांदे मच्छिंद्र कुंडलिक (रसायनशास्त्र)
१५. श्री. घुले पोपट पांडुरंग (रसायनशास्त्र)
१६. श्री. वरे दत्तात्रय मारुतराव (रसायनशास्त्र)
१७. श्री. गवळी रोहिदास धोंडिबा (संख्याशास्त्र)
१८. कु. रणसिंग शैलजा दौलतराव (संख्याशास्त्र)

एक्स स्टुडन्ट्स

१. कु. शिंदे सुलभा श्रीधर (गणितशास्त्र)
२. श्री. कदम लक्ष्मण महीपती (गणितशास्त्र)
३. श्री. गलांडे जयंत एकनाथ (रसायनशास्त्र)

**ई) बी. कॉम**

१. श्री. हरिसंगम सुहास श्रीराम (अकौन्टन्सी)
२. श्री. गायकवाड अशोक परशुराम (अकौन्टन्सी)
३. श्री. धुमाळ लक्ष्मण हनुमंतराव (अकौन्टन्सी)
४. श्री. देशपांडे गिरीश कमलाकर (अकौन्टन्सी)
५. श्री. जोशी मिलिंदकुमार पद्माकर (अकौन्टन्सी)
६. कु. पेशवे देवयानी पुरुषोत्तम (अकौन्टन्सी)
७. कु. दोशी अंजली चंदुलाल (स्टॅटिस्टिक्स)
८. श्री. गोंजारी काशिनाथ महादेव (अकौन्टन्सी)
९. कु. कारवा कल्पना गिरधारीलाल (अकौन्टन्सी)
१०. श्री. हिरेनवरे सुरेश पी. (अकौन्टन्सी)
११. कु. घोडके रेखा नागनाथ (अकौन्टन्सी)
१२. श्री. दबडे मारुती श्रीरंग (अकौन्टन्सी)
१३. श्री. तावरे बापू रामचंद्र (अकौन्टन्सी)
१४. कु. शहा पद्मश्री लालचंद (अकौन्टन्सी)
१५. श्री. डेंगळे विलास भगवान (स्टॅटिस्टिक्स)
१६. कु. निबंधे आशा कमलाकर (अकौन्टन्सी)
१७. श्री. रणसूर विठ्ठल शेटिबा (अकौन्टन्सी)
१८. श्री. वाळिंबे सुहास श्रीकृष्ण (अकौन्टन्सी)
१९. श्री. शहा वीरेंद्र शरद (अकौन्टन्सी)
२०. श्री. दोशी दिलीप जयंतीलाल (अकौन्टन्सी)

सौंदर्य हे सामग्र्याशिवाय समजत नाही आणि समग्रतेशिवाय आकलन होत नाही. ज्याला सत्य म्हणतात ते एकांगी असत नाही. अंगोपांगांसकट सत्याचे ज्ञान होते त्या वेळेस त्याचे आकलन होते. म्हणून समग्रतेशिवाय सौंदर्य नाही, आणि सत्याचे ज्ञान हेच समग्रज्ञान आहे, हे लक्षात आले म्हणजे सौंदर्याचा सत्याशी काय संबंध आहे ते कळेल.

# PRIZES 1982-83

## SENIOR COLLEGE

| Sr. No. | Name of the Student | Class | | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | **College Prizes** | | | |
| | 1. Miss Vijaya D. Murthy | F. Y. B. Sc. | First | 51/- |
| | 2. Shri Govind P. Ghatage | F. Y. B. A. | First | 51/- |
| | 3. Shri Afzal S. Shaikh | F. Y. B. Com. | First | 51/- |
| | 4. Shri Lamuwel C. Daruwala | S. Y. B. Sc. | First | 51/- |
| | 5. Shri Ajinath L. Satpute | S. Y. B. A. | First | 51/- |
| | 6. Shri Rajendra S. Deshpande | S. Y. B. Com. | First | 51/- |
| | 7. Miss Tejaswini T. Nigade | T. Y. B. Sc. | First | 51/- |
| | 8. Shri Ajinath A. Choudhar | T. Y. B. A. | First | 51/- |
| | 9. Shri Suhas S. Harisangam | T. Y. B. Com. | First | 51/- |
| | 10. Shri Ashok D. Malegaonkar (First in Politics in the University) | M. A. | First | 101/- |
| 2. | **Popatlal Chandanmal Prizes** | | | |
| | 1. Shri Ajinath H. Choudhar | B. A. | First | 100/- |
| | 2. Shri Suhas S. Harisangam | B. Com. | First | 100/- |
| 3. | **Late Dr. S. N. Puranik Memorial Prize** | | | |
| | 1. Miss Sunita V. Jagtap | B. A. (Politics) | First | 101/- |
| 4. | **A. E. Society's Late Dr. S. N. Puranik Prize** | | | |
| | 1. Shri Suhas S. Harisangam | B. Com. | First | 101/- |
| 5. | **Late Suresh Kale Memorial Prizes** | | | |
| | 1. Shri Ajinath H. Choudhar | B. A. | First | 61/- |
| | 2. Shri Ramesh K. Adsul | B. A. | Second | 40/- |
| 6. | **Shri Kamalakant Dhavan Prizes** | | | |
| | 1. Miss Najma G. Mulani | S. Y. B. A. (Hist. Spl.) | First | 25/- |
| | 2. Shri Kiran B. Gujar | S. Y. B. A. (Pol. Spl.) | First | 25/- |
| | 3. Shri Pushpasheel D. Shelke | S. Y. B. A. (Econ. Spl.) | First | 25/- |
| | 4. Miss Shubhangi S. Jogalekar / Shri Suresh K. More } | S. Y. B. A. (Psy. Spl.) | First | 12-50 each. |
| | 5. Shri Lamuwel C. Daruwala | S. Y. B. Sc. | First | 25/- |
| | 6. Shri Rajendra S. Deshpande | S. Y. B. Com. | First | 25/- |
| 7. | **Shri Jawahar Shah (Wagholikar) Prizes** | | | |
| | 1. Miss Harsha T. Shah | F. Y. B. Com. (Banking) | First | 51/- |
| | 2. Shri Rajendra S. Deshpande | S. Y. B. Com. (Banking) | First | 50/- |
| 8. | **Shri K. Y. Jagtap (Magistrate) Prizes** | | | |
| | 1. Shri Ramesh K. Adsul | B. A. (Psy.) | First | 51/- |
| | 2. Miss Ranjana R. Sarode | B. A. (Mar.) | First | 50/- |
| 9. | **Shri Ajit Shah (Vadujkar) Prize** | | | |
| | 1. Shri Suhas S. Harisangam | B. Com. (Accountancy) | First | 50/- |
| 10. | **Sou. Vasanti Bhagwanrao Khartude Prize** | | | |
| | Miss Madhuri V. Shah | B. A. ( Eng. ) | First | 35/- |
| 11. | **Prof. R. H. Chaphekar Prize** | | | |
| | 1. Miss Vijaya D. Murthy | F. Y. B. Sc. | First | 51/- |
| 12. | **Prof. Dr. D. T. Patil Prizes** | | | |
| | 1. Shri Dnyaneshwar M. Bankar | F. Y. B. A. (Mar.) | First | 25/- |
| | 2. Miss Ranjana R. Sarode | B. A (Mar.) | First | 25/- |
| | 2. Shri Jagannath R. Shastri | M. A. (Mar.) | First | 25/- |
| 13. | **Prof. S. P. Kadam Prizes** | | | |
| | 1. Shri Udaysingh R. Salve | B. A. (Hist.) | First | 25/- |
| | 2. Miss Madhuri V. Shah | T. Y. B. A. (Socio-Gen.) | First | 25/- |
| | 3. Shri Kiran B. Gujar | S. Y. B. A. (Socio-Gen.) | First | 25/- |
| 14. | **Prof. V. V. Upadhye Prize** | | | |
| | 1. Miss Madhuri V. Shah | B. A. (Eng.) | First | 51/- |
| 15. | **Prof. V. A. Sangai Prize** | | | |
| | 1. Shri Shamsundar H. Patave | F. Y. B. A. ( D. S. ) | First | 25/- |
| 16. | **Special Prize** | | | |
| | 1. Shri Afzal S. Shaikh (First in State level Typing Examination) | S. Y. B. Com. | | 25/- |



## CHART SHOWING NUMBER OF THE STUDENTS OBTAINING SCHOLARSHIPS AND FREESHIPS DURING 1982-83

| | | |
|---|---|---|
| 1. | National Merit Scholarship | – 2 |
| 2. | Govt. Open Merit Scholarship | – 24 |
| 3. | National Loan Scholarship | – 2 |
| 4. | Phisically Handicapped Scholarship | – 1 |
| 5. | Ganesh Manohar & Shankarrao Ganesh Date Charitable Trust (Pune) Scholarship | – 4 |
| 6. | Shri Sai Baba Sansthan, Shirdi, Scholarship | – 1 |
| 7. | Kankubai Kewalchand Gandhi Trust, Modlimb, Scholarship | – 1 |
| 8. | Freedom Fighter Scholarship | – 2 |
| 9. | B. C. Scholarship | – 142 |
| 10. | College Merit Scholarship | – 71 |

### FREESHIPS

| | | |
|---|---|---|
| 1. | E. B. C. Freeship | – 910 |
| 2. | E. B. C. Freeship (State Govt.) | – 14 |
| 3. | B. C. Freeship | – 7 |
| 4. | Primary Teacher Freeship | – 69 |
| 5. | S. S. C. Ded Freeship | – 2 |
| 6. | College Freeship | – 14 |
| 7. | Tuljaram Chaturchand Freeship | – 2 |

## SCHOLARSHIPS 1982-83

(Senior College)

(1) NATIONAL MERIT SCHOLARSHIP

| | | | |
|---|---|---|---|
| 1. Miss Sunita V. Jagtap | M. A. Politics | Selected for Scholarship | |
| 2. Shri Harisangam Suhas Shriram | M. Com. | | 120/- |

(2) GOVERNMENT OPEN MERIT SCHOLARSHIP

| | | |
|---|---|---|
| 1. Miss Doshi Kalpana Ashokkumar | F. Y. B. A. | 240/- |
| 2. Miss Nawathey Rashmi Sharad | F. Y. B. Sc. | 270/- |
| 3. Miss Mandan Pratibha Prabhakar | F. Y. B. Sc. | 270/- |
| 4. Shri Bhagwat Hanumant Dattatrya | S. Y. B. A. | 360/- |
| 5. Miss Gathe Ujwala Ramchandra | S. Y. B. A. | 360/- |
| 6. Shri Salunke Pandharinath Nivrutti | S. Y. B. A. | 360/- |
| 7. Miss Jagtap Vasanti Nanasaheb | S. Y. B. A. | 360/- |
| 8. Shri Murti Vijay Dattatraya | S. Y. B. Sc. | 360/- |
| 9. Miss Paradkar Shubhangi Shripad | S. Y. B. Sc. | 360/- |
| 10. Shri Acharya Rajesh Vijaykumar | S. Y. B. Sc. | 360/- |
| 11. Shri Sutar Sudhir Sandipan | S. Y. B. Sc. | 360/- |
| 12. Miss Date Sarita Vidyadhar | S. Y. B. Sc. | 360/- |
| 13. Shri Sutar Dasharat Laxman | T. Y. B. A. | 360/- |
| 14. Shri Daruwala Lamuwel Chimanlal | T. Y. B. Sc. | 360/- |
| 15. Shri Modi Prawin Manikalal | T. Y. B. Sc. | 360/- |
| 16. Shri Dhanwani Lakhmichand Jethanand | T. Y. B. Sc. | 360/- |
| 17. Miss Khataokar Madhuri Shridhar | T. Y. B. Com. | 360/- |
| 18. Miss Nimkar Ratnamala Udhao | T. Y. B. Com. | 360/- |
| 19. Miss Taware Vaijayanta Ramchandra | T. Y. B. Com. | 360/- |
| 20. Shri Bhagat Balasaheb Annasaheb | M. A. Econ. | 360/- |
| 21. Shri Yadav Ashok Rajaram | M. A. Econ. | 360/- |
| 22. Shri Deshpande Girish Kamalakar | M. Com. | 360/- |
| 23. Shri Bhapkar Baban Bajirao | M. A. Econ. | 360/- |
| 24. Shri Jagtap Sunil Krishnarao | M. A. I & II | 360/- |

(3) NATIONAL LOAN SCHOLARSHIP

| | | | |
|---|---|---|---|
| 1. Shri Mahamuni Sunil Digambar | M. A. English | | 900/- |
| 2. Shri Pawar Bhagwat Manikrao | M. Com. | | 900/- |

(4) PHYSICALLY HANDICAPPED SCHOLARSHIP

| | | | |
|---|---|---|---|
| 1. Shri Doiphode Ramdas Shankar | M. Com. | for 1981-82 | 984/- |

(5) GANESH MANOHAR & SHANKARRAO GANESH DATE CHARITABLE TRUST, POONA, SCHOLARSHIP

| | | |
|---|---|---|
| 1. Shri Narute Pandurang Baburao | T. Y. B. Com. | 150/- |
| 2. Miss Shah Sangita Bahubali | S. Y. B. Com. | 300/- |
| 3. Shri Math A. N. | F. Y. B. Com. | 150/- |
| 4. Shri Gohad Pramod Krishnaji | T. Y. B. Com. | 150/- |

(6) SHRI SAI BABA SANSTHAN, SHIRDI

| | | |
|---|---|---|
| 1. Miss Kulkarni Vandana Balkrishna | F. Y. B. Com. | 130/- |

(7) KANKUBAI KEWALCHAND GANDHI TRUST, MODLIMB

| | | |
|---|---|---|
| 1. Shri Shah Satish Bharatlal | F. Y. B. Com. | 100/- |

(8) FREEDOM FIGHTER SCHOLARSHIP

| | | |
|---|---|---|
| 1. Shri Shaikh Sharif Gulamalli | T. Y. B. A. | 600/- |
| 2. Tambe Shivaji Ramchandra | M. A. ( History ). | 600/- |



हार्दिक शुभेच्छा !

**कामधेनू सहकारी दूध व्यावसायिक संस्था**

**मर्यादित, नॉन म्यु. एरिया, बारामती**

रजिस्टर नं. पी एन ए / पी आर डी / ए / ९९६ २१-६-१९७९

**संचालक मंडळ–**

| | |
|---|---|
| १) श्री. कमलाकांत तुळशीराम ढवाण (पाटील) | चेअरमन |
| २) श्री. सोपानराव कृष्णाजी बोरावके | व्हा. चेअरमन |
| ३) श्री. शिवाजीराव माणिकराव जामदार | सदस्य |
| ४) श्री. रघुनाथ सखाराम फरांदे | ,, |
| ५) श्री. श्रीछत्रपती शाहू हायस्कूल, बारामती | ,, |
| ६) श्री. चंद्रकांत गुलाबराव जामदार | ,, |
| ७) श्री. अनिल सदाशिव हिंगणे | ,, |
| ८) श्री. माणिक बाजीराव सातव | ,, |
| ९) श्री. मधुकर नामदेव यादव | सेक्रेटरी |
| १०) श्री. मारुती किसनराव जाधव | |

**दूध उत्पादकांना योग्य दर वाटप करणारी व पशुखाद्य योग्य दरात देणारी संस्था.**

हार्दिक शुभेच्छा !

**बारामती इंजिनियरिंग प्रायव्हेट लि., बारामती**

ही इंजिनिअरिंग संस्था अशा प्रकारची जळोचीसारख्या खेड्यात उभी
केलेली पहिलीच संस्था आहे. तरीसुद्धा या कारखान्यातील सर्व यंत्रसामग्री
अद्ययावत असून ती जर्मनी येथून आयात करण्यात आलेली आहे.
या यंत्रांतर्गत विद्युत्‌भट्टी असून, कोणत्याही प्रकारच्या यंत्रांना लागणारे
भाग ओतीव पद्धतीने मोठ्या संख्येने तयार होऊ शकतात.
या कारखान्यामुळे ग्रामीण परिसरातील लायक व होतकरू तरुणांना
नोकरीची व प्रशिक्षणाची मोठी संधी उपलब्ध झालेली आहे.

हार्दिक शुभेच्छा !

**मे. नेमचंद नथूराम दोशी**

**जनरल मर्चंन्ट्स**

पणदरे (जि. पुणे)

A Departmental Store of the Town

फोन नं. ३४ (माळेगाव)

---

हार्दिक शुभेच्छा !

**मे. शांतीलाल हिराचंद आणि कंपनी**

**फॅन्सी कापडाचे व्यापारी**

मु. पो. वडगाव–निंबाळकर, जि. पुणे

फोन नं. २३

---

हार्दिक शुभेच्छा !

**परीक्षेत सुयश !**

**चांगला अभ्यास !**

**चांगले जेवण म्हणजेच**

**प्रमोद पेइंग गेस्ट**

प्रोप्रा. सौ. कमलाबाई कुलकर्णी

**एस्. जी. दाते वाडा, सिद्धेश्वर आळी, बारामती**

माफक दर, घरगुती वातावरण, चविष्ट जेवण, स्वच्छता या सर्व गोष्टी म्हणजेच मेंबर्सचे संपूर्ण समाधान ! अर्थात हेच आमचे भांडवल, हाच आमचा नफा !

---

With Best Compliments From :

**M/s. Vadujkar Bros.– Commission Agent** Phone 314


**M/s. Popatlal Rupchand– Fertilizers** Phone 671

**M/s. Sanjay Agro Service Centre– Pesticide Seed** Phone 264

**M/s. Vikas Ginning Factory– Ginning Factory** Phone 264

**M/s. Kiran Auto Lines– Automobiles** Phone 611

**M/s. Sugar Trading Co.– Sugar** Phone 320



With Best Compliments From :

Phone : 33781

**POONA CHEMICAL LABORATORY**

207, Mangalwar Peth, Poona – 411 011

MANUFACTURERS OF FINE CHEMICALS

With Best Compliments From :

Tel. : 57405

One of the most reputed Book shops in the Country...

**THE INTERNATIONAL BOOK SERVICE**

Deccan Gymkhana,
PUNE – 411 004

Over 52 years of 'Service' to book – lovers, Students & Scholars.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

कनिष्ठ

# अनेकान्त

(१९८२-८३)

अनुक्रम

संपादकीय

लेख : स्त्री मुक्ती : एक फॅड ?– कु. संज्योत देशपांडे

ललित लेख : ● दुपार : माझी सखी– कु. ज्योती मरकळे

कथा : पण...?– सुभाष कोरे

कविता : ● माय सुता– कु. ज्योती मरकळे, पाठलाग– अशोक राजे महाडीक, ओळखीच्या खुणा– डी. व्ही. पडकर, काय करावे ?– एस्. व्ही. शेंडगे, प्रवास– कु. उज्ज्वला बंडगर, आठवण– प्रमोद धुमाळ

कार्यवृतान्त

पान २, ७ विनोबा वाणी

जाहिरातींची सूची

● पारितोषिक पात्रे

# संपादकीय

या वर्षी कनिष्ठ महाविद्यालयाचे नियतकालिक स्वतंत्र विभागात प्रसिद्ध होत आहे, आणि स्वतंत्रपणे पाहताना हा विभाग फार छोटा वा अपुरा वाटेल. वास्तविक पाहता बहुतेक सर्व कार्यक्रम, घटना, उपक्रम वरिष्ठ व कनिष्ठ दोन्ही महाविद्यालयांच्या संदर्भात समानच आहेत. केवळ कनिष्ठ महाविद्यालयापुरतेच जे मर्यादित होते त्यांचाच कार्यवृत्तान्तामध्ये उल्लेख केला आहे, त्यामुळे तो त्रोटक वाटेल.

या वर्षी शासनाने कनिष्ठ महाविद्यालयांची वार्षिक तपासणी करण्याचे नवे धोरण जाहीर केले. त्यानुसार महाराष्ट्र राज्याचे शिक्षण उपसंचालक श्री. एस्. बी. चांदेकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञांचे एक मंडळ तपासणीसाठी ३ फेब्रुवारी ८३ रोजी आले. त्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक व कार्यालयीन कामकाजाची दक्षतेने पाहणी केली आणि या महाविद्यालयाच्या प्रगतिपर कार्याविषयी, शैक्षणिक आस्थेविषयी, विविध उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले.

५ मार्च ८३ रोजी शिक्षण संचालक श्री. वि. वि. चिपळूणकर यांनी भेट दिली. त्यांनी ‘धडपड व्यासपीठा’ची जी चळवळ सुरू केली आहे त्या संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांशी मनमोकळी चर्चा केली. प्राध्यापकांचे अनुभव, त्यांचा दृष्टिकोण, त्यांच्या अडीअडचणी त्यांनी समजून घेतल्या आणि त्यांना मार्गदर्शन केले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या दृष्टीने हे दोन्ही कार्यक्रम महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय आहेत.

क्रीडा क्षेत्रातही कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली आहे.

या नियतकालिकाचा साहित्य विभाग मात्र खरंच फार अपुरा आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून अपेक्षेइतका प्रतिसाद मिळत नाही. या विद्यार्थ्यांनी आपला बुजरेपणा सोडावा. आपल्याला लिहिता येत नाही, येणार नाही असला न्यूनगंडही टाकून द्यावा. त्याचबरोबर ‘लेखकपणा’चा आवही आणू नये. आपण आपल्या अवतीभवतीचे जे पाहतो, अनुभवतो तेच सहज स्वाभाविक ऊर्मीने सांगण्याचा प्रयत्न करावा. लिहिता लिहिताच लिहिणं येत असतं. यासाठी लिहीत राहिलं पाहिजे. भरपूर वाचलंही पाहिजे. समृद्ध ग्रंथालय आहे, मार्गदर्शन करणारे प्राध्यापक आहेत. अशी सगळी अनुकूलता असतानाही विद्यार्थीवर्ग लिहिण्याच्या बाबतीत एवढा उदासीन का असावा समजत नाही. वास्तविक पाहता या वयातच, आणि या महाविद्यालयीन जीवनातच काहीतरी सांगण्याचा, काहीतरी व्यक्त करण्याचा आवेग अनावरपणे सळसळत असतो व अभिव्यक्तीचे वेगवेगळे मार्ग शोधीत असतो. लिहिण्याचा प्रयत्न करणं हा सर्वांत उत्तम मार्ग.

विद्यार्थी आपली उदासीनता व आळस झटकून प्रयत्नशील बनतील ही आशा.

ज्यांनी साहित्य दिलं त्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना मनःपूर्वक धन्यवाद.

०००

# स्त्री मुक्ती : एक फॅड

कु. संज्योत देशपांडे
११ वी, विज्ञान

‘स्त्रीमुक्ती हवी’, ‘स्त्रीमुक्ती करा’ अशी हल्ली एक लाट पसरली आहे. अनेक स्त्रिया हे काम अत्यंत उत्साहाने करताहेत. पण अजूनही त्यांपैकी कित्येक स्त्रियांच्या लक्षात आलं नाही की, स्त्रीमुक्ती करायची म्हणजे नक्की काय करायचं? अर्थात स्त्री आता मुक्त व्हायला हवीये; ती आताच्या काळाची एक गरज आहे; हे सारं खरं आहे. पण आपण असा विचार करूया की, आपण स्त्रीमुक्ती करू पाहतो आहोत, पण खरंच जगातल्या सगळ्या व्यक्ती मुक्त किंवा स्वतंत्र आहेत काय? आपल्याच देशाचा विचार करायचा झाला तर, आपला देश एक राष्ट्र म्हणून स्वतंत्र आहे; पण या देशातील किती माणसे खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहेत? मी तर असं म्हणते, माणूस हा माणसाचा गुलाम असतो. कधी तो सक्तीने गुलाम होतो, तर कधी प्रेमाने गुलाम होतो, तर कधी भीतीपोटीदेखील गुलाम होतो. याचं उदाहरणच द्यायचं झालं तर कित्येक व्यक्ती आपल्या घराण्याच्या पारंपारिक रूढी पाळतात. तसं पाहायला गेलं तर त्यांना त्या रूढीचं ओझं वाटत असतं. पण तरीही त्या रूढी जपल्या जातात. म्हणजे त्या रूढी समजून-उमजून जपल्या जात नाहीत, तर त्या रूढी एक जबाबदारी अंगावर आहे म्हणून किंवा त्या पाळल्या नाहीत तर ‘खानदानची इज्जत’ जाईल म्हणून, जपल्या जातात. म्हणजेच, ‘लोक काय म्हणतील?’ म्हणजे झाला नं माणूस गुलाम? जेव्हा कोणताही माणूस आपलं म्हणणं दुसऱ्यावर लादतो तेव्हा तो दुसऱ्या माणसाला गुलाम बनवतो. म्हणजेच तो दुसऱ्या माणसाला वैचारिक स्वातंत्र्य देत नाही. आणि माणूस स्वतंत्र असणं म्हणजेच त्याला वैचारिक स्वातंत्र्य असणं. वैचारिक स्वातंत्र्य म्हणजेच खरं स्वातंत्र्य. ते असल्याशिवाय कोणताही माणूस खऱ्या अर्थाने स्वतंत्र असू शकणार नाही. पुरुषही अजून या खऱ्या अर्थाने स्वतंत्र नाही. यासाठी गरज आहे ती मानवमुक्ती आंदोलनाची आणि स्त्री मुक्ती ही या मानवमुक्ती आंदोलनाची पहिली पायरी आहे. मानव-मुक्ती आंदोलन म्हणजेच प्रत्येक माणसास मुक्त होण्यासाठी पाहिजे असणारी, वैचारिक स्वतंत्रता मिळवण्यासाठी करावयाची चळवळ. या मानवमुक्ती आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणजेच स्त्रीमुक्ती-आंदोलन!

स्त्रीमुक्तीची अत्यंत गरज आहे हे खरंच, पण हल्ली स्त्रीमुक्ती ज्या प्रकाराने होते आहे त्यामुळे, अगदी स्पष्ट शब्दांत सांगायचं झालं तर, स्त्रिया बहकल्यात असं म्हणावं लागेल. काही स्त्रियांचं स्त्री मुक्ती आंदोलन पाहिलं तर असं वाटतं की, हे स्त्री मुक्ती आंदोलन नाही तर पुरुषविरोधी आंदोलन आहे. कारण या स्त्रियांचे मार्गच तसे असतात. ‘आम्ही मंगळसूत्र घालतो, मग तुम्ही का नाही घालायचं?’ ‘आम्ही दररोज स्वयंपाक करतो मग तो तुम्ही का नाही करायचा?’ तसंच कुंकू लावू नका, नवऱ्याला ‘अहो’ म्हणून हाक मारण्याची पारंपारिक रूढी बंद करा, वगैरे. मंगळसूत्र, कुंकू वगैरे रूढींत स्त्रीनेही अडकून राहायला नकोय; पण तरीही असं वाटतं की, मंगळसूत्र न घालून, स्वयंपाक करायचं सोडून देऊन, कुंकू न लावून कोणती स्त्री मुक्त होणार आहे?

आणि नवऱ्याला ‘अहो’ म्हणणे न म्हणणे हा त्या पति-पत्नींचा वैयक्तिक प्रश्न आहे. म्हणूनच असं

वाटतं की, जर स्त्रियांना मंगळसूत्र नाही घालायचं, कुंकू नाही लावायचं, स्वयंपाक नाही करायचा, तर नका करू. पण पुरुषांनी हे सगळं केलं पाहिजे असाच काही स्त्रियांचा हट्ट असतो; म्हणून या आंदोलनाकडे पाहिलं की कधी कधी शंका येते की, हे केवळ पुरुष-विरोधी आंदोलन तर नाही ना ?

स्त्रीमुक्तीसाठी प्रत्येक स्त्री ही आर्थिकदृष्टया स्वतंत्र हवी, असं म्हटलं जातं. आणि ते एक परीनं खरंही आहे. कारण असं की, पूर्वी स्त्रिया आर्थिकदृष्टया स्वतंत्र नसल्याने त्यांना कमी लेखलं जायचं. माणूस हा पैशाशिवाय तर जगू शकत नाही ना ? पैशासाठीच तो एकमेकावर अवलंबून राहातो. त्यामुळे पूर्वी स्त्री पैशाविना लाचार होती. पण आता आम्ही पैसे मिळवू शकतो, स्वतःची जबाबदारी स्वतः पेलू शकतो, स्वतःच्या पायावर आम्ही उभे राहू शकतो. यासाठीच स्त्रीने आर्थिकदृष्टया स्वतंत्र होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे स्त्री ही आपली मते ठामपणे मांडू शकेल.

पण ती आर्थिकदृष्टया स्वतंत्र झाली की खऱ्या अर्थाने ती स्वतंत्र झाली असेही म्हणता येणार नाही. कारण पैसा मिळविण्यासाठी प्रयत्न करताना या ना त्या प्रकारची गुलामगिरी ही पुन्हा पत्करावी लागतेच. आपली समाजरचनाच तशी आहे. तेव्हा खरी गरज आहे ती वैचारिक स्वातंत्र्य मिळविण्याची. नोकरी केली किंवा पैसा मिळवला की स्त्री स्वतंत्र झाली हीही कल्पना चुकीचीच ठरते.

जेव्हा स्त्री मुक्त होईल म्हणजेच स्त्रीला वैचारिक स्वातंत्र्य मिळेल तेव्हा ती इतरांना वैचारिक स्वातंत्र्य देईल. तेव्हा मानवमुक्ती होईल. आणि म्हणूनच वैचारिक स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणताही पुरुष अथवा कोणतीही स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकणार नाही. आणि यासाठीच स्त्री-मुक्तीची गरज आहे की ज्यामुळे मानवमुक्ती आंदोलनाची पायाभरणी होईल.

++

---

**'स्त्री मुक्ती'**

'स्ट्रॅटेजीज ऑफ पोलिटिकल इमॅन्सिपेशन' या ग्रंथाचा लेखक ख्रिश्चियन बे याचा असा अभिप्राय आहे की, आतापर्यंतच्या उदारमतवादी तत्त्वज्ञांची मानवमुक्ती किंवा स्वातंत्र्य याची कल्पना संकुचित होती. त्यांच्या कल्पनेनुसार माणसाचे स्वातंत्र्य मालकी हक्क, त्याचा उद्योग-व्यवसाय एवढ्यापुरतेच मर्यादित होते. परंतु स्वातंत्र्य याचा खरा अर्थ मानवाला स्व-प्रकटीकरणाची संपूर्ण संधी उपलब्ध करून देणे असा असला पाहिजे. संपूर्ण जीवन, आरोग्य आणि स्वातंत्र्य या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्या त्याला मिळाल्या पाहिजेत. स्वातंत्र्य-संकल्पनेचा केंद्रबिंदू मानव असला पाहिजे, आणि स्वातंत्र्यातील 'स्व'चा संपूर्ण विकास करण्याची संधी मानवाला उपलब्ध झाली पाहिजे. मानवाच्या मानवतेचा पूर्ण विकास झाला पाहिजे.

महाराष्ट्र टाइम्स
२२ मे १९८२

---

'ज्ञानी' म्हणविणाऱ्या लोकांना कर्म करण्याचा कंटाळा वाटू लागला किंवा कर्माची लाज वाटू लागली म्हणजे राष्ट्राच्या पडतीचा काल सुरू होतो.

०

आत्मपरीक्षणाने मनाचा, मौनाने वाणीचा आणि कर्म-योगाने शरीराचा दोष झडून गेल्याशिवाय आत्म्याला आरोग्य मिळणार नाही.

०

पुस्तकात अर्थ राहात नाही. अर्थ सृष्टीत राहतो. हे जेव्हा उमजेल तेव्हा खऱ्या ज्ञानाची चव कळेल.



# दुपार : माझी सखी

कु. ज्योती मरकळे
१२ वी कला

दुपार म्हटलं की माझ्या डोळ्यांसमोर चित्र उभं राहतं ते असं : निरभ्र आकाश, रणरणतं ऊन, चिटपाखरूही दिसणार नाही असे रस्ते आणि मनातच काय पण बाहेरही दाटून आलेला निःस्तब्ध एकाकीपणा.

असं हे चित्र सर्वसाधारणपणे डोळ्यांसमोर येत असलं तरी कल्पनाशक्तीला वाव मिळण्यास उपयुक्त अशी वेळ कोणती, असं जर कुणी मला विचारलं, तर मी दुपारचंच नाव पुढं करेन. सकाळी आपणांस फक्त रम्य, सुंदर अशी चित्रं नजरेसमोर आणावीशी वाटतात. आपण स्वतः दरिद्री असलो तरी लक्ष्मी आपल्या घरी पाणी भरत आहे... आणि अशाच कितीतरी मनोरम स्वप्नांत गुंगून जावंसं वाटतं. नदी, नाले, झाडं, तलाव, बागा, आकाश, स्वर्ग, अप्सरा, तारका, फुलं अशा कितीतरी गोष्टी मनाला वेड लावतात. आणि मग एखादा गारगोटीसारखा आकारहीन आणि रंगहीन असलेला दगडही आपणांस कल्पनाशक्तीचा आगर वाटू लागतो. वाळूचे कण आपल्याला रत्नांच्या राशी वाटू लागतात. आणि एखादे मरतुकडे कुत्रेही, आपल्या कल्पनाशक्तीच्या आधाराने, एखाद्या बिबळ्या वाघाला ठार मारण्याचा यत्न करीत असते.

म्हणजे सकाळी उत्पन्न झालेल्या कल्पना दुबळ्या वा फसव्या असतात असं मला म्हणायचं नाही. पण त्या कल्पनांत वास्तववादी दृष्टिकोन फारच कमी प्रमाणात आढळून येतो. काही वेळेला तर अतिशयोक्तीचा उच्चांक गाठला जातो. परंतु काही कवी लोकांना त्याशिवाय कविताच जमत नाही. कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती करणं म्हणजेच चांगली कविता करणं असं त्यांना वाटत असतं. ते अगदी बेधडक म्हणतात, दारिद्र्यावर, माणसांवर आणि समाजावर काय कविता करायची ? कविता करावी फुलांवर, तारकांवर, बालकांवर आणि सुंदर रमणींवर. तरच ती कविता होऊ शकते.

संध्याकाळी जरा वेगळा अनुभव येऊ लागतो. एक उदासवाणी हुरहूर हृदयात दाटून येते. मन अतिशय कातर, संवेदनशील अन् हळुवार बनतं. या वेळी मनाला दुःखाचा आणि सुखाचादेखील आघात सहन होऊ शकत नाही. सकाळी जशा आपणांस अतिरम्य कल्पना सुचत असतात, तशा प्रकारच्या कल्पना तर राहोच, परंतु या वेळी काहीच लिहावंसं वाटत नाही. एक अनामिक एकाकीपणाची लहर सर्व अंगभर गूढतेचे वलय पसरवीत असते. आणि या गूढतेच्या वलयामधून ही आंतरिक एकाकीपणाची हुरहूर कोणाची तरी वाट बघत असते. आर्तपणे, मूकपणे मनात प्रतिबिंबित होत असलेल्या आणि ओठांवर येऊ पाहणाऱ्या त्या अनामिक नावाचा पुकारा करीत असते. या वलयाच्या एकाकीपणातून बाहेर यावयास मदत करते, ती या कातरवेळेची सहचरी रजनी. आणि मग आपण एका वेगळ्याच अंधाऱ्या जगात प्रवेश करतो.

या अंधाऱ्या जगात आपणांस फुलं दिसत नाहीत. नद्या, नाले यांचे झुळझुळते प्रवाह दिसून येत नाहीत, किंवा पक्ष्यांचं किलबिलणं देखील कानी येत नाही. आणि हे सारं आपण आपल्या लेखणीनं कागदावरही उतरवू शकत नाही. रात्री आकाश आपणांस काळेकुट्ट भासते. मग आपल्या मनात स्वर्गांना आणि अप्सरांना

कोठून जागा असणार ? अशा रात्री मग आपणांस टिटवीचा कर्कश स्वर ऐकू येतो. नदीचं पाणी भेसूर भासतं. झाडं-झुडपं आणि सगळं चराचर स्तब्ध पाहून आपणांस अकाळविकाळ भुतांची आठवण येते. आणि सकाळी घ्यावयाचं देवाचं मंगल नाम आपणांस अशा वेळी आठवतं.

म्हणूनच दुपारची वेळ ही कविता करण्यास किंवा एखाद्या कथाकादंबरीचं सूत्र घोळवण्यास चांगली आहे असं निदान मला तरी वाटतं.

दुपारी, रात्र आणि सकाळ यांचे संमिश्र विचार मनात येतात. आपण स्वर्गातही वावरत नाही अन् स्मशानाचाही विचार आपल्या मनात येत नाही. त्या वेळी मन कसं पुसून ठेवलेल्या कोऱ्या पाटीसारखं लख्ख असतं. एखाद्या कल्पनेचं कथेत रूपांतर व्हायला मग वेळ लागत नाही. या वेळी वास्तवात असलेल्या गोष्टींचा मनाला स्पष्टपणे प्रत्यय येतो. आणि ती वास्तवता दुपारच्या लख्ख उन्हासारखी कथेतही उतरते.

कधी या दुपारकडं पाहताना नुकत्याच न्हाऊ-माखू घालून शांत, स्तब्ध झोपी गेलेल्या बाळाचं किंवा आपल्या हृदयंगम वाणीने गीता वाचत बसलेल्या आजोबांचं चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं.

म्हणूनच मला दुपार फार-फार आवडते. मला ती अगदी माझ्या जिवलग मैत्रिणीसारखी वाटते. मैत्रीण जशी हळूच मनाच्या चोरकप्प्यात शिरते तशीच ही दुपार.

आपल्या मनातले विचार लेखणीनं कागदावर उतरावयास लावणारी आणि मनोरम अशी गोड गुपिते हळूच बाहेर पडून त्यांना शब्दरूपांचा किंवा काव्याचा साज चढवण्यास मदत करणारी ही दुपार म्हणजे मला शकुंतलेच्या सखी प्रियंवदेसारखीच भासते. ++

## पण.... ?

सुभाष म. कोरे
१२ वी वाणिज्य

हिरवागार वसंत फुलला होता. नवीन पालवी फुटली होती. कोकिळा गात होती. सूर्य उगवत होता, अस्ताला जात होता. जग हलत होते, डोलत होते, हर्षभराने नाचत होते, पण... ?

हा 'पण'च सर्व ठिकाणी गोंधळ माजवतो. या 'पण' ला उत्तर नसते. ते एक झाड. रमणीय परिसरातीलच. पण वठून चालले होते. वाळवीने त्यास पोखरून काढले होते.

एक जोडपे. सर्वांसारखे. सर्वसाधारण वागणुकीचे. शेतात राहणारे. जमीन फक्त पाच एकर. एक विहीर. एक विद्युत मोटार. आबा ! सर्व धंदा पाहात. अक्का ! त्यांची सुस्वरूप पत्नी. कपाळावर रुपयाएवढा कुंकवाचा टिळा. नऊवारी साडी. मायाळू स्वभाव. आबा... धोतर, पटका, कोपरी, वहाणा. साधे व्यक्तिमत्त्व.

आबांना तीन मुलगे, एक मुलगी. सर्वांची लाडकी. थोरला मुलगा दादा. दहावीपर्यंत शिकलेला. पुढे डोकेच चालेना. काय करेल बिचारा ? रानात आबांना मदत करतो. दोन नंबरचा मुलगा सातवीपर्यंत शिकलेला. साखर कारखान्यात वॉचमन. तीन नंबरचा अजून शिकतोय. हुशार आहे. शिकेल असं वाटतंय. शेवटची मुलगी अक्कांना घरकामात मदत करते. सर्वांची लाडकी. शिकण्याची इच्छा नाही.

थोरल्या दोन्ही मुलांची लग्नं झालेली. दोघांनाही एक एक मुलगी. सर्व काही सुरळीत चाललेलं. रानात तीन एकर ऊस. अर्धा एकर भुईमूग. अर्धा एकर कपाशी आणि एक एकर भुसार. ऊस तुटून गेला. भरपूर पैसा आला.

रात्री सातची वेळ. आबांनी दोन्ही मुलांना बोलावलं. तिघांचा विचार विहीर खोलवावी. ठरलं. दुसऱ्या दिवशी कुदळी, फावडी, घमेली, घण, पहारा आणल्या. सात गडी आणि दहा बायका कामाला लागल्या. दण-दण, खण-खण, आवाज येऊ लागला. आबांचा थोरला मुलगा दादा, सुरुंग घेऊ लागला. तोंडातून अे...मे...ब ऽऽ आवाज चालू होता. खण् खण् ऽऽ आवाज करीत पहार दगडात शिरत होती. ठण् ठण ऽऽ आवाज आबांच्या हृदयात चालू होता. ठण् ठण् ऽऽ होती ठणठणीत तब्येतीची. दोन-चार सुरुंग झाले. दारू भरली, वाळू ठासली. सर्वांना दूर जाण्यास सांगितले. दादा फक्त सुरुंग पेटविण्यास विहिरीत राहिला. त्याने काडी ओढली. सिगारेट पेटविली. सिगारेटच्या साहाय्याने सुरुंग पेटविले, आणि तोही दूर पळाला. पंचवीस सेकंद. नीरव शांतता. धडाड धाम...धडाड धाऽऽड. चारही सुरुंग उडाले. विहिरीत भरपूर माल उकरला गेला. पण......? एक दगड, घाईने झाकायच्या राहून गेलेल्या विद्युत मोटरवर आदळला. मोटारचा चक्काचूर झाला. दोन दिवस कामाचा खोळंबा झाला. नवीन मोटार आणली. पाच हजार गेले. विहिरीचे बजेट बारगळले. पण आबांनी हाय खाल्ली नाही. चार म्हशी होत्या त्यांतील दोन विकल्या. बजेटची तोंडमिळवणी झाली.

तिसऱ्या दिवशी काम सुरू झाले. सर्व माल बाहेर काढला. पुन्हा दादा सुरुंग घेऊ लागला. अे.. अे ऽऽ... खण् खण्...चार सुरुंग भरले. वाळू ठासली. सर्वांना दूर जाण्यास सांगितले. जाता जाता आबांनी दादास, का कोणास ठाऊक, पण 'दादा, जपून रं' म्हणून सांगितलं. दादाने काडी पेटविली. सिगारेट पेटविली. सिगरेटच्या साहाय्याने सुरुंग पेटविले. पायऱ्या चढून पळत पळत बाहेर येऊ लागला. सुरुंगाची वात चिरचिर करत पेटत चालली.

